# तृतीय वर्ष कला

## सत्र - VI (CBCS)

## आंतरराष्ट्रीय संबंध

# जागतिक राजकारणात भारत

## विषय कोड : 86521

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य. डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक** : **डॉ. दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **डॉ. रमेश बैनवाड**
सहाय्यक प्राध्यापक
नूतन कॉलेज, सेलु, परभणी.

: **प्रा. निलेश पाटील**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग, गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी

**एप्रिल २०२३, मुद्रण - १**

**प्रकाशक**
**संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
**मुंबई विद्यापीठ मुद्रणालय**
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | परराष्ट्र धोरण आणि राजनय | १ |
| २ | भारत आणि प्रमुख महासत्ता | १९ |
| ३ | भारत आणि शेजारी राष्ट्र | ३५ |
| ४ | भारत आणि आंतरराष्ट्रीय संघटना | ४९ |

तृतीय वर्ष कला

सत्र - VI (CBCS)

आंतरराष्ट्रीय संबंध

जागतिक राजकारणात भारत

अभ्यासक्रम

**Paper IV: International Relations**

**Semester VI: India in World Politics**

**Module 1: Foreign Policy and Diplomacy**

1.1 Definition and Objectives

1.2 Diplomacy: Role, Types and Changing Nature

1.3 Determinants of Foreign Policy with reference to India

**Module 2: India and the Major Powers**

2.1 U.S.A.

2.2 Russia

2.3 China

**Module 3: India and her Neighbours**

3.1 India and SAARC

3.2 Pakistan and Bangladesh

**Module 4: India and International Organisations**

4.1 India's Role in the United Nations

4.2 India and ASEAN

## Recommended Reading

{Authentic and up-to-date information about these organizations is available on their respective websites. A number of articles describing/ evaluating the functioning and the role of these organizations are available on the Internet. Colleges may also subscribe to UNews, a monthly newsletter of the UN Information Centre, 55 Lodi Estate, New Delhi-110003 by writing to the Centre. Price of the Newsletter is Re. 1/- (Rupee one) only.}


1. Baylis, John and Steve, Smith (Ed): *The Globalization of World Politics*, OUP, New Delhi, 3rd ed. 2005.
2. *Basic Facts about the United Nations*, The News and Media Division, UNDepartment of Public Information, New York, 2011.
3. Chaterjee, Anik (Ed): *World Politics*, Pearson, New Delhi, 2012.
4. Diehl, Paul F.: *The Politics of Global Governance: International Organizations in an Interdependent World*, Lynne Rienner Publishers; 4thedition, paperback, Boulder,2010.
5. Fawcett, Louise and Hurrell, Andrew (Ed), *Regionalism in World Politics: RegionalOrganization and International Order,* OUP, Oxford, reprint 2000 (1sted. 1995).
6. Gamble, Andrew and Payne, Anthony (Ed): *Regionalism and World Order*, St. Martin's Press, New York, 1996.
7. Gupta, Sanju (Ed): *An Introduction to International Relations*, Pearson Delhi, 2012.
8. Heywood, Andrew: *Global Politics*, Palgrave Foundation, Palgrave Macmillan, New York, 2011.
9. Karns, Margaret P. and Mingst, Karen A.: *International Organizations: The Politicsand Process of Global Governance,* 2ndedition, 2009
10. Meisler, Stanley: *United Nations: The First Fifty Years*, Atlantic Monthly Press, New York, 1995.

11. Mingst, Karen A. and Karns, Margaret P: *United Nations in the Post- Cold War Era*, Westview Press, Boulder, 2nd edition, 2000.
12. Rajan, M.S: United Nations at Fifty and Beyond, Lancers, New Delhi, 1996.
13. Rajaram, Kalpana (Ed): *International Organisations, Conferences and Treaties*, Spectrum Books Pvt. Ltd., New Delhi, 13th ed. 2012.
14. Sauderbaum, Fredrik and Shaw, Timothy M. (Ed): *Theories of New Regionalism: APalgrave Reader*, Palgrave Macmillan, Houndsmills, 2003.
15. *The United Nations Today*, United Nations Department of Public Information, NewYork, 2008.
16. Traub, James, Arbour, Louise and Arieff, Irwin: *A Global Agenda: Issues before theUN 2011-2012*, United Nations Association of the USA, 2011.
17. Weiss, Thomas and Daws, Sam (Ed): *The Oxford handbook on the United Nations*, OUP New York, paperback 2008.
18. Weiss, Thomas, Forsyth, David P. and Coate, Roger A: *The United Nations andChanging World Politics*, Westview Press, Boulder, 4thEd 2004.

# १

# परराष्ट्र धोरण आणि राजनय

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३ परराष्ट्र धोरण

१.४ राजनय

१.५ भारताच्या परराष्ट्र धोरणाचे निर्धारित घटक

१.६ विद्यापीठीय प्रश्न

## १.१ उद्दिष्टे

१. परराष्ट्र धोरण म्हणजे काय ते समजावून घेणे.

२. राजनय ही संकल्पना समजून घेऊन राजनयाच्या बदलत्या स्वरूपाच्या आढावा घेणे.

३. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा उद्गम व विकास, उद्दिष्टे, आधारभूत तत्त्वे आणि भारताच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणारे घटक इत्यादींचा अभ्यास करणे.

## १.२. प्रस्तावना

परराष्ट्र धोरण आणि राजनय या दोन्ही संकल्पना आंतरराष्ट्रीय राजकारणातील अत्यंत महत्त्वाच्या संकल्पना असून, त्यांना आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे स्थान आहे. परराष्ट्र धोरण म्हणजे एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राबाबत स्वीकारलेले धोरण होय. तसेच परराष्ट्र धोरण म्हणजे अशी तात्विक योजना की जिच्याद्वारे कोणतेही एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राबरोबर संबंध प्रस्तापित करून आपल्या हितसंबंधांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करीत असते. राजनय हे परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी करण्याचे एक साधन आहे. राष्ट्राचे हित सुरक्षित ठेवण्याचे तसेच त्यात वृद्धी करण्याचे एक प्रभावी साधन म्हणून राजनयाकडे पाहिले जाते. राष्ट्रांमधील संबंध हे प्रामुख्याने राजनयाच्या माध्यमातून प्रस्थापित केले जातात. राज्या राज्यातील बिघडलेले संबंध पुन्हा सुरळीत करण्याचे साधन म्हणजे राजनय होय. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे राजनय होय. विश्व राजकारणात कोणतेही तत्त्वे, माध्यमे आणि साधनांचा वापर कौशल्याने करावा लागतो म्हणून विश्व राजकारणातील राजनय हा अविभाज्य भाग बनला आहे. दोन देशांच्या संबंधात सहकार्य प्रस्थापित करण्याचे कार्य राजनयाच्या माध्यमातून केले जाते. राजनय म्हणजे परराष्ट्र धोरण ठरवण्याची एक प्रक्रियाही असते. राजनयिक संबंध देश-विदेशातील राजदूतावास कार्यालयातील राजदूत व राजनयिक प्रतिनिधींद्वारे स्थापन केले जातात. राजनीतिज्ञ ज्या क्रिया करतात त्यांना राजनयिक कृत्य असे म्हटले जाते. प्रस्तुत पाठात आपण परराष्ट्र धोरण

आणि राजनय या संकल्पना, त्यांची उद्दिष्टे, तसेच भारताचे परराष्ट्र धोरण, त्याला आकार देणारे विविध घटक इत्यादींचा अभ्यास करणार आहोत.

## १.३ परराष्ट्र धोरण :

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात परराष्ट्र धोरणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. परराष्ट्र धोरणाची निर्मिती करणे ही आधुनिक राज्याची महत्त्वाची गरज मानली जाते. राज्या-राज्यातील परस्परावलंबित्वामुळे आणि जगातील प्रत्येक राष्ट्रांचे इतर राष्ट्रांबरोबर विविधतेचे संबंध असल्यामुळे आज कोणतेही राष्ट्र अलिप्त, एकाकी राहू शकत नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणात सर्व राष्ट्रीय एकत्रितपणे राहण्याचा प्रयत्न करतात, ते करीत असताना आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केले जातात. त्याला अनुसरून इतर राष्ट्रांबरोबरचे धोरण, तत्वे आणि संबंध ठरविले जातात, त्यालाच त्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरण असे म्हणतात. आपले संबंध इतर राष्ट्रांशी कसे असावेत? याबाबत प्रत्येक स्वतंत्र राष्ट्र परराष्ट्र धोरण आखून त्याची अंमलबजावणी करीत असते. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात विविध राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणांचा अभ्यास केला जातो. थोडक्यात परराष्ट्र धोरण समजून घेतल्याशिवाय आंतरराष्ट्रीय राजकारणाचे आकलन होऊ शकत नाही. राष्ट्रांना त्यांच्या परराष्ट्र धोरणामुळे एक निश्चित दिशा मिळते आणि त्यानुसार त्यांची उद्दिष्टे साध्य करता येतात. परराष्ट्र धोरण म्हणजे एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राबाबत स्वीकारलेले धोरण होय. परराष्ट्र धोरण हे एका राष्ट्राने इतर राष्ट्रांबरोबर संबंध प्रस्थापित करण्यासाठी निर्माण केलेली यंत्रणा आहे आणि ही यंत्रणा आपल्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी इतर राष्ट्रांवर प्रभाव टाकण्यासाठी योजनाबद्ध कृती करीत असते. वेगवेगळ्या देशांच्या परराष्ट्र धोरणातून आंतरराष्ट्रीय राजकारण आकार घेत असते. एका देशाची कृती दुसऱ्या देशाच्या कृतीला जन्म देते. परराष्ट्र धोरणाची आखणी करीत असताना राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय, सामाजिक संबंध विकसित होत असतात किंवा बिघडत तरी असतात.

### १.३.१ परराष्ट्र धोरण : अर्थ आणि परिभाषा :

विविध विचारवंतांनी परराष्ट्र धोरण म्हणजे काय हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे

**१. पीटमन पीटर :**

“आंतरराष्ट्रीय संबंधात राष्ट्रीय योजना आणि विदेश सेवा यांच्या कार्यपद्धतीचे व राष्ट्रीय उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी केलेले प्रयोजन म्हणजे परराष्ट्र धोरण होय. “

**२. चार्ल्स बर्टन मार्शल :**

“ परराष्ट्र धोरण म्हणजे राज्यसत्तेने आपल्या सत्तेच्या क्षेत्राबाहेरील परिस्थितीला प्रभावित करण्यासाठी केलेल्या कृतींची मालिका होय.”

### ३. जॉर्ज मॉडेलस्की :

" परराष्ट्र धोरण म्हणजे राज्याद्वारे निर्मित अशी व्यवहार पद्धती किंवा कृतिशील व्यवस्था आहे जिच्याद्वारे इतर राज्यांचे वर्तन सुधारण्याचा प्रयत्न केला जातो आणि आंतरराष्ट्रीय पर्यावरणाशी स्वतःची कृती जुळवून घेतली जाते.

### ४. क्विन्सी राईट :

"परराष्ट्र धोरण ही अशी एक कला आहे की, ज्याद्वारे शासनव्यवस्था आंतरराष्ट्रीय संबंधात आपल्या राज्याचे अधिकार, हित, जबाबदाऱ्या अबाधित राखण्याचा प्रयत्न करतात आणि या अधिकार आणि हितसंबंधांचे रक्षण आणि विकास करण्यासाठी तसेच जबाबदाऱ्या पाळल्या जाव्या त्यासाठी वेळोवेळी निर्णय घेत असते."

वरील परिभाषेवरून परराष्ट्र धोरणाची काही वैशिष्ट्ये सांगता येतील ती खालीलप्रमाणे –

- परराष्ट्र धोरण हे मुख्यतः शासनाने इतर राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी निर्धारित केलेले धोरण असते.
- परराष्ट्र धोरण हे स्थिर नसते तर प्रवाही असते. अनेक अंतर्गत आणि बाह्य घटकांमुळे त्यामध्ये बदल घडून येतात.
- परराष्ट्र धोरण हे व्यक्ती आणि परिस्थिती सापेक्ष असते. देशातील राजकीय- आर्थिक परिस्थिती, राजकीय नेतृत्व इत्यादी मध्ये बदल झाला की परराष्ट्र धोरणात बदल घडून येतो. तसेच बाह्य जगातील परिस्थितीतील बदल, इतर देशांचा प्रतिसाद इत्यादी कारणांमुळे ही परराष्ट्र धोरणात बदल होऊ शकतात.
- परराष्ट्र धोरण हे गतिमान आणि परिवर्तनीय असते.
- परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून राष्ट्रांची प्रमुख उद्दिष्टे, मूल्ये, आंतरराष्ट्रीय समुदायापुढे मांडली जातात. परराष्ट्र धोरण हे त्या देशातील राष्ट्रीय इच्छा, आकांक्षा, तत्त्वज्ञान, लोकमत इत्यादींचे प्रतिबिंब असते.
- कोणत्याही राष्ट्रात परराष्ट्र धोरण हे देशाची सर्वोच्च सत्ता ठरवत असते. परराष्ट्र धोरणाची निर्मिती ही स्वतंत्र विभागामार्फत केली जाते. परराष्ट्र धोरण निर्मितीची प्रक्रिया ही संस्थात्मक असते. उदाहरणार्थ भारतात परराष्ट्र धोरणाच्या निर्मिती प्रक्रियेत देशाचे पंतप्रधान, परराष्ट्र मंत्रालय, परराष्ट्र सचिव इ. सहभागी होत असतात.
- परराष्ट्र धोरणाचा मुख्य हेतू स्वदेशाचे राष्ट्रीय हितसंबंध सुरक्षित ठेवणे हा असतो.
- परराष्ट्र धोरण ठरवीत असताना अनेक देशांतर्गत आणि बाह्य घटक गृहीत धरले जातात. या घटकांचा परराष्ट्र धोरण निर्मितीवर प्रभाव पडत असतो. उदाहरणार्थ देशाची भौगोलिक परिस्थिती, भौगोलिक स्थान, सामाजिक- आर्थिक परिस्थिती, सैन्यबळ, विज्ञान-तंत्रज्ञानात्मक प्रगती इ.

### १.३.२ परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे

परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून राष्ट्रे आपली राष्ट्रीय आणि जागतिक उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करीत असतात. ती खालीलप्रमाणे

- राष्ट्रांच्या सीमारेषांचे संरक्षण करणे.
- आपल्या राष्ट्रीय सामर्थ्यात वाढ करणे.
- राष्ट्रांचा आर्थिक - सामाजिक विकास साधणे. सामाजिक-आर्थिक विकासासाठी आवश्यक परिस्थिती विभागीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण करणे.
- प्रादेशिक नैतिकता अबाधित राखणे.
- राष्ट्रा-राष्ट्रांबरोबर परस्पर सहकार्य करणे.
- राष्ट्रीय हितसंबंधांची जोपासना करणे.
- आंतरराष्ट्रीय राजकारणात आपल्या राष्ट्राचा सन्मान राखणे आणि आपल्या राष्ट्राची प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न करणे.
- आपल्या राष्ट्राचे सार्वभौमत्व, अखंडत्व टिकवणे.

### १.३.३ परराष्ट्र धोरण निर्धारित करणारे घटक

कोणत्याही देशाच्या परराष्ट्र धोरणाला आकार देणारे अनेक घटक असतात. या घटकांना अनुसरूनच देशाचे परराष्ट्र धोरण निश्चित केले जाते.

देशाच्या परराष्ट्र धोरणावर अनेक अंतर्गत आणि बाह्य घटकांचा प्रभाव पडत असतो. परराष्ट्र धोरण निर्धारित करणारे घटक खालीलप्रमाणे :

- परराष्ट्र धोरण निर्धारित करणारे अंतर्गत घटक

१. राष्ट्राचे भौगोलिक स्थान
२. राष्ट्राचा इतिहास आणि राष्ट्राची संस्कृति
३. औद्योगिकीकरण
४. लष्करी सामर्थ्य
५. लोकसंख्या
६. लोकमत
७. राजकीय नेतृत्व
८. राजनय तज्ज्ञांची कुशलता
९. कायदेमंडळाचे सहकार्य
१०. राजकीय विचारधारा

११. देशाची राजकीय व्यवस्था

१२. राष्ट्राचे सामाजिक महत्त्व

१३. सत्तेची संरचना

१४. विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगति

१५. लोकसहभाग

- परराष्ट्र धोरण निर्धारित करणारे बाह्य घटक

१. जागतिक लोकमत

२. आंतरराष्ट्रीय संघटना

३. इतर राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण

४. आंतरराष्ट्रीय परिस्थिती

## १.४ राजनय (Diplomacy) -

राष्ट्रीय हितसंबंध साध्य करण्याचा आराखडा म्हणजे परराष्ट्र धोरण होय आणि परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी करण्याचे साधन म्हणजे राजनय.

राजनय ही आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेली संपर्कव्यवस्था असते ज्यामुळे राष्ट्राराष्ट्रातील संबंध प्रत्यक्ष आकारास येतात. परराष्ट्र धोरण अंमलबजावणीचे एक साधन म्हणून राजनय होय.

देशादेशांमधील मतभेद बळाच्या किंवा आंतरराष्ट्रीय कायद्याच्या आधारे न सोडविता वाटाघाटी, राजनैतिक संवादाच्या माध्यमातून सोडविणे हे राजनयाचे प्रमुख उदिष्ट असते.

१४१ राजनय - अर्थ, परिभाषा.

राजनयाला इंग्रजीत 'Diplomacy' असे म्हटले जाते Diplomacy हा शब्द Diploar या शब्दापासून तयार झाला आहे ज्याचा अर्थ म्हणजे घडी बसविणे.

पुढे राजनयाला दोन राज्यातील होणारा राजकीय पत्रव्यवहार आणि राजकीय संधी असा अर्थ प्राप्त झाला. पत्रव्यवहार आणि संधी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कृतीला राजनायिक कृत्य (Diplomatic Business) म्हणत असे.

भारतामध्ये अनेक वर्षापर्यंत Diplomacy चा अर्थ 'कूटनिती' असाच प्रचलित होता. श्रीकृष्णाच्या कूटनीतीमुळेच पांडव विजयी झाले तर शुक्राचार्याच्या कूटनीतीमुळे बळीराजाला देवदेवतांवर विजय प्राप्त करता आला. त्यानंतर मौर्यकाळात आर्य चाणक्याची कुटनिती जगप्रसिद्ध झाली.

युरोपात मॅकियाव्हॅलीच्या विचारांमुळे Diplomacy ला कुटनिती हाच अर्थ प्राप्त झाला होता. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान मॅटरनीख, जर्मनीया चन्सेलर विस्मार्क यानेही Diplomacy या अर्थ कुटनिती असाच वापरला. विस्मार्कच्या मते, विदेशातील आपल्या राजदूताने विदेशी

लोकांना मूर्ख बनविण्यासाठी आणि आपल्या देशाच्या हितसंबंधाच्या सुरक्षिततेसाठी केलेल्या कृती म्हणजे Diplomacy होय'

### १.४.२. राजनयाची परिभाषा - (Definition) -

१) ऑस्कफोर्ड शब्दकोष -

"राजनय म्हणजे संधीवार्ताद्वारे आंतरराष्ट्रीय संबंधाचे व्यवस्थापन होय. ही एक अशी कार्यपद्धती आहे, ज्याद्वारे राजदूत राजनयिक संबंध प्रस्थापित करतात. राजनयज्ञ तिला आपला व्यवसाय किंवा कला समजतात."

२) हेरॉल्ड निकोलसन-

"राजनय ही आंतरराष्ट्रीय संबंध वाटाघाटीच्या मार्गाने प्रस्थापित करण्याची पद्धती, कला आहे. राजदूत तिचा वापर धोकादायक आणि चातुर्याने करतात."

३) एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका -

"राजनय म्हणजे आंतरराष्ट्रीय संधीवार्ताची संचालन करण्याची कला होय."

थोडक्यात, राजनय ही आंतरराष्ट्रीय व्यवहाराच्या संचालनाची कला आहे, त्याद्वारे राष्ट्राराष्ट्रात परस्पर सलोख्याचे संबंध प्रस्थापित केले जातात.

- राजनयाचा मुख्य उद्देश म्हणजे दुसऱ्या राष्ट्रास न दुखावता आपले राष्ट्रीयहित साध्य करणे.
- राजनयिक संबंधातून देशादेशातील राजकीय-आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक संबंध प्रस्थापित होतात.
- युद्ध टाळून वाटाघाटीच्या मार्गाने राष्ट्राराष्ट्रात संवाद प्रस्थापित करण्याची कला म्हणजे राजनय होय.

### १.४.३ राजनयाची प्रमुख वैशिष्ट्ये-

आधुनिक युगाला राजनयाचे युग म्हणतात. कारण प्रत्येक राज्य आपल्या राजनयिक प्रतिनिधींना विशिष्ट प्रशिक्षण देऊन परदेशात आपल्या देशाचे, स्वकिय नागरिकांचे हितसंबंध जोपासण्याकरिता पाठवते. दुसऱ्या राज्याला कमीत कमी महत्व देऊन आपल्या देशाचे हित पाहणाऱ्या राजनयज्ञाला कुशल राजनयज्ञ म्हणून ओळखले जाते.

उदा. अमेरिका आणि साम्यवादी चीन यांच्यातील शत्रुत्वाचे संबंध मित्रत्वाचे करण्यास अमेरिकेचे राजदूत डॉ. हेन्री किंसिंजर यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

राजनयज्ञ आपल्या वर्तनाद्वारे शत्रूराष्ट्रावर कसा आणि किती प्रभाव पाडतो यावर दोन राष्ट्रातील संबंध अवलंबून असतात.

**राजनयाची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-**

- राजनय ही एक कला असून, तिला पूर्णतः नैतिक-अनैतिक म्हणता येणार नाही. त्याचे उत्तर त्या कलेच्या प्रयोगावर अवलंबून असते. राज्याने परिस्थितीनुसार ही कला वापरायची असते.
- राजनयाचा प्रयोग द्विपक्षीय असतो. दोन राष्ट्रामध्ये प्रामुख्याने वाटाघाटी केल्या जातात.
- आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय सम्मेलने, शिखर परिषदा, प्रादेशिक आंतरराष्ट्रीय संघटनांमुळे राजनय बहुपक्षीय बनला आहे.
- राजनयात युद्धापेक्षा वाटाघाटी, तह, समझोत्याला महत्व दिले जाते.
- राष्ट्राराष्ट्रातील राजनयिक संबंधावर राष्ट्रांची प्रगती अवलंबून असते.
- कुशल राजनयज्ञ आपल्या बुद्धिमत्ता, चातुर्याच्या जोरावर शत्रूलाही मित्र बनवतो.
- राजनयात शिष्टाचाराला (Protocol) महत्व असते. राजशिष्टाचार म्हणजे राजनायिक अधिकाऱ्यांसाठी असलेले सर्वसंमत वागणुकीचे नियम. एखाद्या देशाविरुद्ध नाराजी दर्शविण्यासाठी यजमान राष्ट्रप्रमुख त्या देशाच्या राजदूताला भेट नाकारू शकतात. तर एखाद्या देशाबरोबर जवळीक अधोरेखीत करण्यासाठी राजशिष्टाचार बाजूला ठेवून त्या देशाच्या प्रतिनिधींचे आगत स्वागत केले जाते.

### १.४.४ राजनयाची उद्दिष्टे / उद्देश -

राजनयाचा मुख्य उद्देश म्हणजे राष्ट्राराष्ट्रातील संबंध वाढविणे, त्यासाठी वाटाघाटी करणे. तरीही राजनयाची अन्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे-

- राष्ट्राच्या राष्ट्रीय हितसंबंधांचे संरक्षण करणे
- मित्र राष्ट्रांशी संबंध वाढविणे तसेच शत्रूराष्ट्रांशी तटस्थ संबंध ठेवणे
- राज्याच्या प्रादेशिक, राजनैतिक, आर्थिक अखंडतेचे संरक्षण करणे.
- विदेशी शक्तीचे गठबंधन रोखणे
- विचारांचे आदानप्रदान करणे. एकमेकांचे मतपरिवर्तन करणे. त्याद्वारे राष्ट्राचे हित जोपासणे.

उदा. भारताचे अलिप्ततावादी धोरण, पंचशील तत्त्वे ही धोरणे कितीही उत्तम असली तरी त्याचा स्वीकार प्रत्येक राष्ट्राने करावा, हा आग्रह धरणे चुकीचे आहे. म्हणून भारताने अन्य राष्ट्रांना आपले विचार पटवून दिले पाहिजे.

- राष्ट्राराष्ट्राच्या परस्पर हेतूचे अंदाज बांधणे
- दुसऱ्या राष्ट्रांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करणे.
- स्वराष्ट्रांच्या भूमिकेचा प्रचार करण्यासाठी संपर्क, वाटाघाटी करणे

## १.४.५ राजनयिक प्रतिनिधीची कार्ये

आपल्या देशाच्या राष्ट्रीय हितसंबंधाच्या जोपासणेकरिता विचारांचे आदान-प्रदान करणे, वाटाघाटी करणे, परराष्ट्रात आपल्या राष्ट्राचे प्रतिनिधित्व करणे, देशाची प्रतिष्ठा व प्रतिमा कशी उंचावेल यासाठी राजनायिक प्रतिनिधीना पुढील कार्ये करावी लागतात.

**१) स्वकिय नागरिकांचे हितसंरक्षण-**

विदेशात राहत असलेल्या स्वदेशातील नागरिकांच्या हिताचे संरक्षण करण्याची जबाबदारी राजदूतांची असते. अपघात, नैसर्गिक आपत्ती, राजकीय आस्थिरता, अंतर्गत यादवी अशा आपत्तीजनक परिस्थितीत स्वतःच्या देशवासीयांच्या हिताची काळजी घेणे ही दूतावासांची प्रमुख जबाबदारी असते. त्यांच्या जीवित- मालमत्तेचे रक्षण करणे, त्यांना सुखरूप स्वदेशी परत पाठविणे ही कार्ये दूतावासांना करावी लागतात.

**2) वकिलातीची कामे (consular) -**

यजमान देशातील नागरिकांना प्रवासासाठी व्हिसा, इतर परवाने देणे ही महत्वाची जबाबदारी राजनयिक प्रतिनिधी पार पाडतात. त्यासाठी अनेक मोठे देश यजमान देशातील महत्वाच्या शहरांमधून वकिलाती चालवितात. याशिवाय व्यापारी आदानप्रदानास उत्तेजन देण्याचे काम वकिलाती करतात. यजमान देशात स्वतःच्या देशाची प्रतिमा चांगली उभी करण्यासाठी अनेक साहित्यीक - सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

**३) प्रतिकात्मक प्रतिनिधित्व-**

यजमान देशात आपल्या देशाचे प्रतिकात्मक प्रतिनिधित्व करणे हे राजदूतांचे प्रमुख कार्य आहे. यामध्ये यजमान देशातील विविध उपक्रमांमध्ये उपस्थिती लावणे महत्वाचे मानले जाते. तसेच स्वदेशातून आलेल्या मंडळींशी गाठभेट घेणे, त्यांना मदत करणे. त्यांच्या कामात रस घेऊन ते तडीस जाहील हे पाहण्याचे कार्यही राजदूत करतात.

**४) माहितीचे संकलन आणि विश्लेषण-**

यजमान देशात घडणाऱ्या घटना, त्यांचे परिणाम, विदेशातील वातावरण, जनमत इ. बाबत इत्यंभूत विश्वासार्ह अस्सल खात्रीलायक माहिती संकलित करणे ही राजदूतांची प्रमुख जबाबदारी असते. या माहितीचे संकलन करून ती विश्लेषणात्मक स्वरुपात स्वदेशाला कळवणे अत्यंत महत्वाचे असते. विदेशात घडणाऱ्या घडामोडींचा आपला देश आणि राष्ट्रीय हितसंबंधावर काय परिणाम होईल, त्याकरिता वाटाघाटी कशा करता येतील याचा विचारविनिमय करावा लागतो. यासाठी राजदूत विदेशी देशाचे राजकारणी, नोकरशहा, सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या व्यक्तीशी संपर्क आणि संबंध ठेवून असतात. माहितीसाठी राजनयिक प्रतिनिधीं विविध स्त्रोतांचा उपयोग करतात. उदा. वृत्तपत्रकार, चर्चा, बातम्या.

**५) सल्लामसलत किंवा वाटाघाटी करणे-**

राजदूतांचे प्रमुख कार्य म्हणजे स्वागतकर्त्या राष्ट्रांशी आर्थिक सामाजिक राजकीय आणि मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करणे, त्यासाठी त्या राष्ट्राशी सल्ला मसलत करणे किंवा तह,

वाटाघाटी करणे होय. त्याचप्रमाणे आपल्या देशाचे परराष्ट्र धोरण आखणाऱ्यांना सुयोग्य सल्ला देण्याचे कार्यही राजदूत करतात. विदेशातील परिस्थितीचे आकलन, अंदाज बांधण्याची क्षमता यासाठी धोरणकर्त्यांची राजनायिक प्रतिनिधींकडून राजकीय विश्लेषणाची अपेक्षा असते. या ओघात ते अनेकदा अप्रत्यक्षपणे धोरणे ठरवित असतात. राजदूतांचे स्वदेशातील निर्णायक वर्तुळातील स्थान त्यांच्या सल्ल्याचे मोल ठरवित असते.

याशिवाय स्वकिय देशातील नागरिकांना पारपत्रांचे (Passport) वितरण करणे, परराष्ट्रीय धोरणांची स्वागतकर्त्या देशात अंमलबजावणी करणे इ. कार्ये राजनायिक प्रतिनिधी करीत असतात.

### १.४.६ राजनयाचे बदलते स्वरूप / राजनयाचे प्रकार : जुना राजनय आणि नवा राजनय

प्राचीन काळापासून राज्याराज्यातील संबंध जोपासण्याकरिता राजनयाचा वापर केला जातो. ज्या काळापासून राज्यसंस्था अस्तित्वात आली तेव्हापासून राज्याराज्यातील संबंध राखण्यासाठी राजनय आणि शिष्टाचार अस्तित्वात आले. युरोपात मध्ययुगाचा अस्त होताना भौगोलिकता आणि सार्वभौमत्व या वैशिष्ट्यांनी युक्त आधुनिक राज्यांचा उदय झाला, तेव्हा राजनयिक शिष्टाचारांची परंपरा विकसित झाली. १८१५ च्या व्हिएन्ना काँग्रेसने राजनैतिक वर्तनाचे आणि व्यवहाराचे तसेच राजनैतिक विशेषाधिकार स्पष्ट केले.

पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीपर्यंत टिकलेल्या या परंपरेस पारंपरिक राजनय अथवा जुना राजनय (Traditional or old Diplomacy) म्हटले जाते. या परंपरेत काही बदल घडून पहिल्या महायुद्धानंतर नवीन राजनय (New Diplomacy) विकसित झाला. दुसऱ्या विश्वयुद्धानंतर, विशेषतः महासत्तांमधील शीतयुद्धाच्या राजकारणामुळे ही राजनयाच्या स्वरूपात बदल घडून आले. पूर्वीच्या गुप्तताप्रधान राजनीतीची जागा खुल्या राजनीतीने घेतली.

आंतरराष्ट्रीय परिषदा किंवा अनेक देशांच्या प्रतिनिधींच्या बैठका भरवून होणाऱ्या राजनीतिविषयक व्यवहारांना अलीकडच्या काळात ‘परिषद राजनीती’ असे म्हटले जाते तर राष्ट्रप्रमुख, परराष्ट्र मंत्र्यांच्या प्रत्यक्ष भेटीवर आधारित व्यवहारांना ‘शिखर राजनय’ असे म्हटले जाते. शीतयुद्धाच्या अस्तानंतर केवळ युद्ध, वाटाघाटी आणि सीमाविषयक मतभेद अशा राजकीय बाबींचे क्षेत्र ओलांडून सांस्कृतिक आणि शैक्षणिक पातळीवर राजनयाचे व्यवहार घडून येतात.

### १) पारंपरिक राजनय किंवा जुना राजनय

स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र- राज्यांना वेगवेगळ्या कारणासाठी एकमेकांशी चर्चा, वाटाघाटी करण्याची आवश्यकता भासू लागली तेव्हा पारंपरिक राजनयाच्या विशिष्ट संरचनेचा जन्म झाला. दोन राज्य एकमेकांशी बोलणी करण्याकरिता एकमेकांच्या राजधानीत प्रतिनिधींची नियुक्ती करू लागले. या राजदूतांच्या मार्फत दोन देशांमध्ये द्विपक्षीय वाटाघाटी होऊ लागल्या. कालांतराने राजदूतांच्या व्यवस्थेला संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाले. यातूनच विविध देशांच्या नोकरशाह्यांमध्ये परराष्ट्र सेवेत करियर करणाऱ्या अधिकाऱ्यांचा उदय झाला. परदेशातील दूतावास आणि स्वदेशातील परराष्ट्र मंत्रालय अशी राजनायिक संरचना बहुतेक

देशात विकसित झाली. त्यातूनच राजनयिक वाटाघाटीच्या पारंपरिक प्रक्रिया अस्तित्वात आल्या.

साधारणपणे १८१५ ची व्हिएन्ना काँग्रेस ते पहिल्या महायुद्धापर्यंतचा काळ हा जुन्या राजनयाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या काळात बिस्मार्क (जर्मनी), काऊंट केअर (इटली), मॅटरनीख (फ्रान्स) या अनेक नामवंत राजनयज्ञांचा उदय झाला.

जुन्या राजनयाची वैशिष्ट्ये-

**१) निरंकुश राजनय -**

जुना राजनय हा निरंकुश स्वरुपाचा होता. त्या काळात राजा सर्वाधिकारवादी शासक होता. विदेशनीतीचे संचलन, युद्ध- तह करण्याचे सर्वाधिकार राजा / राणीलाच होते. या राजनयाला Bodiar Diplomacy असे म्हणत. म्हणजेच राणीच्या निजीकक्षातील राजनय. प्राचीन काळात राणी आपल्या कक्षातून राजनय तज्ञांशी सल्ला मसलत करीत. प्रजाहित, राष्ट्रहित या संकल्पना त्याकाळी गौण होत्या.

**२) शक्ती संतुलनवादी राजनय-**

या काळात युरोपियन राज्यांमध्ये सतत युद्ध होत त्यामुळे युद्धानंतर शांती निर्माण करण्यासाठी आणि शक्तीसंतुलन राखण्यासाठी राजनयज्ञांना निमंत्रित केले जात. तत्कालीन व्यवस्थेत राजनयज्ञांना महत्वाचे स्थान होते.

**३) द्विपक्षीय -**

जुना राजनय बऱ्याचदा द्विपक्षीय असे. प्रामुख्याने राष्ट्राराष्ट्रांमध्ये होणाऱ्या वाटाघाटी, चर्चा दोनच देशांमध्ये होत असत.

**४) गुप्त वाटाघाटी आणि करार-**

राष्ट्राराष्ट्रांमध्ये होणाऱ्या वाटाघाटी, करार अनेकदा गुप्त स्वरूपाच्या असत. वाटाघाटी करण्याच्या प्रक्रियेबरोबरच राजनयिक शिष्टाचार विकसित झाले. यात राजदूतांचे आणि दूतावासांचे विशेष हक्क, त्यांना मिळणारे संरक्षण इ. चा समावेश होतो. पारंपरिक राजनयाचे विषय त्या त्या देशांच्या राज्यकर्त्यांच्या हितसंबंधांशी निगडित असत. युद्ध, तहाबरोबरच राज्यकर्त्यांच्या वैयक्तिक महत्वाकांक्षांचेही प्रतिबिंब राजनयिक वाटाघाटी आणि त्यातून निर्माण झालेल्या गुप्त करारांवर पडत असत. यात एखादा प्रदेश संगनमताने बळकावणे, वाटून घेणे अशा बाबी असत.

**५) युरोपपुरताच मर्यादित –**

जुना राजनय हा युरोपपुरताच मर्यादित होता, कारण आंतरराष्ट्रीय राजकारण हे मुख्यतः युरोपपुरतेच मर्यादित होते. या काळात अमेरिकेचे धोरण तटस्थतेचे होते. युरोपातील बड्या राष्ट्रांच्या संघाने (Concert of Europe) आंतरराष्ट्रीय व्यवस्था नियंत्रित केली होती. तो काळ पारंपरिक राजनयाच्या बहराचा काळ होता.

### ६) प्रतिष्ठा निरपेक्ष राजकारण

जुना राजनय हा मित्र बनविणे आणि दुसऱ्या राज्याचे मित्र तोडणे अशा स्वरुपाचा होता. याकाळात फारसे युद्ध झाले नाही. परस्पर सहकार्य आणि समजुतीने राष्ट्रांमधील वाद मिटवले जात. राजनयीक वाटाघाटी गुप्त स्वरुपाच्या असल्याने राजदूतही करार तडजोड करताना प्रश्न प्रतिष्ठेचे मानत नसत.

जुन्या राजनयाचा अस्त-

राजेशाहीच्या अंतानंतर आणि लोकशाहीच्या उदयानंतर जुन्या राजनयाचा अस्त झाला. १८१५ ते १९१४ दरम्यानचे 'शांततेचे शतक' संपल्यावर हा राजनय नष्ट झाला. साम्राज्यवादी स्पर्धेला विरोध, वसाहती स्वतंत्र राज्याचा उदय यामुळे जुना राजनय युरोपपुरता मर्यादित न राहता आंतरराष्ट्रीय स्वरुपाचा झाला.

### 2) नवा राजनय (New Diplomacy)

पहिले विश्वयुद्ध संपल्यानंतर राजनयाची पारंपरिक शैली बदलण्याकडे युरोपियन देशांनी भर दिला. आंतरराष्ट्रीय संघटनांच्या उदयामुळे राज्ये हा राजनयिक वाटाघाटीचा एकमेव घटक राहिला नाही. परिणामी राजदूत आणि दूतावासांच्या कार्यक्षेत्रात बदल होत गेले. आंतरराष्ट्रीय संबंधांना विश्वव्यापी स्वरूप प्राप्त झाल्यामुळे राजनयाची प्रक्रिया ही बदलली.

**नव्या राजनयाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे-**

### १) बहुपक्षीय स्वरूप –

नवा राजनय हा बहुपक्षीय स्वरुपाचा आहे. राजनायिक वाटाघाटी मध्ये केवळ दोन राष्ट्र सहभागी न होता प्रादेशिक - आंतरराष्ट्रीय संस्था, देशातील उद्योगांचे प्रतिनिधी इं. चा ही समावेश होतो.

### २) उघड आणि खुला राजनय-

जुन्या राजनयात राजनयिक वाटाघाटी करार गुप्त ठेवले जात. नव्या राजनयात लोकशाहीच्या विकासामुळे पारदर्शकतेची अपेक्षा केली जाते. गुप्त राजनयाची जागा आता खुल्या राजनयाने घेतली असून, राजनयात पारदर्शकता आणि उत्तरदायित्वला महत्व प्राप्त झाले आहे.

### ३) व्यापक कार्यक्षेत्र –

जुन्या राजनयाचे क्षेत्र केवळ युरोपपुरते मर्यादित होते. पहिल्या-दुसऱ्या महायुद्धानंतर राजनयाचे क्षेत्र आंतरराष्ट्रीय बनले. तसेच राजनयाचे क्षेत्र विस्तारून विषयही बदलले. युद्ध, शांतता, सुरक्षा या विषयांबरोबरच अर्थकारण, सामाजिक सुरक्षा, विकास असे निम्न राजकारणाचे मुद्दे राजनायिक वाटाघाटींच्या अजेंड्यावर असतात.

### ४) राजदूतांची घसरती प्रतिष्ठा-

आधुनिक काळात संसूचनाची प्रगत साधने अस्तित्वात आली आहे. परिणामी जगात घडणाऱ्या विविध घडामोडींची माहिती ताबडतोब संबंधित देशाच्या शासकांना कळते.

परिणामी राजदूतांना राज्याच्या सर्वोच्च शासक, किंवा परराष्ट्र मंत्र्यांच्या आदेशानुसार राजनायिक कार्ये पार पाडावी लागतात. स्वईच्छेनुसार कोणताही निर्णय घेता येत नाही. बयाचदा राजदूतांना प्रसारमाध्यमांनाही सामोरे जावे लागते. म्हणजेच नव्या राजनयात राजदूतांची प्रतिष्ठा घसरत चालली आहे.

**५) राजदूतांचे प्रशिक्षण –**

आधुनिक काळात प्रशिक्षित, तज्ज्ञ, कुशल राजदूतांची आवश्यकता भासते. परिणामी प्रत्येक राज्याला परीक्षा घेऊन राजदूतांची निवड करणे, त्यांना प्रशिक्षित करणे गरजेचे असते. नव्या राजनयात या गोष्टीना अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे.

नव्या राजनयाचे विभिन्न पैलू - शीतयुद्ध कालीन राजनय

शीतयुद्धाच्या विशिष्ट परिस्थितीत राजनयाची वेगळी तंत्रे विकसित झाली. प्ररोधनाचे तंत्र जुने आहे. परंतु शीतयुद्धाच्या काळात त्यासाठी अण्वस्त्रांचा वापर केला.

**१) आण्विक राजनय (Nuclear Diplomacy) -**

प्रतिपक्षावर दबाव आणण्यासाठी अण्वस्त्रांचा वापर करण्याची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष धमकी देण्याच्या या तंत्रास आण्विक राजनय म्हणतात. १९९८ च्या अणुचाचण्यानंतर भारत-पाकिस्तानने काही प्रमाणात एकमेकांविरुद्ध या तंत्राचा वापर केला.

**2) आपत्कालीन राजनय (Crisis Diplomacy) -**

दोन महासत्तादरम्यान युद्धाची शक्यता अचानकपणे अनेकपटीने वाढून Crisis तयार होतो. अशा वेळी Crisis चे व्यवस्थापन करून (Crisis Management) युद्ध न होता त्यातून बाहेर पडण्यासाठी केलेल्या राजनयिक हालचाली म्हणजे आपत्कालीन राजनय होय.

उदा. १९६२ च्या क्युबातील क्षेपणास्त्र पेचप्रसंगाच्या वेळी (Cuban missile crisis) अमेरिका आणि सोव्हिएत संघाने आपत्ती व्यवस्थापनाचा प्रत्यय दिला.

डिसेंबर २००१ मध्ये भारतीय संसदेवर दहशतवाद्यांचा हल्ला झाला. त्यानंतर भारताने पाक सीमेवर सैन्याची मोठ्या प्रमाणात जमवाजमव केली. तेव्हा आपत्कालीन राजनायिक हालचाली घडून अखेर भारत-पाकमधील युद्ध टाळण्यात दोन्ही देशांबरोबर अमेरिकेलाही यश आले.

**३) शिखर राजनय (Summit Diplomacy) -**

दोन महासत्तांच्या शासनप्रमुखांची प्रत्यक्ष समोरासमोर भेट होऊन चर्चा होणे म्हणजे शिखर राजनय.

शीतयुद्धाच्या शेवटच्या काळात दोन्ही महासत्तांच्या शासनप्रमुखांशी समोरासमोर भेटी होऊन चर्चा होऊ लागल्या. वातावरण निवळण्याची सुरुवात, असा शिखर राजनयाचा अर्थ होऊ लागला.

**नवीन विश्वरचनेतील राजनय-**

१९९१ मध्ये शीतयुद्धाच्या अंतानंतर नवीन बहुध्रुवीय विश्व व्यवस्था अस्तित्वात येऊन पारदर्शक राजनयाचा विस्तार होईल, अशी आशा निर्माण झाली. ही आशा अजूनही प्रत्यक्षात उतरलेली दिसत नाही. मात्र शीतयुद्धानंतर जागतिक राजनायिक परंपरांमध्ये बदल होताना दिसत आहे. राजनायिक हालचाली खऱ्या अर्थाने जागतिक होत असून, आंतरराष्ट्रीय व्यापार, आर्थिक मदत यांचे महत्व वाढत आहे. म्हणजेच शीतयुद्धोत्तर काळात राजनयाचे स्वरूप अधिक व्यापक ब गुंतागुंतीचे होत आहे.

## १.५ भारताच्या परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक-

ब्रिटिश अंमल संपल्यानंतर स्वातंत्र्यानंतर १९४७ पासून भारताने स्वतंत्रपणे आपले परराष्ट्र धोरण आखण्यास आणि राबविण्यास सुरुवात केली. काही बाबतीत ब्रिटिशांच्या धोरणाचा वारसा पुढे चालवत, तर अनेक बाबतीत स्वतंत्र, नवीन भूमिका घेत भारताने आपले धोरण आखले आणि ते ठामपणे राबवले. पंडित नेहरूंना भारताच्या 'परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार' म्हटले जाते.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाची उदिष्टे – (Objective)**

प्रामुख्याने परराष्ट्र धोरण ठरविताना प्रत्येक राष्ट्र मुख्यतः राष्ट्रीय हितसंबंधाचा विचार करते. त्यानुसार काही दूरगामी तर जवळच्या टप्प्यातील उदिष्टे ठरविली जातात. सर्व देशांची दूरगामी उदिष्टे मूलत: सारखीच असतात. त्यात देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण, राष्ट्रीय सीमांचे संरक्षण, राष्ट्रीय सुरक्षा जोपासणे, विकास आणि संपन्नता साधणे या उदिष्टांचा समावेश होतो. भारताच्या परराष्ट्र धोरणाची प्रमुख उदिष्टे खालीलप्रमाणे-

१) देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणे

२) देशाच्या अखंडत्व, एकात्मता टिकविणे

३) देशाचा आर्थिक विकास साधणे

४) दक्षिण आशियातील विशिष्ट भौगोलिक परिस्थितीत सीमांचे संरक्षण करण्यास प्राथमिकता देणे

५) एक प्रभावशाली राष्ट्र म्हणून आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्वपूर्ण स्थान निर्माण करणे

६) शेजारील राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करणे

७) राष्ट्रीय हितसंबंधांचे संरक्षण करणे

८) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा टिकविणे

थोडक्यात, भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विचार केवळ राष्ट्रकेंद्रित नसून, विश्वकेंद्रित आहे.

### १.५.१ भारताच्या परराष्ट्र धोरणाची आधारभूत तत्वे (Principle)

भारताच्या परराष्ट्र धोरणावर ब्रिटिश राजवटीचा प्रभाव पडलेला आहे. परराष्ट्रधोरण निर्णयप्रक्रियेवर ब्रिटिश शासनाचा प्रभाव जाणवतो. तसेच परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार नेहरुंच्या विचारांवर ब्रिटिश उदारमतवादी परंपरेचा प्रभाव पडलेला असल्याने या सर्वाचे प्रतिबिंब भारतीय परराष्ट्र धोरणात पडलेले आहे.

याशिवाय काही विचारधारांचाही प्रभाव परराष्ट्र धोरणावर पडलेला आहे. त्या खालीलप्रमाणे-

१) गांधींचा अहिंसावाद

२) रवीद्रनाथ टागोर यांचा आंतरराष्ट्रीयवाद

३) महर्षी अरविन्दो यांचा अध्यात्मवाद

४) पं. नेहरूंचा लोकशाही समाजवाद

या चार विचारसरणीतून भारतीय परराष्ट्र धोरणाची आधारभूत तत्त्वे विकसित झाली आहेत. जी खालीलप्रमाणे

- वसाहतवाद आणि साम्राज्यवादाला विरोध
- वसाहतवादाच्या आधार असणाऱ्या वंशवादाला विरोध
- आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून आर्थिक-सामाजिक विकास साधणे आणि राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्षाची सोडवणूक करणे
- शांततामय सहजीवन, हे तत्व 'जगा आणि जगू द्या' या तत्वाशी नाते सांगणारे आहे.
- राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा आदर करणे
- आंतरराष्ट्रीय संघर्षाची शांततामय मार्गाने सोडवणूक करणे
- आशिया- आफ्रिका खंडातील (तिसरे जग) गरीब-विकसनशील राष्ट्रांना एकत्र करून, त्यांच्यातील सहकार्यासाठी एक सामूहिक व्यासपीठ तयार करणे.
- शेजारील राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे
- कोणत्याही मोठ्या राष्ट्राच्या दबावाला बळी न पडता स्वतंत्रपणे निर्णय घेणे, म्हणजेच निर्णय स्वातंत्र्याचा अधिकार
- युद्धाचा धोका टाळून विश्वशांती आणि सुरक्षिततेसाठी निःशस्त्रीकरणाच्या प्रक्रीयेला समर्थन देणे
- गटनिरपेक्षता
- आंतरराष्ट्रवादाचा पुरस्कार करणे.

### १.५.२ परराष्ट्र धोरणातील बदल-

परराष्ट्र धोरणात काळानुसार बदल होणे अपरिहार्य आणि आवश्यक असते. भारताच्या परराष्ट्रधोरणविषयक सैद्धांतिक दृष्टिकोनातही काळानुरूप बदल झाले आहे.

नेहरूंच्या विचारांवर उदारमतवादी विचारांचा प्रभाव असल्याने त्यांनी परराष्ट्र धोरणाचा आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून विचार केला.

इंदिरा गांधींच्या काळात वास्तववादी दृष्टिकोनाचे प्राबल्य असल्याने परराष्ट्र धोरण अधिक राज्यकेंद्री बनले. लष्करी बळाची उभारणी करण्यास त्यांनी प्राधान्य दिले.

राजीव गांधी शासनकाळात देशाच्या शक्तिप्रदर्शनाचे प्रयत्न करण्यात आले.

BJP प्रणित रालोआ सरकारच्या काळात वास्तववादाची नवी चौकट तयार झाली. परराष्ट्र धोरणास सुरक्षाविषयक उद्दिष्टांबरोबरच विशेषत: आंतरराष्ट्रीय व्यापारासारख्या आर्थिक उद्दिष्टांचीही बैठक दिली.

देशातील काँग्रेस च्या सरकारांनी जाणीवपूर्वक दक्षिण आशियाई शेजाऱ्यांबरोबर हडेलहप्पीचे धोरण राबवून ब्रिटिशांचा वारसा पुढे चालू ठेवला परंतु जनता पक्ष, जनता दल, संयुक्त आघाडी, रालोआ अशा बिगर काँग्रेसी सरकारांनी दक्षिण आशियाई राष्ट्रांबरोबर संबंध सुधारण्यावर भर दिला.

परंतु सर्वात महत्वाचे म्हणजे लहान शेजाऱ्यांबरोबर परस्परतेचा आग्रह न धरण्याचे तत्त्व होय. लहान शेजाऱ्यांना सवलती देऊ करताना भारताने तशाच सवलतींची लहान शेजाऱ्यांकडून अपेक्षा धरलेली नाही. गुजराल यांच्या काळात भारताने दक्षिण आशियातील मोठ्या भावाची (Big Brother) अशी भूमिका निभावलेली आहे.

अर्थात नेहरूंच्या आदर्शवादी उदारमतवादाला वास्तववादाची एक किनार होती. एरव्ही आंतरराष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या भारताने आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाच्या माध्यमातून स्वतःच्या आण्विक कार्यक्रमांवर निर्बंध लादून घेण्याचे नाकारले. वास्तववादी परराष्ट्रधोरण राबवणाऱ्या राजीव गांधींनी सार्वत्रिक आणि संपूर्ण निशस्त्रीकरणाचा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरून हिरीरीने पुरस्कार केला. शेजाऱ्यांबरोबर लवचिकतेच्या धोरणाचा पुरस्कार करणाऱ्या गुजराल यांनी CTBT ला ठाम विरोध केला. थोडक्यात, इतर राष्ट्रांप्रमाणे भारताच्या परराष्ट्र धोरणातही काही बाबतीत सैद्धांतिक संमिश्रता दिसून येते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रालोआ सरकारच्या काळात भारतीय परराष्ट्र धोरण अधिकाधिक वास्तववादी बनले. सत्तेवर आल्यावर लगेचंच मोदी यांनी शेजारील राष्ट्रांबरोबर मैत्रीपूर्ण व सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित करण्यावर व वाढवण्यावर भर दिलेला दिसतो.

### १.५.३ भारताच्या परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक –

#### १) भौगोलिक घटक-

भारताच्या परराष्ट्र धोरणावर देशाच्या भौगोलिकतेचाही प्रभाव पडलेला आहे. भारताच्या पश्चिमेस पश्चिम आशिया आणि पूर्वेस आग्नेय आशिया ही क्षेत्रे आहेत. या

सर्व देशाशी भारताचे पूर्वापार संबंध आहेत. क्षेत्रीय सानिध्यामुळे या प्रदेशातील समस्या, संघर्ष, राजकारण, अर्थकारण यांचा परिणाम भारताच्या धोरणावर होतो. पूर्वीचा सोव्हिएत रशिया (आताचा रशिया) सान्निध्य असल्यामुळे काटेकोरपणे गटनिरपेक्षतेचे पालन केले असले तरी त्या देशाबरोबरचे संबंध अमेरिकेबरोबरील संबंधापेक्षा वेगळे राहिले आहे.

पाकिस्तान, भूतान, बांग्लादेश या लहान भारतीय शेजाऱ्यांची सीमा एकमेकांलगत नाही. परंतु त्या सर्वांची भारताबरोबर भौगोलिक सलगता आहे. याचाही परिणाम संपूर्ण दाक्षिण आशियाच्या राजकारणावर होतो.

भारताच्या तिन्ही बाजूंना असणारे समुह, भारताचा मोठा समुहकिनारा, हिंदी महासागरातील स्थान याचाही परिणाम परराष्ट्र धोरणावर होतो. हिंदी महासागरात होणाऱ्या सर्व देशांच्या व्यापारी - सामरिक हालचालीमुळे भारताचे धोरण प्रभावित होते. परिणामी नाविक सामर्थ्याचा पाठपुरावा करणे भारतासाठी आवश्यक ठरते.

### २) ऐतिहासिक घटक -

भारताला प्राचीन काळापासून एक विशिष्ट संस्कृती लाभली आहे. यामध्ये भारतीय संस्कृतीच्या काही पारंपरिक मूल्यांचा समावेश होतो. शांतता आणि सहजीवन या मूल्यांचे प्रतिबिंब भारताच्या परराष्ट्र धोरणात पडलेले आहे. मोठे आणि प्रभावशाली राष्ट्र बनण्याची भारताची महत्वाकांक्षा या ऐतिहासिक वारशातूनच पुढे आली आहे. त्याचप्रमाणे परराष्ट्रांच्या आक्रमणाच्या धोरण, दुसऱ्याचे प्रदेश बळकावण्याला असलेला विरोधही पारंपरिक मूल्यांचे प्रतिबिंब आहे.

### ३) आर्थिक घटक-

परराष्ट्र धोरणाच्या आखणी आणि निर्मितीत आर्थिक घटक नेहमी महत्वाची भूमिका बजावतात. भारताच्या गटनिरपेक्षतेच्या धोरणाला राजकीय सामरिक, आर्थिक संदर्भ आहे. वासाहतिक शोषणातून आलेले दारिद्र्य, मागासलेपणा यातून बाहेर पडण्याची गरज सुरुवातीला तीव्र होती. त्याचबरोबर मदतकर्त्या राष्ट्रांचा (अमेरिका - सो रशिया) राजकीय लाभ देणारी आर्थिक मदत नाकारण्याची हिंमतही भारताने दाखविली. सरकारी क्षेत्र आणि आयातीला प्राधान्य देणारे आर्थिक धोरण राबविल्याचा परिणाम भारताच्या परराष्ट्र धोरणावर झाला.

अलीकडे उदारीकरण- खाजगीकरण- जागतिकीकरणाचे आर्थिक धोरण अंमलात आल्यापासून परराष्ट्रधोरणही बदलले. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील परिणामांचाही (WTO तील एकात्मिकरण) परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडला.

### ४) राजकीय व्यवस्था-

भारताने संसदीय लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केला आहे. भारताच्या संसदीय व्यवस्थेत धोरणाची आखणी आणि ते राबवणे यावर मंत्रिमंडळाचा वरचष्मा आहे.

संसदेची भूमिका मुख्यतः राखणदाराची आहे. त्यामुळे सत्तेतील राजकीय नेतृत्वाचा प्रभाव परराष्ट्र धोरणावर पडलेला दिसतो.

नेहरू आणि इंदिरा गांधी पंतप्रधान असताना, परराष्ट्र धोरणावर त्यांचेच वर्चस्व असे. मोरारजी देसाई, राजीव गांधी, अटलबिहारी वाजपेयी यांचीही परराष्ट्र धोरण निर्मितीतील भूमिका महत्वाची होती.

पंतप्रधान पदाबरोबरच परराष्ट्रमंत्रीपदही महत्वाचे असते. वाजपेयी, गुजराल हे प्रभावी परराज्यमंत्री होते. भारताच्या परराष्ट्रधोरण निर्मितीत नोकरशहाही महत्वाची भूमिका बजावतात. भारतात पंतप्रधानांचे सचिव, पंतप्रधान कार्यालयाचे सचिव, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, परराष्ट्र खात्याचे सचिव या पदावरील व्यक्ती महत्वाच्या असतात.

पी. एन. ह्क्सर, पी. सी. अलेक्झांडर, ब्रजेश मिश्रा, जे.एन दीक्षित, या व्यक्तीनी देशाच्या परराष्ट्र धोरण निर्मितीत महत्वाचे योगदान दिले आहे.

**५) आंतरराष्ट्रीय व्यवस्था**

इतर कोणत्याही देशाच्याप्रमाणे भारताच्याही परराष्ट्र धोरणावर आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा परिणाम झालेला आहे. शीतयुद्ध, महासत्तांमधील तीव्र स्पर्धा, आंतरराष्ट्रीय व्यवस्था, यांचा प्रभावही भारताच्या धोरणावर पडला. चीन-रशिया संबंध, ईस्त्राईल-पॅलेस्टाईन संघर्ष अशा घटनांमुळेही देशाचे परराष्ट्र धोरण प्रभावित झाले. शीतयुद्धोत्तर काळात एकध्रुवीय व्यवस्था, जागतिकीकरण, यांची दखल घेऊन देशाचे धोरण बदलावे लागले.

## १.६. विद्यापीठीय प्रश्न

१) परराष्ट्र धोरण म्हणजे काय? ते सांगून परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे विशद करा

२) परराष्ट्र धोरण म्हणजे काय? परराष्ट्र धोरणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा

३) राजनय म्हणजे काय? राजनयाच्या बदलत्या स्वरुपाची चर्चा करा.

४) राजनय म्हणजे काय? राजनयाचे प्रकार स्पष्ट करा.

५) राजनयाची आधुनिक काळातील आंतरराष्ट्रीय राजकारणातील भूमिका स्पष्ट करा.

६) परराष्ट्र धोरण म्हणजे काय? भारताच्या परराष्ट्र धोरणाचे निर्धारित घटक सांगा.

७) परराष्ट्र धोरण म्हणजे काय? भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांची चर्चा करा.

## १.७. संदर्भग्रथ-

१) आंतरराष्ट्रीय संबंध: शीतयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण - अरुणा पेंडसे, उत्तरा सहस्त्रबुद्धे, ओरिएंट ब्लॅकस्वॉन, मुंबई

2) आंतरराष्ट्रीय संबंध - डॉ. शैलेंद देवळाणकर, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

3) भारताचे परराष्ट्र धोरण- डॉ शांताराम भोगले, विद्या प्रकाशन, नागपूर

४) आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण- डॉ. वासंती रासम, डॉ. करिअप्पा खापरे, फडके प्रकाशन, कोल्हापूर

५) भारताचे परराष्ट्र धोरण- सातत्य आणि स्थित्यंतर- डॉ शैलेंद्र देवळाणकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

❄❄❄❄❄❄❄

# २

# भारत आणि प्रमुख महासत्ता

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.३.१ समकालीन जागतिक राजकारणात भारताची  वाटचाल.

२.३.२ भारत आणि प्रमुख महासत्ता

२.४ सारांश

२.५ अधिक वाचनासाठी संदर्भ

## २.१ उद्दिष्टे

**भारत आणि प्रमुख महासत्ता** या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. महासत्ता बनण्याच्या दिशेने भारताची वाटचाल समजून सांगता येईल.

२. भारत व प्रमुख महासत्ता यांच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील भूमिका सांगता येतील.

३.भारत व प्रमुख महासत्ताचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्थान समजावून सांगता येईल.

## २.२ प्रास्ताविक

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करताना प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रहिताच्या संदर्भात धोरण  आखताना दिसून येते. राष्ट्रहित राखण्यासाठी प्रत्येक राष्ट्रांना इतर राज्यासोबत आपले संबंध प्रस्थापित करावे लागतात आणि त्या दृष्टिकोनातून प्रत्येक राष्ट्र वाटचाल करत असते. आंतरराष्ट्रीय राजकारणात ज्या राष्ट्राची शक्ती प्रभावी असते ते राष्ट्र राष्ट्रहित योग्य पद्धतीने साध्य करतात. राष्ट्राचे परस्पर संबंध पाहता ते बदलत्या स्वरूपाचे असतात. त्यामुळे परिस्थितीनुप शक्तीच्या प्रभावावरून राष्ट्रहित बदलताना दिसून येतात.आंतरराष्ट्रीय संबंधांमधील शक्ती ही हवामानासारखी असते आणि ज्याप्रमाणे हवामानशास्त्रज्ञ वादळ आणि पावसाचा अंदाज वर्तविण्याचा प्रयत्न करतात, त्यावेळी शेतकरी आपल्या भूमिका बदलतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणतीही परिस्थिती कायमस्वरूपी सारख्याच पद्धतीने राहत नाही तर त्यामध्ये वेळोवेळी बदल होताना आपल्याला दिसून येतात. ह्याचे मुख्य कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणाचा पाया हा शक्ती आहे आणि या शक्तीसाठीच जागतिक राजकारणात आपल्याला संघर्ष पहावयास मिळतात. त्यामुळे सत्तेसाठी संघर्ष हा सर्व काळामध्ये आपल्याला पाहावयास मिळतो सत्ते शिवाय कोणतेही राजकारण होऊ शकत नाही. त्यामुळे प्रत्येक राज्याचे संरक्षण, उन्नती, विकासासाठी शक्ती हा महत्त्वाचा घटक

ठरतो. शक्ती ही आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव टाकते त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विचार करताना शक्तीच्या आधारावर ज्या काही महासत्ता निर्माण झालेल्या आहेत त्या महासत्तांचा आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रभाव पाहता भारत आणि महासत्तांचे संबंध कोणत्या स्वरूपाचे राहिले आहेत याची चर्चा करणे क्रमप्राप्त ठरते.

## २.३ विषय विवेचन

### २.३.१ समकालीन जागतिक राजकारणात भारताची वाटचाल.

१९९० साला नंतर भारताचे अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी खऱ्या अर्थाने भारताच्या आर्थिक धोरणात अमूल अमुलाग्र बदल करून त्यांनी जागतिकीकरण आणि उदारीकरण प्रक्रिया दृढ केली. त्यांच्या पंतप्रधानांच्या काळामध्ये हे संबंध जगाशीअधिक दृढ करून अमेरिका ,रशिया ,फ्रान्स, ब्रिटन जर्मन, ऑस्ट्रेलिया, युरोपियन संघ यांच्याबरोबर सलोख्याचे आर्थिक हितसंबंध निर्माण करून खऱ्या अर्थाने भारत महासत्ता होण्याची बिजारोपण त्यांनी केली.

### माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कालखंड

भारतात २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत सत्तांतर होऊन २०१४ ते २०१९ या कालखंडात देशाला नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व लाभले. त्यांनी जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा चांगलीच सुधारली असून, जगातील वेगाने विकसित होणारा देश म्हणून भारताकडे आज पाहिल्या जात आहे. विशेष म्हणजे यात नरेंद्र मोदींचा मोठा वाटा आहे. २०१४ ला पहिल्यांदाच सरकार स्थापन होताच त्यांनी जागतिक राजकारणात भारताची प्रतिमा मजबूत करण्यासाठी अनोखे पाऊल उचलले. फ्रान्सला जाऊन भारत आणि फ्रान्स यांच्यातील धोरणात्मक मुद्यांवर नवीन मजबूत संबंधांचा पाया रचला. ब्राझीलला गेल्यावर ते लोकांशी आणि राष्ट्राध्यक्षांशी इतक्या सहजतेने मिसळले की वर्षानुवर्षे दृढ असलेल्या संबंधांना तिथेही नवे वळण मिळाले. आज ब्राझील आणि भारताने ऊर्जेपासून इतर अनेक क्षेत्रात एकत्र काम करण्यास सुरुवात केली आहे. कोविडशी लढताना नरेंद्र मोदींनी ब्राझीलला ज्या प्रकारे मदत केली, त्या ठिकाणच्या राष्ट्राध्यक्षांनी त्याचे कौतुक केले. मोदींनी ऑस्ट्रेलियासोबतच्या संबंधांमध्ये एक नवा सकारात्मक अध्यायही जोडला आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान मॉरिसन यांच्याशी त्यांच्या मजबूत आणि मैत्रीपूर्ण संबंधाचे नवे उदाहरण जगाने पाहिले.

### भारताचे जगाशी विविध पातळीवर संबंध.

कोणत्याही राष्ट्राची आर्थिक, लष्करी, राजकीय आणि सामाजिक स्थिती ही आंतरराष्ट्रीय राजकारण, इतर देशांशी असलेल्या संबंधांमधील सामर्थ्य आणि स्थान या मुद्यांवरून निश्चित केले जात असले तरी त्याच्या राज्यकर्त्याची किंवा नेत्याची विचारसरणी, संवेदनशीलता आणि स्वभाव हे सुद्धा महत्वाचे ठरतात. कोणत्याही राष्ट्राशी संबंध कोणत्या दिशेने न्यावेत, आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या राष्ट्राची प्रतिमा उंचावण्यासाठी कोणत्या मुद्यांवर लक्ष ठेवावे, द्विपक्षीय आणि बहुपक्षीय संबंधांना कोणती दिशा द्यायला हवी, किती गती द्यायला हवी हे सर्व महत्वाचे आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरगामी विचाराने अमेरिका, ब्रिटन, रशिया, जपान, ऑस्ट्रेलिया, कोरिया, न्यूझीलंड, फ्रान्स आदी देशांशी सकारात्मक आणि उत्साही

संबंधांचे नवे पर्व सुरू झाले. पूर्व किंवा पश्चिमेकडील देश आणि आखाती देशांशी भारताचे संबंध दृढ करण्यासाठी नरेंद्र मोदींनी प्रयत्न केले. आज भारताच्या सकारात्मक ऊर्जेचा प्रभाव जगभर स्पष्टपणे पाहायला मिळतोय.

## भारताची जागतिक पातळीवर विविध क्षेत्रात आघाडी

२०१९ नंतर जागतिक स्तरावर भारताची प्रतिमा चांगलीच सुधारली असून, जगातील वेगाने विकसित होणारा देश म्हणून भारताकडे पाहिले जात आहे. विशेष म्हणजे यात नरेंद्र मोदींचा मोठा वाटा आहे. २०१४ ला पहिल्यांदाच सरकार स्थापन होताच त्यांनी जागतिक राजकारणात भारताची प्रतिमा मजबूत करण्यासाठी अनोखे पाऊल उचलले. त्यांनी फ्रान्सला जाऊन भारत आणि फ्रान्स यांच्यातील धोरणात्मक मुद्यांवर नवीन मजबूत संबंधांचा पाया रचला. ब्राझीलला गेल्यावर ते लोकांशी आणि राष्ट्राध्यक्षांशी इतक्या सहजतेने मिसळले की वर्षानुवर्षे दृढ असलेल्या संबंधांना तिथेही नवे वळण मिळाले. आज ब्राझील आणि भारताने ऊर्जेपासून इतर अनेक क्षेत्रात एकत्र काम करण्यास सुरुवात केलीय. कोविडशी लढताना नरेंद्र मोदींनी ब्राझीलला ज्या प्रकारे मदत केली, त्या ठिकाणच्या राष्ट्राध्यक्षांनी त्याचे कौतुक केले. मोदींनी ऑस्ट्रेलियासोबतच्या संबंधांमध्ये एक नवा सकारात्मक अध्यायही जोडला.आपण भारताच्या स्वातंत्र्याचा ७५ वा अमृत महोत्सव साजरा केला. मागील ७५ वर्षांमध्ये भारताने अनेक चढउतार पाहिले. अनेक आव्हानाचा सामना करत असताना भारत महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे. २०५० पर्यंत महासत्ता होण्याचे लक्ष्य गाठता येईल, असे तज्ज्ञांचे मत आहे. खरे तर भारत ही जगातील सहावी मोठी अर्थव्यवस्था आहे. लष्करी सामर्थ्यात हा चौथ्या क्रमांकाचा शक्तिशाली देश आहे. भारत हा जगातील सर्वात मोठी युवा शक्ती असलेला देश आहे, जो विकासाला वेगाने पुढे नेण्यास सक्षम आहे. अचूक आणि प्रभावी मुत्सद्देगिरीचा परिणाम म्हणून जागतिक स्तरावर भारताचे स्थान सातत्याने मजबूत होत आहे.कोरोनाच्या काळात जगाने भारताच्या औषध आणि आयटी उद्योगातही भारताची अभूतपूर्व कामगिरी पाहिली. जगात चौथ्या क्रमांकावर उभा असलेला भारत अवकाश क्षेत्रात आपली ताकद दाखवत आहे. पायाभूत सुविधांचा झपाट्याने विस्तार होत आहे आणि प्रशिक्षित कामगारांची वाढती संख्या यामुळे भारताला उत्पादन केंद्र बनवता आले आहे. भारताचा वाढता आर्थिक विकास दरही जगाचे लक्ष वेधून घेत आहे. बदलत्या आर्थिक परिस्थितीत विदेशी गुंतवणुकीचा वेग वाढत आहे. उत्पादनापासून ते माहिती तंत्रज्ञानापर्यंत, रासायनिक उद्योगापासून इलेक्ट्रॉनिक्स उद्योगापर्यंत, कृषी क्षेत्रापासून ते सेवा क्षेत्रापर्यंत भारत जगाच्या नकाशावर आपले अस्तित्व निर्माण करीत आहे.

ऑस्ट्रेलियाच्या लोवी इन्स्टिट्यूटने नुकत्याच जाहीर केलेल्या एशिया पॉवर इंडेक्स २०२१ नुसार, अमेरिका, चीन आणि जपाननंतर भारत जगातील सर्वात शक्तिशाली देशांमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. भारतीय लष्करी क्षेत्रात झपाट्याने आधुनिकीकरण होत आहे, ज्यामुळे केवळ संरक्षण उपकरणांच्या निर्मितीतच वाढ होत नाही, तर परकीय गुंतवणूक ही वाढत आहे. आज भारताचे सैन्य कोणत्याही शक्तीला आव्हान देण्यास सक्षम आहे. आता काळाची गरज आहे की, सार्क देशांव्यतिरिक्त भारताने कंबोडिया, म्यानमार, फिलिपिन्स, थायलंड, व्हिएतनाम, सिंगापूर, मलेशिया, इंडोनेशिया इत्यादी आशियाई देशांसोबत तांत्रिक, आर्थिक आणि धोरणात्मक संघटना तयार करण्यात महत्वाची भूमिका बजावली पाहिजे.

चीनच्या कट्टरतेने ग्रासलेले दक्षिण आशियाई देश भारताच्या सैन्यासोबत एक मोठी संघटना तयार करू शकतात. यामुळे भारतीय लष्कराचा आवाका तर खूप वाढेलच, पण सागरी क्षेत्रात चीनचा वाढता प्रभावही रोखता येईल. या देशांसोबतच्या व्यापारातून भारताला दोन मोठे फायदे होतील. प्रथम व्यापारातील प्रचंड वाढ भारताच्या उत्पादनाचे केंद्र बनण्याच्या उद्दिष्टाला चालना देईल. दुसरे म्हणजे रुपयाच्या आंतरराष्ट्रीय स्वीकृतीची व्याप्ती वाढवून, आर्थिक स्थिरतेचा आधारही वाढेल. इस्रायलच्या वरिष्ठ नेत्यांनी भारताला स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल अभिनंदन केले असून, देश एक प्रादेशिक आणि जागतिक शक्ती म्हणून उदयास येत आहे. त्याच वेळी जगाला एक चांगले स्थान बनवण्याच्या दिशेने भारत 'इनोव्हेशनची महासत्ता' बनेल.

इस्रायलचे राष्ट्राध्यक्ष आयझॅक हरगोझ यांनी भारताच्या स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांच्या कार्यक्रमाला हजेरी लावली असता भारत-इस्रायल राजनैतिक संबंधांना ३० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आठवणींना उजाळा दिला. यावेळी बोलताना हरगोज म्हणाले की, भारत एक प्रादेशिक आणि जागतिक शक्ती म्हणून झपाट्याने प्रगती करीत आहे. भारताच्या सहभागाची पातळी जितकी जास्त असेल तितक्या वेगाने सकारात्मक बदल घडतील, असा त्यांना विश्वास आहे. भारतीय राष्ट्रीयतेच्या अभिमानाच्या गौरव सोहळ्याचा इस्रायल हा भागीदार आहे. आम्ही त्यांना शांती आणि समृद्धीच्या शुभेच्छा देतो. उज्ज्वल भविष्याचे वचन पाळत आम्ही दोघेही असेच एकत्र काम करत राहू. दोन्ही देशांच्या प्राचीन गौरवशाली इतिहासाचा उल्लेख करून इस्रायलचे राष्ट्राध्यक्ष म्हणाले की, दोन्ही प्राचीन देश शतकानुशतकांच्या शिकवणी आणि वारशाने समृद्ध आहेत. त्यामुळे एक प्रकारे इस्रायलनेही भारत येत्या काही वर्षांत महासत्ता बनेल हे मान्य केलंय, पण त्यासाठी भारताला काही धोरणात्मक बदलही करावे लागणार आहेत.

जगाच्या बदलत्या परिस्थितीत महासत्ता बनण्यासाठी मजबूत अर्थव्यवस्था असणे अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही महासत्ता देशाच्या आर्थिक धोरणांच्या दिशाही परराष्ट्र धोरणावरूनच ठरतात. जागतिक बँकेच्या अहवालानुसार २०५० पर्यंत जगाच्या अर्थव्यवस्थेत ६० टक्के वाटा आशियाई देशांचा असेल. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या जुलै २०२२ च्या अहवालानुसार, २०२१ मध्ये भारताचा जीडीपी वाढीचा दर जगात सर्वाधिक होता आणि २०२२ मध्येही तो सर्वाधिक राहण्याची अपेक्षा आहे. यामध्ये मेक इन इंडिया कार्यक्रमाने प्रमुख भूमिका बजावली आहे, ज्यामुळे औद्योगिक बळासह जीडीपी मजबूत झाला. आज परदेशी कंपन्या त्यांचे प्लांट उभारण्यासाठी भारताकडे वळत आहेत.असा अंदाज आहे की, २०३० पर्यंत भारत जपानला मागे टाकून जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल. त्यानंतर भारताचा जीडीपी सध्याच्या २.७ ट्रिलियन डॉलरवरून ८.४ ट्रिलियन डॉलर होईल. भारतातील मोठ्या मध्यमवर्गामुळे २०२० च्या तुलनेत २०३० पर्यंत उपभोगाच्या वस्तूंची मागणी दुप्पट होईल. यामुळे बाजाराचा आकार १.५ ट्रिलियन वरून ३ ट्रिलियन डॉलरपर्यंत वाढेल. भारताची वाढती ग्राहक बाजारपेठ हे गुंतवणूकदारांच्या आकर्षणाचे केंद्र आहे. ४ जी तंत्रज्ञानाने भारतातील ई-कॉमर्स कंपन्या आणि स्टार्टअप्सना मोठी चालना दिली आहे. आता ५ जीमुळे भारतातील बाजाराची रचनाच बदलेल.

किंबहुना, येत्या काळात तोच देश वेगाने महासत्ता बनणार आहे, ज्याकडे आधुनिक तंत्रज्ञान असेल. तंत्रज्ञानात गुंतवणूक केल्याशिवाय कोणताही देश महासत्ता होण्याचा विचारही करू

शकत नाही. इस्त्रोने रॉकेटद्वारे १०४ उपग्रह अवकाशात पाठवून जगाचे लक्ष वेधून घेतले, हा भारताच्या तंत्रज्ञानाचा चमत्कार होता. आज इस्त्रो जगातील सर्वात स्वस्त उपग्रह बनवण्यासाठी ओळखली जाते. केवळ विकसनशीलच नाही तर विकसित देशही आपले उपग्रह अवकाशात पाठवण्यासाठी इस्त्रोसोबत करार करण्यास उत्सुक आहेत. आता भारताने कृत्रिम बुद्धिमत्ता, अनुवांशिक अभियांत्रिकी, रोबोटिक्स यांसारख्या क्षेत्रात संशोधन आणि गुंतवणुकीवर अधिक भर दिला पाहिजे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीसुद्धा गेल्या काही दिवसांपूर्वी गुजरातमधील गांधीनगर येथील गिफ्ट सिटी येथे देशातील पहिल्या आंतरराष्ट्रीय बुलियन एक्सचेंजचे उद्घाटन केले असता सिंगापूर, ब्रिटन, अमेरिका यांसारख्या देशांच्या पंक्तीत भारतही सामील झाल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. भारत शतकानुशतके आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आयात-निर्यात करीत आहे, मात्र स्वातंत्र्यानंतर कमकुवत दूरदृष्टीमुळे त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे पंतप्रधान मोदींनी अधोरेखित केले होते. दुसरीकडे बदलत जाणारे जागतिक संदर्भ, मध्य आशियातील राजकीय चढाओढ, भारत-अमेरिका संबंध, अर्थव्यवस्थेवर महागाईचा परिणाम यामुळे महासत्तेकडे सुरू असलेल्या घोडदौडीला लगाम लागतो काय, अशीही शक्यता तज्ज्ञांकडून वर्तवण्यात येत आहे.

विशेष म्हणजे युरोपीय देश आणि भारताची तुलना करायची झाल्यास भारताची लोकसंख्या आणि चांगला जीडीपी याबाबतीत युरोपीय देश भारताची प्रगती नाकारू शकत नाहीत. जीडीपीत आणखी स्थैर्य आणण्यासाठी भारताला आणखी काही वर्षे काम करावे लागेल. यासाठी आर्थिक नियंत्रण आणि योग्य नीती राबवण्याची गरज आहे. भारत आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे.जग सध्या आंतरराष्ट्रीय संबंधांच्या नव्या युगात प्रवेश करीत आहे. एकध्रुवीयवाद संपुष्टात आला असून द्विध्रुवीय व्यवस्थेस मर्यादा आहेत. सध्याच्या परिस्थितीत जागतिक महासत्ता म्हणून अमेरिका संघर्ष करीत असल्याचे स्पष्ट दिसत आहे, असे प्रतिपादन परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी केले. जेजी क्रॉफर्ड ओरेशन – २०२१ ला संबोधित करताना ते बोलत होते.आगामी काळात चीनच्या उदयाकडे प्रमुख जागतिक सत्तांच्या ताकदीच्या पार्श्वभूमीवर विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

### २.३.२ भारत आणि प्रमुख महासत्ता

भारत आणि प्रमुख महासत्ताचे संबंध पाहताना अमेरिका, चीन, रशिया त्यांच्या संबंधाची चर्चा करणे क्रमप्राप्त ठरते. भारताचे प्रमुख महासत्ताशी संबंध पाहताना ते संबंध कधी कधी सहकार्याचे तर कधीकधी असहकाराचे सुद्धा राहिल्याचे असे दिसून येतात. भारताच्या१९९८ मध्ये अणुचाचण्यामुळे भारतावर अनेक प्रकारची निर्बंध लादण्यात आली तरीही ते निर्बंध भारताने यशस्वीरीत्या झुगारून भारत हा जागतिक राजकारणात आज वेगळे स्थान प्राप्त केले आहे.

#### २.३.२.१ भारत आणि अमेरिका संबंध :

भारताच्या स्वातंत्र्यापासून, युनायटेड स्टेट्सबरोबरच्या संबंधांमुळे शीतयुद्ध-काळातील अविश्वास आणि भारताच्या आण्विक कार्यक्रमामुळे दुरावले आहेत. अलिकडच्या काही वर्षांत

हे संबंध उबदार झाले आहेत आणि विविध आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये सहकार्य मजबूत झाले आहेत.

जागतिक रचना अमेरिकेच्या नेतृत्वामुळे एकध्रुवीय बनली सोवियत महासंघाच्या विघटनाने अमेरिकेला स्पर्धक शिल्लक राहिली नाही. १९४५ ते १९९० या काळात भारतीय परराष्ट्र धोरणात त्यांची मैत्री अधिक दृढ बनली होती. भारताचे पारंपारिक शत्रू राष्ट्र पाकिस्तान हे पूर्णपणे अमेरिकेच्या अश्रित असल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर विशेषतः युनो मध्ये रशिया भारताचा समर्थक झाला. सोवियत महासंघाच्या विघटनाने जगाची रचना एक ध्रुवीय झाली. भारताने आपल्या पारंपारिक मित्राबरोबर अमेरिकेची असणारे द्विपेक्षित संबंध मजबूत करणे सुरू केले आहेत.भारत-यू.एस. यावर आधारित द्विपक्षीय संबंध "जागतिक धोरणात्मक भागीदारी" मध्ये विकसित झाले आहेत.सामायिक लोकशाही मूल्ये आणि द्विपक्षीय, प्रादेशिक आणि हितसंबंधांचे वाढते अभिसरण आणि जागतिक समस्याचा विचार करता भारतातील सरकारने विकास आणि चांगल्या गोष्टींवर भर दिला आहे. मोदी शासनामुळे द्विपक्षीय संबंधांना पुनरुज्जीवित करण्याची आणि अंतर्गत सहकार्य वाढविण्याची संधी निर्माण झाली आहे.आज भारत-यू.एस. द्विपक्षीय सहकार्य आहे. त्यामध्ये प्रामुख्याने व्यापक-आधारित आणि बहु-क्षेत्रीय, व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण आणि सुरक्षा, शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, उच्च-तंत्रज्ञान, नागरी आण्विक ऊर्जा, अंतराळ तंत्रज्ञान आणि अनुप्रयोग, स्वच्छ ऊर्जा, पर्यावरण, शेती आणि आरोग्य यावर दोन्ही देशात सहकार्यात्मक स्वरूपाचे संबंध राबवण्यात येत आहेत.

१३ ऑक्टोबर १९४९ पंतप्रधान नेहरू अमेरिका दौऱ्यावर गेले असता अमेरिकेचे अध्यक्ष हॅरी एस. ट्रुमन यांची भेट घेतली. हा दौरा भारताच्या विकसनशील शीतयुद्धात तटस्थतेच्या औपचारिक घोषणेपूर्वीचा होता. यामुळे संपूर्ण शीतयुद्धात यूएस-भारत संबंधांचा टोन सेट होतो त्यामध्ये अडथळे निर्माण होताना दिसतात.

१० फेब्रुवारी १९५९ राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधींच्या अहिंसक लढ्याने प्रेरित होऊन, अमेरिकेचे नागरी हक्क नेते मार्टिन ल्यूथर किंग जूनियर एका महिन्याच्या दौऱ्यासाठी भारतात आले . ते पंतप्रधान नेहरू, गांधींचे कुटुंब आणि मित्र आणि विद्वानांना भेटले. युनायटेड स्टेट्सला परतल्यानंतर, किंग म्हणतो की या सहलीने अहिंसक प्रतिकारासाठी त्याच्या वचनबद्धतेची पुष्टी केली आणि "न्याय आणि मानवी प्रतिष्ठेच्या संघर्षात पीडित लोकांसाठी उपलब्ध असलेले सर्वात शक्तिशाली शस्त्र" म्हणून गांधीवादी अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा गौरव केला.

९ डिसेंबर १९५९ ला राष्ट्राध्यक्ष आयझेनहॉवर भारत भेटीवर आले.राष्ट्राध्यक्ष ड्वाइट आयझेनहॉवर हे देशाला भेट देणारे अमेरिकेचे पहिले अध्यक्ष आहेत. आयझेनहॉवर राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद आणि पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांची भेट घेतात आणि संसदेला संबोधित केले.

१९६२ मध्ये यूएस विद्यापीठांनी भारतीय तंत्रज्ञान संस्थेला मदत केली.नऊ अमेरिकन विद्यापीठे आणि यूएस एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट (USAID) प्रथम भारतीय तंत्रज्ञान संस्थांपैकी एक स्थापन करण्यात मदत केली. कानपूर इंडो-अमेरिकन प्रोग्राम अंतर्गत, अमेरिकन फॅकल्टी सदस्यांनी एका दशकात नवीन विद्यापीठात शैक्षणिक कार्यक्रम

आणि संशोधन प्रयोगशाळा विकसित करण्यास सहकार्य केले. ही भागीदारी दोन्ही देशांमधील उच्च शिक्षण सहकार्याच्या अनेक उदाहरणांपैकी एक आहे.

१९६२भारत आणि चीनमध्ये वादग्रस्त सीमेवरून युद्ध सुरू झाले. पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी राष्ट्राध्यक्ष जॉन एफ केनेडी यांना पत्र लिहून युनायटेड स्टेट्सला पाठिंबा देण्याची विनंती केली. मॅकमोहन रेषेला सीमा मान्य करून अमेरिकेने या संघर्षात भारताला पाठिंबा दिला आणि हवाई मदत आणि शस्त्रे पुरवली. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धापर्यंत, वॉशिंग्टन आणि दिल्ली यांच्यातील सामरिक आणि लष्करी संबंध जवळचे होते.

१९६३ नॉर्मन बोरलॉग उच्च उत्पादन देणाऱ्या गव्हाच्या वाणांची चाचणी घेण्यासाठी भारतात येतात आणि भारतीय शास्त्रज्ञ डॉ. एमएस स्वामीनाथन यांच्यासोबतच्या त्यांच्या सहकार्यामुळे "हरितक्रांती" झाली त्यामुळे भारताने अन्नटंचाईपासून स्वयंपूर्णतेकडे वाटचाल केली.

१९७१ भारत पाकिस्तानच्या युद्धात पूर्व पाकिस्तानमध्ये पाकिस्तानी सैन्याने आपल्याच नागरिकांविरुद्ध केलेल्या हिंसाचाराचे पुरावे असूनही अमेरिका पाकिस्तानच्या बाजूने उभी राहिली.ह्याच वर्षी भारताने ऑगस्टमध्ये सोव्हिएत युनियनसोबत वीस वर्षांच्या मैत्री आणि सहकार्याच्या करारावर स्वाक्षरी करून नवीन मित्र शोधण्यास सुरुवात केली.

१९७४ भारताने आपले पहिले आण्विक स्फोट घडवून आणले, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या पाच स्थायी सदस्यांच्या बाहेर अणु क्षमता घोषित करणारे भारत पहिले राष्ट्र बनले. या निर्णयामुळे युनायटेड स्टेट्स आणि भारत यांच्यात काही काळ तणाव निर्माण झाला होता.

१ जानेवारी १९७८ अमेरिकेची अध्यक्ष कार्टर भारत दौऱ्यावर आले असता भारताचे राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी आणि पंतप्रधान मोरारजी देसाई यांची भेट घेतली आणि संसदेला संबोधित केले. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष च्या दौऱ्यानंतर मोरारजी देसाई यांनी जूनमध्ये वॉशिंग्टनला सहा दिवसीय अधिकृत भेट दिली.

१९७८ मध्ये कार्टर प्रशासनाने आण्विक अप्रसार कायदा लागू केला, त्यावर भारताने स्वाक्षरी करण्यास नकार दिला त्यामुळे अमेरिकेने भारतात दिली जाणारी आण्विक मदत बंद केली.

१९८२ मध्ये अमेरिका आणि भारतातील तणावपूर्ण संबंध सुधारण्यासाठी

पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांची भेट घेतली. गांधींनी व्हाईट हाऊसमधील भाषणात युनायटेड स्टेट्स आणि भारत यांच्यातील फरक अधोरेखित केला, पण दोघांनीही "एक समान क्षेत्र शोधले पाहिजे, व एकमेकांना सहकार्य केले पाहिजे असा संदेश आपल्या दौऱ्यात दिला. या दौऱ्यानंतर युनायटेड स्टेट्सने भारताच्या तारापूर पॉवर प्लांटसाठी आवश्यक असलेल्या युरेनियम गेल्यावर काही काळापूर्ती बंदी आणली त्यानंतरचार वर्षांनंतर हे नेते सहकार्य वाढविण्यास आणि अणुऊर्जेवरील विवाद सोडविण्यास सहमती दर्शवताना दिसले त्यामुळे या काळात भारत अमेरिका संबंध सहकार्याच्या धोरणावर पुढे वाटचाल करताना दिसून आले.

१९८४ भारतातील भोपाळ येथील अमेरिकन मालकीच्या युनियन कार्बाइड कीटकनाशक प्लांटमध्ये विषारी वायू आणि रासायनिक गळतीमुळे हजारो लोकांचा मृत्यू झाला. आगामी वर्षांमध्ये मृत्यू आणि अपंगत्वाचा आकडा हजारोंच्या घरात गेल्याने भारताने कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे युनायटेड स्टेट्सकडून प्रत्यार्पण करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. या घटनेमुळे अमेरिका-भारत संबंधांना हानी पोहोचली आणि अनेक वर्षांनी द्विपक्षीय संबंध गुंतागुंतीचे होत गेले.

१९९० मध्ये अमेरिकेचे उपराष्ट्रीय सुरक्षा सल्लागार रॉबर्ट गेट्स काश्मीरमध्ये वेगाने वाढणाऱ्या बंडखोरीवरून तणाव कमी करण्यासाठी भारत आणि पाकिस्तानचा दौरा केला. तसेच पाकिस्तान आणि भारत यांच्यातील संभाव्य अणुयुद्धाच्या भीतीच्या पार्श्वभूमीवर हा दौरा होता.

**१९९१ नंतरचे भारत – अमेरिका संबंध:**

१९९१ पासून खाजगीकरण, उदारीकरण ,जागतिकीकरणाची प्रक्रिया या नव्या बदलामुळे भारताने आपल्या पारंपारिक समाजवादी धोरणाला सोडचिठ्ठी दिली.भारतात थेट परकीय गुंतवणूक व बहुराष्ट्रीय कंपन्याला भारतीय बाजार पेठ खुली झाली, औद्योगिकीकरण पद्धतशीर झाले. १९९२ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात अधिक उदारीकरण स्वीकारून अर्थव्यवस्थेला नवे वळण दिले गेले. या नव्या वळणामुळे अमेरिका प्रभावित झाली आंतरराष्ट्रीय नाणेनिधी , जागतिक बँक यांच्या मदतीने उदारीकरणाची व जागतिककरणाची प्रक्रिया दृढ झाली.भारताची महाकाय बाजारपेठ अमेरिकेला उपलब्ध झाल्याने परस्पर मैत्री व सहकार्याची नवीन पर्व सुरू झाले. अमेरिकेने आर्थिक व औद्योगिक अंगाने विचार करून चीन व पाकिस्तान पेक्षा भारताला अधिक पसंती दिली. युनोच्या निर्णय प्रक्रियेत भारताने अमेरिकेच्या बाजूने आखाती युद्धात कौल दिला. भारताच्या आखाती युद्धातील सहकार्याबद्दल अमेरिकेने भारताचे कौतुक केले. भारताने इजराइल या अमेरिकेच्या मित्र राष्ट्राशी अनुकूल धोरण स्वीकारल्याने अमेरिकेने काश्मीर प्रश्नावर भारतातला अनुकल भूमिका घेतली व सिमला कराराला मान्यता दिली.

**जॉर्ज बुशच्या काळातील भारत- अमेरिका- संबंध :**

१९९२ साली अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष यांनी भारत व पाक संबंधाबाबत चर्चा व सहकाराचा विचार मांडला. १९९२ साली भारत -अमेरिका नौदलाचा संयुक्त अभ्यास सराव झाला. पुढे अमेरिकेत डेमोक्रॅटिक पक्षाचे बिल क्लिंटन राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर दोन्ही देशातील संबंधांना नवे वळण प्राप्त झाले. श्री क्विंटन यांनी द्वीपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी उच्चस्तरीय प्रतिनिधी मंडळ पाठवले. शीतयुद्धोत्तर काळात भारत अमेरिका धोरणात असे सकारात्मक बदल झाले तरी देखील एन.पी.टी.व सीटीबीटी या आण्विक नियंत्रण करारावर सही करण्यासाठी दबाव भारतावर वाढला होता.

**पी व्ही नरसिंगराव यांच्या काळातील भारत -अमेरिका संबंध :**

तत्कालीन पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव यांनी अमेरिकेला भेट दिली याप्रसंगी दोन्ही देशात लोकशाही,मानवाधिकार उदारमतवाद, जागतिक शांतता आणि स्थिरता क्षेत्रात सहकार्याचे संयुक्त घोषणापत्र जाहीर केलेयामुळे दोन्ही देशातील संबंधांना गती प्राप्त झाली.

**१९९७ नंतरचे भारत -अमेरिका संबंध:**

१९९७ साली तत्कालीन पंतप्रधान इंद्रकुमार गुजरात व श्री बिल क्लिंटन यांची संयुक्त राष्ट्र संघटनेत भेट झाली. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात १९९८ साली भारताने अणुचाचणी घेतली. या चाचण्यानंतर अमेरिकेने भारतावर कडक आर्थिक निर्बंध लादले. भारताने केलेली केलेल्या अणुचाचणीनंतर भारत – अमेरिका संबंधात कटुता निर्माण झाली.

**२००० नंतरचे भारत – अमेरिका संबंध :**

सन २००० नंतर वाजपेयीच्या काळात भारत अमेरिका संबंध हे व्यापार उद्योग या क्षेत्रात सहकार्याचे राहिले.

अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश यांच्या प्रशासनाने १९९८च्या अणुचाचणीनंतर भारतावर लादलेले सर्व अमेरिकन निर्बंध उठवले. बहुतेक आर्थिक निर्बंध लादल्याच्या काही महिन्यांतच शिथिल केले गेले आणि कॉंग्रेसने १९९९मध्ये सर्व उर्वरित निर्बंध काढून अमेरिकन अध्यक्षांना अधिकृत दर्शविली.२००४ साली भारतात केंद्र सरकारमध्ये सत्ता परिवर्तन झाले व डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान बनले. या काळात २००६ साली झालेला दोन्ही देशातील नागरी अणुऊर्जा सहकार्य करार हे एक मोठे वळण होते.

२००८ मध्ये पाकिस्तानातील लष्कर-ए-तैयबाच्या दहशतवाद्यांनी मुंबईतील ताजमहाल पॅलेस हॉटेलवर हल्ला केला. तीन दिवसांच्या या आगीत सहा अमेरिकन नागरिकांसह तीनशेहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला. युनायटेड स्टेट्स FBI अन्वेषक आणि फॉरेन्सिक तज्ञ पाठवून भारतीय अधिकाऱ्यांना जवळून सहकार्य करते.

भारताला ऊर्जा निर्मितीसाठी अनुइंधन व तंत्रज्ञान मिळावे म्हणून २००९ साली बराक ओबामा राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी काही प्रमाणात सहकार्य केले व भारताशी असणारे संबंध अधिकदृढ करण्याचे घोषित केले. २०१० मध्ये ओबामा यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेसाठी भारताच्या मागणीला पाठिंबा दिला.भारतीय संस्कृती, लोकशाही प्रणाली व धर्मनिरपेक्षता या भारतीय परंपरेचे त्यांनी कौतुक केले. मे २०१४ साली माननीय नरेंद्र मोदी पंतप्रधान बनले केंद्रातील सत्ता परिवर्तना नंतर भारत अमेरिका संबंधास नवे स्वरूप प्राप्त झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेला भेट दिली याही काळात व्यापार उद्योग, पर्यटन, आरोग्य व शैक्षणिक क्षेत्रात सहकार्याचे संबंध राहिले आहेत.

**डोनाल्ड ट्रम्प आणि भारतसंबंध**

२०१७ साली अमेरिकेत सत्ता परिवर्तन होऊन डोनाल्ड ट्रम्प हे राष्ट्राध्यक्ष बनले त्यांनी व्हिसा बंदी हे धोरण अमेरिकेने प्रथम स्वीकारल्याने भारतातून अमेरिकेत नोकरी, शिक्षणासाठी गेलेल्या व जाणाऱ्या नागरिकांना व्हिसा विषयक निर्बंध लागू केले . या दरम्यानच्या काळात भारत- अमेरिका संबंध तणावाचे राहिले. आता भारत – अमेरिका अनेक क्षेत्रात मित्रत्वाचे व सहकार्याचे संबंध आहेत या संबंधांमध्ये चढउतार दिसून येतात. अमेरिका आपले पाकिस्तान विषयक धोरण हे पक्षपातीपणे ठेवते त्याचा दहशतवादी स्तरावर भारताला फटका बसतो. आशिया खंडातील चीनच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी अमेरिका-

भारताबरोबर सलोख्याचे संबंध ठेवते आहे. भारतीय अर्थव्यवस्था बाजारपेठ उदयनमुख महासत्ताकडे होणारी वाटचाल लक्षात घेता अमेरिका भारताशी उत्तम व सहकार्याचे संबंध ठेवताना दिसून येते.

### २.३.२.२ भारत आणि रशिया संबंध :

१९७१ मध्ये भारत-रशिया संबंध निर्माण करण्यासाठी मैत्री, शांतता आणि सहकार्याच्या करारावरही स्वाक्षरी करण्यात आली होती. हा करार तब्बल २०व र्षे चालला.१९९१मध्ये युएसएसआरच्या विघटनानंतर भारत-रशियन संबंध बदलले आहेत.शीतयुद्धाच्या काळात भारत आणि सोव्हिएत युनियनमध्ये मजबूत सामरिक, लष्करी, आर्थिक आणि राजनैतिक संबंध होते. सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर, रशियाला भारतासोबतचे घनिष्ठ संबंध वारशाने मिळाले आहेत ज्यामुळे दोन्ही राष्ट्रांमध्ये विशेष धोरणात्मक संबंध सामायिक झाल्याचे दिसून येतात.सोव्हिएत युनियनचे पतन, भारत आणि चीनचा उदय, अमेरिका-चीन तणाव, अमेरिका-भारत संबंध अधिक घट्ट होत गेले आणि रशियाने पाश्चिमात्य देशांशी घेतलेली फारकत त्यामुळे आणि युक्रेनविरुद्धच्या युद्धामुळे रशियन-चीनची झालेली जवळीकता रशियन-भारतीय संबंधांवर काही परिणाम झाले आहेत.रशियासोबतचे द्विपक्षीय संबंध हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख स्तंभ आहेत. भारत रशियाला एक दीर्घकाळ टिकणारा आणि मित्र म्हणून पाहतो. ऑक्टोबर 2000 मध्ये "भारत-रशिया धोरणात्मक भागीदारीबाबत घोषणा" (दरम्यान राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या भारत भेटीमुळे) भारत-रशिया संबंध अधिक दृढ झाले आहेत.राजकीय, सुरक्षा, व्यापार ,अर्थव्यवस्था, संरक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि संस्कृती आणि यासह द्विपक्षीय संबंधांची जवळजवळ सर्व क्षेत्रात भारत रशिया संबंध ही सहकार्याचे राहिले आहेत.

शीतयुद्धाच्या काळात भारत रशिया, संबंध तीन स्तंभांवर अवलंबून होते:

- भारताला सोव्हिएत रशियाकडून शस्त्रास्त्रांची विक्री.
- सामायिक सार्वजनिक-क्षेत्रात, तंत्रज्ञान, आर्थिक बाबतीत व्यापक सोव्हिएत रशियाकडून भारताला व्यापक प्रमाणात मदत करण्यात आली.
- सोव्हिएत युनियन-भारत विरुद्ध युनायटेड स्टेट्स-पाकिस्तान-चीन यांच्यातील सहकार्यात्मक वातावरण.

भारत रशियाच्या संबंधाच्या तीन स्तंभांपैकी फक्त एकच थांब सध्या शिल्लक आहे तो म्हणजे शस्त्रास्त्र व्यापार. रशिया हा भारताला शस्त्रास्त्रांचा एक प्रमुख पुरवठादार राहिला आहे. रशियन उपकरणे अजूनही भारतीय सशस्त्र दलाच्या बल संरचनेचा एक मोठा भाग आहेत. परंतु सध्या भारतीय शस्त्रास्त्रांच्या बाजारपेठेत रशियाला स्पर्धेचा सामना करावा लागत आहे. शस्त्रास्त्रांच्या पुरवठ्यात विविधता आणण्याच्या आणि स्वतःचा संरक्षण उद्योग विकसित करण्याच्या भारताच्या इच्छेमुळे अलिकडच्या वर्षांत भारताला रशियन शस्त्रास्त्र वितरणात काही प्रमाणात घट झाली आहे.युक्रेन विरुद्धच्या युद्धामुळे रशियाने पाश्चिमात्य देशांशी संबंध तोडल्याने चीनच्या दिशेने आपला वळण वाढविले आहेत. अमेरिका-चीन आणि चीन-भारत तणावाच्या पार्श्वभूमीवर, रशियाला भारतासोबतची भागीदारी टिकवणे कठीण होईल असा अंदाज आंतरराष्ट्रीय राजकारणातून व्यक्त होत आहे.

भारतासाठी रशिया हा शस्त्रास्त्रांचा आणि अलीकडे तेलाचा महत्त्वाचा पुरवठादार राहिला आहे. रशियासाठी भारत ही शस्त्रास्त्रे आणि तेलाची महत्त्वाची बाजारपेठ आहे. भारत-अमेरिका सुरक्षा संबंध तुलनेने नवीन आहेत, तर भारत-रशिया संबंध दोन पिढ्यांहून अधिक काळ टिकून आहेत.

२००४ साली डॉ.मनमोहन सिंग पंतप्रधान झाल्यानंतर भारतातची अमेरिकेशी जवळीक वाढली. विविध क्षेत्रात अमेरिकेबरोबर ही सहकार्य सुरू झाली यामुळे रशियाने – भारताशी असलेल्या संबंधात थोडी परिवर्तनाची भूमिका घेतली. आज केंद्रात माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या सरकारने ही रशियाबरोबर लष्करी साहित्य, दहशतवादाविरोधातील लढा, आर्थिक व औद्योगिक सहकार्य चालू ठेवले आहे. २०१५ मध्ये मास्कोतील सैन्य परेडमध्ये भारताने सहभाग घेतला होता. रशिया व भारताने नवनवीन प्रकल्पाचे उद्घाटन संयुक्तपणे केले आहे. भारतातील हेलिकॉप्टरच्या संयुक्त निर्मितीमध्ये संबंधातील नवीन आयाम प्राप्त झाले आहेत. भारताचे ' मेक इन इंडिया ' प्रकल्पाला रशियाने मजबुतीकरण दिले आहे. रशिया हा परमाणु ऊर्जातील भारताचा महत्त्वपूर्ण भागीदार आहे. २००५ मध्ये शांतता उद्देश सहकार्य करार झालेला आहे. सन २०१० पासून भारत रशिया सहकार्याला नवे वळण प्राप्त झाले.' ब्रिक्स ' या संघटनेच्या स्थापनेत भारत , रशिया, ब्राझील, चीन ,साऊथ आफ्रिका या राष्ट्रांनी संयुक्तपणे पुढाकार घेतला. कर्नाटकातील केंगा अणुऊर्जा प्रकल्पाला रशियाने सहकार्य केले आहे. तमिळनाडूमधील 'कोडनकुलम' या अणुऊर्जा प्रकल्पाला रशियाने तांत्रिक मदत पुरवली आहे. भारताचे इतर देशाशी असणाऱ्या संबंधाबरोबरच रशियाशी असणाऱ्या जुन्या संबंधात काही चढ उतार होत असले तरीही आजही रशिया भारत मैत्रीचे संबंध वृद्धिगत झालेले आहेत. ऑक्टोबर २००० मध्ये "भारत-रशिया राजनैतिक भागीदारीवरील घोषणा" वर स्वाक्षरी झाल्यापासून भारत-रशिया संबंधांमध्ये गुणवत्तेच्या बाबतीत एक नवीन वळण आले आहे, ज्यामध्ये द्विपक्षीय संबंधांच्या जवळजवळ सर्व क्षेत्रांमध्ये सहकार्याची पातळी वाढली आहे.यामध्ये राजकारण, सुरक्षा, व्यापार आणि अर्थशास्त्र, संरक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि संस्कृती यांचा समावेश आहे.धोरणात्मक भागीदारी अंतर्गत, सहकारी उपक्रमांवर नियमित संवाद आणि पाठपुरावा करण्यासाठी, राजकीय आणि अधिकृत अशा दोन्ही स्तरांवर विविध गैर-संस्थात्मक संवाद यंत्रणा कार्यरत आहेत. २०१० मध्ये रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या भारत भेटीदरम्यान, राजनैतिक भागीदारीचे वर्णन "विशेष आणि विशेषाधिकारप्राप्त राजनयिक" म्हणून केले गेले.

## राजकीय संबंध

दरवर्षी दोन्ही देशांच्या राजकीय नेत्यांमध्ये बैठक आयोजित केली जाते. या बैठकीचे राजकीय दृष्टीने धोरणात्मक संबंध आहेत.हे देश सामायिक राष्ट्रीय हिताच्या मुद्द्यांवर अनुकरणीय सहकार्य दाखवतात.युनायटेड नेशन्स सिक्युरिटी कौन्सिलच्या स्थायी जागेच्या बाबतीत रशियानेही भारताची पाठराखण केली.उच्च-स्तरीय विनिमय पातळी ज्यामध्ये पुढे IGC IRIGC-TEC आणि आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉरसाठी विक्री आणि खरेदी करते.IRC – ही भारतातील सर्वात मोठी सरकारी यंत्रणा आहे आणि दोन विभागांमध्ये शाखा आहे: पहिल्यामध्ये व्यापार, अर्थव्यवस्था, विज्ञान, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक सहकार्य समाविष्ट आहे. दुसऱ्यामध्ये लष्करी-तांत्रिक सहकार्याचा समावेश आहे, ज्याचे अध्यक्ष दोन्ही

राष्ट्रांचे संरक्षण मंत्री आहेत.भारताच्या चीनविरोधी भूमिकेमुळे राजकीय संबंध ताणले गेले आहेत.

**व्यापार संबंध:**

२०२५ पर्यंत द्विपक्षीय गुंतवणूक US$50 अब्ज आणि द्विपक्षीय व्यापार US$30 अब्ज पर्यंत वाढवण्याचा दोन्ही देशांचा मानस आहे.आर्थिक वर्ष २०२० मध्ये द्विपक्षीय व्यापार USD 8.1 अब्ज होता.२०१३ ते २०१६या काळात दोन्ही देशांमधील व्यापाराच्या टक्केवारीत मोठी घट झाली. तथापि, २०१७ पासून त्यात वाढ झाली आणि २०१८आणि २०१९ मध्येही सतत वाढ दिसून येत आहे.

**आण्विक संबंध:**

अणुऊर्जेच्या शांततापूर्ण वापराच्या क्षेत्रात रशिया हा भारताचा महत्त्वाचा भागीदार आहे. कुडनकुलम अणुऊर्जा प्रकल्प (KKNPP) रशियाच्या सहकाऱ्यांने तयार केला जातोय तसेच भारत आणि रशिया हे दोन्ही देश बांगलादेशमध्ये रूपपूर अणुऊर्जा प्रकल्प राबवत आहेत.

**अंतराळ संशोधन:**

उपग्रह प्रक्षेपण, ग्लोनास नेव्हिगेशन प्रणाली , रिमोट सेन्सिंग आणि बाह्य अवकाशातील इतर सामाजिक अनुप्रयोगांसह बाह्य अवकाशाच्या शांततापूर्ण वापरामध्ये दोन्ही बाजूने सहकार्य धोरण राबवल्या गेले आहे.१९ व्या द्विपक्षीय शिखर परिषदेदरम्यान ISRO आणि ROSCOSMOS यांच्यात मानवी अंतराळ उड्डाण कार्यक्रमाच्या क्षेत्रातील संयुक्त उपक्रमांवर एक सामंजस्य करार करण्यात आला आहे.

**विज्ञान आणि तंत्रज्ञान:**

IRIGC-TEC अंतर्गत कार्यरत विज्ञान आणि तंत्रज्ञानावरील कार्य गट, एकात्मिक दीर्घकालीन कार्यक्रम (ILTP) आणि मूलभूत विज्ञान सहकार्य कार्यक्रम या द्विपक्षीय विज्ञान आणि तंत्रज्ञान सहकार्यासाठी तीन मुख्य संस्थात्मक यंत्रणा कार्यरत आहेत, तर दोन्ही देशांच्या विज्ञान अकादमी या उपक्रमांना प्रोत्साहन देतात.या क्षेत्रातील उपक्रमांमध्ये भारत-रशिया ब्रिज टू इनोव्हेशन, टेलिमेडिसिनमधील सहकार्य, पारंपारिक ज्ञान डिजिटल लायब्ररी (TKDL) तयार करणे आणि विद्यापीठांचे रशिया इंडिया नेटवर्क (RIN) यांचा समावेश आहे.

**सांस्कृतिक संबंध:**

अग्रगण्य विद्यापीठे आणि शाळांसह सुमारे 20 रशियन संस्था, सुमारे 1500 रशियन विद्यार्थ्यांना नियमितपणे हिंदी शिकवतात.रशियन संस्थांमध्ये हिंदी व्यतिरिक्त तामिळ, मराठी, गुजराती, बंगाली, उर्दू, संस्कृत आणि पाली या भाषा शिकविल्या जातात.भारतीय नृत्य, संगीत, योग आणि आयुर्वेद हे रशियातील लोकांना आवडणाऱ्या इतर काही आवडी अग्रस्थानी आहेत.

**भारतासाठी रशियाचे महत्त्व**

- पूर्व लडाखच्या सीमावर्ती भागात चिनी आक्रमकतेने भारत-चीन संबंधांना एका वळणावर आणले, परंतु हे भारत रशियाची संबंध पाहता रशिया चीनसोबतचा तणाव कमी करण्यात हातभार लावू शकतो.
- रशिया भारत संबंधामुळे शस्त्रे, हायड्रोकार्बन्स, अणुऊर्जा आणि हिरे यांसारख्या सहकार्याच्या पारंपारिक क्षेत्रांव्यतिरिक्त, आर्थिक सहभागाची नवीन क्षेत्रे उदयास येण्याची शक्यता आहे.
- भारत आणि रशिया अफगाणिस्तानमधील अंतर कमी करण्यासाठी काम करत आहेत.
- संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद आणि आण्विक पुरवठादार गटाच्या स्थायी सदस्यत्वासाठी भारताच्या उमेदवारीला रशिया समर्थन करतो आहे.
- रशिया हा भारताला शस्त्रास्त्र निर्यात करणारा सर्वात मोठा देश आहे त्यामुळे भारत रशियाचे संबंध सहकार्याचे असणे गरजेचे आहे
- भारताने बर्याच काळापासून रशियाकडे एक विश्वासार्ह भागीदार म्हणून पाहिले आहे ज्याने त्याला संयुक्त राष्ट्रांमध्ये (UN) पाठिंबा दिला आहे, सर्व क्षेत्रांमध्ये भारतीय लष्करी क्षमता वाढविण्यात अविभाज्य भूमिका बजावली आहे आणि त्याला पश्चिमेकडे धोरणात्मक स्वायत्ततेचा सराव करण्यासाठी जागा दिली आहे.

## २.३.२.३ भारत आणि चीन

भारत-चीन संबंधांना अलीकडेच सहकार्य आणि स्पर्धेचे मिश्रण म्हणून वर्णन केले गेले आहे, दोन्ही राष्ट्रे २०५० पर्यंत महासत्ता बनतील अशी अपेक्षा आहे. भारत-चीन संबंधांचा दीर्घ आणि गुंतागुंतीचा इतिहास आहे, जो सहकार्य आणि संघर्ष या दोन्हींनी चिन्हांकित आहे.

चीनच्या नवीन शासनास १९४९ मध्ये भारताने मान्यता दिली. चीनला युनोचे सभासदत्व मिळवण्यासाठी भारताने बरेच प्रयत्न केले. १९५४ मध्ये या दोन देशात व्यापारीख सांस्कृतिक करार झाला. बांडुंग परिषदेत चीनने पंचशीलचा स्वीकार केला. हे दोन्ही देश लोकसंख्या, आकार, नैसर्गिक साधनाच्या बाबतीत अशा खंडातील समान राष्ट्र आहेत, या दोन्ही राष्ट्राची भूमिका आशिया खंडातील प्रथम दर्जाचे राज्य बनावे व आशियाचे नेतृत्व करावी ही आहे.

चीन-भारत संबंध द्विपक्षीय संबंध आहेत.दोन सार्वभौम राष्ट्रांमधील राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक संबंधांचे संघटन अलीकडच्या काळात हे नाते उबदार आहे तरीही ते अनेक घटकांमधून गेले आहे ज्यामुळे सध्याचे नाते निर्माण झाले आहे.

या दोन्ही देशात सीमावादाचे आणि चीन मधून उदयास असणाऱ्या ब्रह्मपुत्रा नदीच्या संदर्भात दोन्ही देशांच्या पाण्याच्या वाटणीबाबत असंतोष आहे परंतु सध्याच्या काळात फारसे महत्त्व दिले जात नाही.परंतु त्याचे निराकरण झाले नाही तर. नजीकच्या भविष्यात ते वादाचे प्रमुख कारण बनू शकते. तसेच या दोन्ही देशात आर्थिक शत्रुत्व आहे ज्यामुळे अनेक वेळा तणावपूर्ण संबंध निर्माण झाले आहेत.

दोन्ही देशांमध्ये सीमा ह्या जवळ असल्यामुळे त्यात मोठ्या प्रमाणात सीमा वाद आहे. तसेच दोन्हीही देशांना सामायिक सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा असूनही१९६२ चे भारत-चीन युद्ध आणि अलीकडेच २०२१ मध्ये झालेल्या सीमेवरील संघर्षांसह गेल्या काही दशकांमध्ये संघर्ष आणि तणावाच्या अनेक घटना घडल्या आहेत आणि त्या आजही चालू आहेत.

भारत आणि चीन यांच्यातील आर्थिक सहकार्याच्या वाढत्या पातळीद्वारे मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे, या दोन्ही देशात व्यापारी संबंध हे आज मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. भारत हा चीनचा सर्वात महत्त्वाचा व्यापारी भागीदार आहे आणि दोन्ही देश एकमेकांच्या अर्थव्यवस्थांमध्ये संयुक्त उपक्रम आणि गुंतवणूकीसह त्यांचे आर्थिक संबंध मजबूत करण्यासाठी काम करत आहेत.

भारत आणि चीन या दोन्ही देशात वाढते आर्थिक सहकार्य असूनही, भारत आणि चीन हे भौगोलिक राजकीय प्रतिस्पर्धीही आहेत. दोन्ही देश आपला जागतिक प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत आणि आशिया-पॅसिफिक आणि हिंदी महासागरासह अनेक क्षेत्रांमध्ये त्यांचे प्रतिस्पर्धी हितसंबंध राहिले आहेत.

भारत आणि चीन यांच्यातील वादाचा आणखी एक स्रोत म्हणजे आशिया-पॅसिफिक प्रदेशातील त्यांची स्पर्धा. भारताने आपला प्रादेशिक प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. भारताने जपान आणि ऑस्ट्रेलियासह या प्रदेशातील अनेक देशांशी युती केली आहे. दुसरीकडे चीन आपले लष्करी आणि आर्थिक उपस्थिती वाढवून प्रादेशिक वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे.

१९४९ ते १९६२ दरम्यानच्या पहिल्या टप्प्यात, चीनने अमेरिकेला आपला प्राथमिक शत्रू म्हणून पाहिले होते. त्यामुळे अमेरिकन संबंधापासून भारताला तटस्थ आणि दूर ठेवणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट होते.

तसेच विकसनशील जगात भारताच्या प्रभावाचा उपयोग करून आशियातील अमेरिकेचा प्रभाव आणि प्रवेश रोखण्यासाठी “आशियाई एकता” निर्माण करणे या संदर्भातही चीनची भूमिका संशयास्पद राहिलेली आहे.

१९६२ च्या भारत चीन युद्धात भारताच्या पराभवामुळे भारताचे सोव्हिएत युनियनसोबतचे संबंध दृढ झाल्यामुळे चीनला आपल्या सुरक्षेची चिंता सताऊ लागली होती. चीनची भूमिका पाहता भारताला स्वीट रशियाच्या प्रभावापासून आणि शक्तीपासून वेगळे करण्याचे राहिले आहे.

१९९१ मध्ये सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर आणि शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर चीनसह इतर साम्यवादी राज्यांमध्ये अमेरिकेला शासनात बदल हवा होता त्यामुळेही ती चिंता ही चीनला सतवत होती.चीनलाही आपला परिसर सुरक्षित ठेवायचा आहे. त्यामुळे याही काळात भारताला अमेरिकेपासून दूर ठेवून सीमावादाच्या माध्यमातून भारतीय सुरक्षेचा धोका निर्माण करण्यात येईल प्रयत्न करताना आपल्याला दिसून येतो. भारतावर अंकुश ठेवण्यासाठी पाकिस्तानला गुंतवून ठेवण्याचेही त्याचे धोरण होते.

२००० च्या दशकाच्या मध्यापर्यंत, अमेरिका-चीन संबंधांचे सामान्यीकरण आणि रशियाबरोबरची भागीदारी म्हणजे चीनसाठी अनुकूल शक्ती संतुलन होते आणि परिणामी, भारत-चीन संबंधांमध्ये तणाव निर्माण होऊ लागला.२०१३ मध्ये शी जिनपिंग राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर, बीजिंगच्या वाढत्या जागतिक दृढनिश्चयीतेमुळे, यूएस-चीन संबंध बिघडले आहेत आणि परिणामी भारत-चीन संबंधांमध्ये बऱ्याच प्रमाणात संघर्ष झाला आहे.

२००८-०९ पासून सीमावर्ती भागात चीनच्या वाढत्या जबरदस्ती वर्तनामुळे सीमाप्रश्न भारत चीनच्या संबंधातील आघाडीचा मुद्दा ठरताना दिसून येतो.

२०२० हे वर्ष भारत-चीन संबंधांसाठी महत्त्वपूर्ण ठरले कारण पूर्व लडाखमधील गलवान खोऱ्यातील हिंसक संघर्षाने त्यांची गतिशीलता मूलभूतपणे बदलली असून चीन जाणीवपूर्वक भारत भारताच्या सीमा वादाच्या संदर्भात खोड्या करताना दिसून येतो.

## २.४ सारांश

भारत आणि महासत्ता यांच्यातील संबंधाचे स्वरूप पाहता हे सबंध काही वेळा तणावपूर्ण स्थितीत राहिलेले आहेत तर काही वेळा सहकार्याचे राहिलेले आहेत. कोणत्याही राष्ट्राला आपल्या आर्थिक सामाजिक सांस्कृतिक विकासासाठी तणावाचे संबंध हे कायमस्वरूपी ठेवणे शक्य नाही त्यामुळे महासत्ताशी जुळवून घेणे हे प्रत्येक राष्ट्राला क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे भारताने काळानुरूप महासत्ताशी संबंध ठेवताना आपल्या संबंधात वेळोवेळी बदल केल्याचे दिसून येते.

**आपली प्रगती तपासा**

**समकालीन राजकारणातील भारताच्या सद्यस्थितीचे भूमिकेचे वर्णन करा.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**भारत अमेरिका संबंधावर भाष्य करा.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**भारत चीन सीमा वादावर प्रकाश टाका.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## २.५ अधिक वाचनासाठी संदर्भ


India-U.S. Relations,July 19, 2021.Congressional Research Service https://crsreports.congress.gov

Satyajit Mohanty, “Sino-Indian Trade Relations: An Uncertain Future,” IPCS Papers, Feb. 2, 2010,http://ipcs.org/article/china/sino-indian-trade-ties-an-uncertain-

B. Raman, “Sino-Indian trade: It's helping only China,” Rediff Papers, Jan. 28, 2008, http://www.rediff.com/money/2008/jan/28china.htm.

Liu Xiaoxue, “60Th Anniversary of China-India Relations: To Develop Closer Economic and Trade Cooperation,” March 23, 2010,http://www.china.com.cn/international/txt/2010-03/23/content_19644956_2.htm.

Amiti Sen, “Growing Trade Deficit: India keeping close watch on China, mulls steps,” The Economic Times, Feb. 18, 2010.


❈❈❈❈❈❈❈

# ३

# भारत आणि शेजारी राष्ट्र

**घटक रचना**


३.१ उद्दिष्टे

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

३.३.१ भारताचे शेजारी राष्ट्राविषयीचे धोरण

३.३.२ भारत-पाक संबंध

३.३.३ भारत-बांगलादेश संबंध

२.४ सारांश

२.५ अधिक वाचनासाठी संदर्भ


## ३.१ उद्दिष्टे

**"भारत आणि शेजारी राष्ट्र"** या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. भारत आणि शेजारी राष्ट्राचे संबंध समजावून सांगता येतील.

२. भारताच्या शेजारी राष्ट्राबद्दलच्या भूमिका सांगता येतील.

३. भारताचे दक्षिण आशियातील स्थान व सार्क मधील स्थान समजावून सांगता येईल.

## ३.२ प्रास्ताविक

भारत हा अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांचा संस्थापक सदस्य होता, ज्यात संयुक्त राष्ट्र, आशियाई विकास बँक, G-20 प्रमुख अर्थव्यवस्था आणि आलिप्ततावादी चळवळ यांचा समावेश आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाने पारंपारिकपणे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संबंधांच्या दृष्टिकोनातून शेजारच्या राष्ट्रांकडे पाहिले आहे. भारत हा आंतरराष्ट्रीय शांततेचा पुरस्कर्ता होता. लांबलचक सीमा असलेला एक विशाल देश म्हणून, भारताचा आपल्या अनेक शेजारी देशांशी चांगल्या संबंधांचा इतिहास आहे. अफगाणिस्तान, भूतान, बांगलादेश, चीन, पाकिस्तान, बर्मा, श्रीलंका, मालदीव, भूतान आणि नेपाळ भारताच्या जवळ आहेत. शेजारील ही राष्ट्रे दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेचे (SAARC) सदस्य आहेत. वैयक्तिक आणि एकत्रितपणे, सदस्य देश ऐतिहासिक नातेसंबंध, सामायिक वारसा, समानता आणि त्यांच्या वांशिक, भाषिक, धार्मिक विविधतेचे प्रतिनिधित्व करतात. या प्रदेशात भारताचे स्थान अद्वितीय आहे. 1950 च्या दशकात, भारताची प्रतिष्ठा आणि नैतिक अधिकार उच्च होते, ज्यामुळे त्याला पूर्व आणि पश्चिमेकडून विकासात्मक मदत मिळू शकली. 1960 आणि 1970 च्या दशकात, चीन आणि पाकिस्तानशी युद्धे, इतर दक्षिण आशियाई देशांशी वाद

आणि भारत-सोव्हिएत करारावर स्वाक्षरी करून पाकिस्तानच्या अमेरिका आणि चीनच्या समर्थनामध्ये संतुलन साधण्याचा भारताचा प्रयत्न यामुळे विकसित आणि विकसनशील देशांमधील भारताची आंतरराष्ट्रीय स्थिती खराब झाली असली तरीही आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताने आपली एक वेगळी प्रतिष्ठा निर्माण केलेली आहे. त्यामुळे जागतिक राजकारणात भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन आज बदलेला आहे. त्यामुळे भारताच्या शेजारी राष्ट्राशी असलेले असलेले संबंध पाहणे क्रमप्राप्त ठरते.

## ३.३ विषय विवेचन

### ३.३.१ भारताचे शेजारी राष्ट्राविषयीचे धोरण

भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागराच्या जवळ वसलेला आहे. चीन, नेपाळ, भूतान, पाकिस्तान, म्यानमार, श्रीलंका, बांगलादेश आणि अफगाणिस्तान हे देश भारताच्या सीमेला लागून आहेत. म्यानमार आणि श्रीलंका यांची किनारपट्टी भारताला लागून आहे. भारताची जमीन सीमा 15,106.7 किमी लांब आहे आणि तिची किनारपट्टी 7,516.6 किमी लांब आहे. लडाख या एकमेव केंद्रशासित प्रदेशात चीन, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्याशी तीन आंतरराष्ट्रीय सीमा आहेत. त्यामुळे भारताच्या शेजारी राष्ट्राची त्याची संबंध कोणत्या प्रकारचे आहे त्याचीही आपल्याला चर्चा करणे गरजेचे आहे.

आपल्या 'नेबरहुड फर्स्ट' धोरणांतर्गत , भारत आपल्या सर्व शेजाऱ्यांसोबत मैत्रीपूर्ण आणि परस्पर फायदेशीर संबंध विकसित करण्यासाठी वचनबद्ध आहे.भारत हा शेजारी राष्ट्राच्या विकासासाठी सक्रिय भागीदार आहे आणि या देशांमधील अनेक प्रकल्पांमध्ये त्याचा सहभाग आहे.भारताचे 'नेबरहुड फर्स्ट' धोरण स्थिरता आणि समृद्धीसाठी परस्पर फायदेशीर, लोकाभिमुख, प्रादेशिक फ्रेमवर्क तयार करण्यावर भर देते.भारताचा या देशांसोबतचा संबंध सल्लागार, आणि परिणाम-केंद्रित दृष्टिकोनावर आधारित आहे, त्यामध्ये प्रामुख्याने दळणवळण, सुधारित पायाभूत सुविधा, विविध क्षेत्रातील मजबूत विकास सहकार्य,आर्थिक सहकार्य,लष्करी आणि संरक्षण सहकार्य,सुरक्षा आणि व्यापक लोक संपर्क,तंत्रज्ञान हस्तांतरण,आपत्ती व्यवस्थापन व त्याचे फायदे वितरीत करण्यावर केंद्रित आहे.

**दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना (SAARC) South Asian Association for Regional Cooperation (SAARC)**

**सार्क**

भारतीय उपखंडालाच अलीकडच्या काळात दक्षिण आशिया असेही म्हणतात. दक्षिण आशियात भारत पाकिस्तान, नेपाळ, भूतान, बांगलादेश, श्रीलंका, मालदीव अफगाणिस्तान व म्यानमार या राष्ट्रांचा समावेश होतो. या राष्ट्रपैकी भारत एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे पाकिस्तान बांगलादेश, मालदीव अफगाणिस्तान ही मुस्लिम धर्म राष्ट्र आहेत , श्रीलंका बौद्ध धर्म राष्ट्र आहे तर नेपाळ हिंदुराष्ट्र आहे अशा वेगवेगळ्या धर्माची राष्ट्र असूनही त्यातील भारत, पाकिस्तान नेपाळ, भूतान, बांगलादेश, श्रीलंका व मालदीव यांनी एकत्र येऊन दक्षिण आशियाईच्या सर्वांगीण विकासासाठी 1985 मध्ये सार्क व क्षेत्रीय संघटनेची स्थापना केली

आहे. ही सात राष्ट्रे संघटनेची सभासद राष्ट्र आहेत। अलीकडच्या काळात अफगाणिस्तानात व हा आठवा सदस्य म्हणून या संघटनेत सामील झाला आहे.

**मूळ संकल्पना व स्थापना**

दक्षिण आशियातील सर्वांगीण विकास व्हावा त्यासाठी या भागात एखादे क्षेत्रीय संघटन असावे याची जाणीव तत्कालीन बांगलादेशचे अध्यक्ष उर रहमान यांना झाली त्या दृष्टीने त्यांनी एक प्रस्ताव तयार केला व तो प्रस्ताव त्यांनी दक्षिण आशियातील राष्ट्रांना विचारविनिमय करण्यासाठी पाठवून दिला या प्रस्तावामध्ये नंबर एक दक्षिण आशियामध्ये नाटो किंवा वारसा यासारखे एखादे संघटन असावे. दक्षिण आशियाच्या सर्वांगी विकासासाठी या क्षेत्रातील सर्वांनी एकमेकांना सहकार्याच्या भावनेतून मदत करावी. सहकार्याचे क्षेत्र म्हणून दळणवळण, आर्थिक आणि औद्योगिक विकास, पर्यटन इत्यादी मुद्द्याम मुद्द्यांचा यामध्ये समावेश करण्यात आला होता या प्रस्तावाबरोबर त्यानी स्वतःसाठी दक्षिण आशियातील राष्ट्रांना भेटी दिल्या. त्यानंतर परिपत्रकाद्वारे त्यांनी आपले प्रतिनिधी आशियाई देशातील राष्ट्रात पाठवून दक्षिण आशियात एखादे संघटन स्थापन करण्याचे आवाहन केले एवढेच नाही तर या राष्ट्रांनी एकत्र येऊन शिखर परिषद घ्यावी असेही आवाहन केले.

या प्रस्तावावर विचार विनिमय करण्यासाठी सुरुवातीला सातही राष्ट्राच्या परराष्ट्रीय मंत्र्याची सचिवालयाची 21 ते 23 एप्रिल 1981 मध्ये कोलंबो येथे बैठक झाली. या बैठकीत दक्षिण आशियाच्या सहकार्यासाठी एक आराखडा बनवण्यात आला. त्यामध्ये शेती, ग्रामीण विकास आरोग्य व लोकसंख्या इत्यादी ही सहकार्याची क्षेत्र प्रामुख्याने ठरविण्यात आली. शिवाय या प्रत्येक क्षेत्रात सखोल अभ्यास करण्यासाठी तज्ञ लोकांची एक समिती नियुक्त करण्यात आली. नोव्हेंबर 1981 ऑगस्ट 1982 मार्च 1983 आणि जुलै 1983 मध्ये ठिकठिकाणी दक्षिण आशियातील परराष्ट्र सचिवांच्या बैठका झाल्या. त्यामध्ये परस्परांशी सहकार्य करण्याचे अनेक क्षेत्र निश्चित करण्यात आले. त्या क्षेत्राच्या विकासासाठी कार्य योजना आखण्यात आल्या त्यानंतर सातही राष्ट्राच्ये परराष्ट्र मंत्री नवी दिल्ली येथे एक व दोन ऑगस्ट 1983 रोजी एकत्र आले. या बैठकीत त्यांनी आतापर्यंत झालेल्या बैठकाचा आढावा घेऊन दक्षिण आशियाच्या सहकार्यासाठी दक्षिण आशियाई क्षेत्रिय सहकार्याचे संघटन स्थापन करण्याची औपचारिक घोषणा केली.

दक्षिण आशियातील भारत, पाकिस्तान, नेपाळ, भूतान बांगलादेश, श्रीलंका, मालदीव या सात राष्ट्राचे प्रमुख बांगलादेशाची राजधानी ढाका येथे 7 व 8डिसेंबर 1985 मध्ये एकत्र आले.या सात राष्ट्राने परस्पर सहकार्याच्या भूमिकेतून दक्षिण आशियाई क्षेत्रीय संघटना अर्थात सार्क अधिकृत स्थापना करण्यात आली. या दोन दिवसात या सात राष्ट्राच्या प्रमुखांनी या प्रदेशातील दारिद्र्य, निरक्षरता, कुपोषण, रोगराई यासारख्या अनेक प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. एवढेच नाही तर सार्क संघटनेचे उद्दिष्टही या संमेलनामध्ये निश्चित करण्यात आले.

दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना (SAARC) ची स्थापना 8 डिसेंबर 1985 रोजी ढाका येथे सार्क चार्टरवर स्वाक्षरी करून झाली.

SAARC मध्ये आठ सदस्य राष्ट्रांचा समावेश आहे: अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, भारत, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका.

असोसिएशनचे सचिवालय 17 जानेवारी 1987 रोजी काठमांडू येथे स्थापन करण्यात आले.

**सार्क चार्टरमध्ये नमूद केल्यानुसार असोसिएशनची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत:**

- दक्षिण आशियातील लोकांच्या कल्याणास प्रोत्साहन देणे आणि त्यांचे जीवनमान सुधारणे.
- प्रदेशात आर्थिक वाढ करणे.
- सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकासाला गती देण्यासाठी आणि सर्व व्यक्तींना सन्मानाने जगण्याची आणि त्यांच्या पूर्ण क्षमतेची जाणीव करून देण्याची संधी प्रदान करून देणे.
- दक्षिण आशियातील देशांमध्ये सामूहिक आत्मनिर्भरता वाढवणे आणि मजबूत करणे.
- परस्पर विश्वास, एकमेकांना समजून घेणे आणि एकमेकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी योगदान देणे.
- आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक आणि वैज्ञानिक क्षेत्रात सक्रिय सहकार्य आणि परस्पर सहाय्याला प्रोत्साहन देणे व विश्वास निर्माण करणे.
- दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये सामूहिक हितसंबंधाच्या विषयावर दक्षिण आशियाई राष्ट्रांमध्ये व्यापार संघ आणि आंतरराष्ट्रीय संघटना बरोबर सहकार्य वाढवणे.
- समान हितसंबंधांच्या बाबींवर आंतरराष्ट्रीय मंचांवर आपापसात सहकार्य मजबूत करणे.

सर्व स्तरावरील निर्णय एकमताने घ्यायचे आहेत; आणि द्विपक्षीय आणि वादग्रस्त मुद्दे असोसिएशनच्या चर्चेतून वगळण्यात आले आहेत.

**सार्कचे प्रमुख तत्वे**

दक्षिण आशियातील सर्वच राष्ट्रांनी दक्षिण आशियाच्या विकासासाठी सहकार्यासाठी प्रगतीसाठी आधारभूत ठरतील अशी खालील तत्त्वे स्वीकारलेली आहेत

1) सार्कच्या सदस्य राष्ट्राचे परस्पर सार्वभौमत्वाच्या आणि भौगोलिक एकात्मतेचा आदर करणे.

2) परस्पर अंतर्गत कारभार हस्तक्षेप केला जाणार नाही.

3) सदस्य राष्ट्रामध्ये समानता असेल.

4) परस्परांच्या हित व फायद्यासाठी प्रयत्न केले जातील.

5) सार्कच्या व्यासपीठावर झालेले करार सदस्य राष्ट्रांनी इतर राष्ट्राबरोबर केलेल्या कराराची जागा घेणार नाहीत.

**सार्क रचना**

सार्क शिखर परिषद

मंत्री परिषद

स्थायी समिती

कार्यक्रम समिती

तांत्रिक समित्या

कार्यरत गट

कृती समित्या

सार्क अध्यक्षपद

सार्क सचिवालय

सरचिटणीस

संचालक

**सार्क शिखर परिषद**

राज्य प्रमुखांच्या किंवा सदस्य राष्ट्रांच्या सरकारांच्या बैठका हा सार्क अंतर्गत निर्णय घेणारा सर्वोच्च अधिकार सार्क शिखर परिषदेला आहे.

**भारत आणि सार्क**

भारत सार्कचा संस्थापक सदस्यांपैकी एक देश असल्यामुळे भारत सारख्या सनदेतील उद्दिष्ट्याप्रमाणे दक्षिण आशियाई देशाच्या विकासासाठी राबवलेल्या विविध उपक्रमांना पाठिंबा देतो. विविध क्षेत्रात सहकार्य साध्य करण्यासाठी आत्तापर्यंत अठरा सार्क शिखर परिषदा झाल्या आहेत.भारताने सार्कच्या माध्यमातून सर्व सदस्य राष्ट्रांशी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय दृष्टिकोनातून आपले संबंध वाढवले आहेत.भारताने सार्कच्या माध्यमातून दक्षिण आशियाई देशात शांतता निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले आहेत.

भारत हा दक्षिण आशियातील सर्वात मोठा देश आहे 1947 पर्यंत भारत, पाकिस्तान, बांगलादेश हे एकच होते आणि ह्या विस्तृत प्रदेशाला भारतीय उपखंड म्हटले जात असे. भारत इतर देशांपेक्षा मोठा व उजवा आहे. नव्या संविधानातंर्गत अनेक आदर्श व सर्वसामान्य मूल्यच्या आधारावर भारतात सशक्त राजकीय संस्था निर्मिती निर्माण झाली. भारतीय नेत्यांनी सुरुवातीला जागतिक राजकारणात आघाडीची भूमिका निभावली आहे. तिसऱ्या जगाचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवण्यासाठी भारताने जागतिक राजकारणात अलिप्ततावादाच्या रूपाने नवीन चळवळ उभी केली आहे.परंतु भारताचे स्वतःचे धोरण रशियाच्या बाजूने झुकल्याने दक्षिण आशियातील आणि देशही स्वतःसाठी आधार शोधू लागले यामुळे भारताचा दबदबा जगात जरी वाढला तरी शेजारी राष्ट्रे मात्र काहीश्या संशयी नजरेने भारताकडे पाहू लागली होती. भारत दक्षिण आशियातील भौगोलिक दृष्ट्या मध्यवर्ती स्थानावर आहे. त्यामुळे प्रत्येक देशाची सीमा भारताच्या सीमेला भिडते.त्यामुळेम व्यापार

सहज होता, दळणवळण सहज होईल आणि परस्पर सहकार्यातून विकास करून घेता येईल असे असताना ही सुद्धा भारताच्या सीमेवर अनेक राष्ट्राच्यि सीमेवर चकमकी वाढू लागल्या आहेत.1998 मध्ये भारताने अणुचाचणी घेतल्या ह्या सर्वच परिस्थितीमुळे दक्षिण आशियातील देशांमध्ये आर्थिक सामाजिक तांत्रिक सहकार्य होऊ शकले नाही राजकीय अविश्वास व मतभेद यामुळे सर्व क्षेत्रात सहकार्याच्या प्रयत्नांना अडथळा निर्माण झाला भारताच्या दक्षिणाछेतील मध्यवर्ती स्थानामुळे आणि एकूण सर्वांगीण प्रगतीमुळे वास्तविक अन्य देशांना फायदा होऊ शकतो पण दुर्दैवाने नुकसान अधिक झाले आहे या ह्याला भारताप्रमाणे आणि देशही जबाबदार आहेत त्याबद्दल.

भारताने 20 जुलै 2022 रोजी सार्क देशांसोबत 13 प्रादेशिक व्यापार करार (RTAs)/मुक्त व्यापार करार (FTAs) केले आहेत.तंत्रज्ञानाची फळे वाटून घेण्याच्या आपल्या वचनबद्धतेत भारत ठाम आहे.आपल्या शेजारच्या समविचारी देशांसोबत प्रगती संदर्भात भारताचा पुढाकार पाहता भारताने नॅशनल नॉलेज नेटवर्क (NKN) चा विस्तार श्रीलंका, बांगलादेश आणि भूतानपर्यंत केला आहे.भारताने दक्षिण आशियाई उपग्रह श्रीहरिकोटा येथून मे 2017 मध्ये प्रक्षेपित केला आहे.सार्क प्रदेशातील आपत्ती जोखमीच्या सर्वांगीण व्यवस्थापनासाठी भारताने सार्क आपत्ती व्यवस्थापन केंद्र (IU) च्या अंतरिम युनिटचेही आयोजन केले होते.ते गुजरात आपत्ती व्यवस्थापन संस्था (GIDM), गांधीनगर मध्ये ते कार्यान्वित झाले आहे.भारतात ह दक्षिण आशियाई विद्यापीठ (SAU) चे केंद्र आहे.भारताच्या पंतप्रधानांच्या पुढाकाराने कोविड काळात सार्क नेत्यांची व्हिडिओ कॉन्फरन्स दि 15 मार्च 2020 रोजी कोविड-19 विरुद्ध लढा या विषयावर आयोजित करण्यात आली होती भारताने कोविड-19 साठी USD 10 दशलक्षच्या आपत्कालीन निधी सार्क राष्ट्रासाठी उपलब्ध करून दिला. तसेच या प्रदेशातील भारताच्या मानवतावादी दृष्टिकोनातून केलेल्या मदतीमध्ये आवश्यक औषधांचा पुरवठा समाविष्ट होता.सोबतच प्रतिजैविक, वैद्यकीय वस्तू, कोविड संरक्षण आणि चाचणी किट आणि इतर प्रयोगशाळा आणि हॉस्पिटल उपकरणे यासाठी सार्क राष्ट्रांना भारताने कोविड काळात मदत केली आहे.दक्षिण आशियाई उपखंडातील राष्ट्राच्या तुलनेत सर्व क्षेत्रांमध्ये भारताचे श्रेष्ठत्व आहे याची भारताला कल्पना आहे. परिणामी दक्षिण आशिया विकासाची उद्दिष्टाची पूर्तता भारताच्या पुढाकाराशिवाय होऊ शकत नाही हे वास्तव आहे.

### ३.३.२ भारत-पाक संबंध

1947 मध्ये ब्रिटिशांनी भारत सोडताना भारताची धार्मिक आधारावर फाळणी करून भारत आणि पाकिस्तान हे दोन राष्ट्र तयार केले.भारत आणि पाकिस्तान संबंधाच्या दृष्टिकोनातून या दोन्ही देशातील भाषिक, सांस्कृतिक, भौगोलिक आणि आर्थिक पार्श्वभूमी काही प्रमाणात सारख्या स्वरूपाची असली तरीही करतात, अनेक ऐतिहासिक आणि राजकीय घटनांमुळे भारत पाकिस्तान या दोन्ही देशातील संबंध अत्यंत तणावपूर्णचे व जटिलिटीचे राहिलेले आहेत.

**1947-1948**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात पहिले युद्ध काश्मीरवरून झाले. नव्याने तयार केलेल्या पाकिस्तानी सैन्याच्या मदतीने सशस्त्र पाकिस्तानी लष्कराने ऑक्टोबर 1947 मध्ये जम्मू आणि काश्मीरवर आक्रमण केले. जम्मू आणि काश्मीरचे तत्कालीन राजा महाराजा हरि सिंह

यांना अंतर्गत बंड तसेच बाह्य आक्रमणाचा सामना करावा लागला, त्यांनी भारत सरकारकडे सैन्याच्या मदतीची विनंती केली. महाराजा हरि सिंह यांनी भारताच्या काही अटी मान्य करून भारतात सामील होण्याचे मान्य केले. त्यांनी आपले संरक्षण, दळणवळण आणि परराष्ट्र व्यवहार यांचे नियंत्रण भारत सरकारकडे सोपवले.1948 पर्यंत लढाई चालू राहिली. 1 जानेवारी 1949 रोजी युनायटेड नेशन्स (यूएन) ने युद्धविरामाची व्यवस्था केली तेव्हा युनायटेड नेशन्स (यूएन) ने युद्धविरामाची व्यवस्था केली, संयुक्त राष्ट्र शांती सेना आणि जम्मूच्या प्रवेशावर सार्वमत घेण्याची शिफारस केली.

**1954**

जम्मू आणि काश्मीरच्या भारतात प्रवेशास राज्याच्या संविधान सभेने मान्यता दिली.1957 - जम्मू आणि काश्मीर संविधान सभेने राज्यघटना मंजूर केली. 1954 च्या अनुमोदन आणि 1957 च्या संविधानाच्या बिंदूपासून भारताने जम्मू आणि काश्मीरचा उल्लेख भारतीय संघराज्याचा अविभाज्य भाग म्हणून केला आहे.

**1963**

1962 च्या चीन-भारत युद्धानंतर, भारत आणि पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री - स्वरर्ण सिंग आणि झुल्फिकार अली भुट्टो - काश्मीर विवादासंदर्भात चर्चा करण्यात आली.

**1964**

1963 ची चर्चा अयशस्वी झाल्यानंतर, पाकिस्तानने काश्मीर प्रकरण संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेकडे पाठवले.

**1965**

1965 मध्ये, भारत आणि पाकिस्तान मध्ये दुसरे युद्ध झाले.

**1966**

10 जानेवारी, 1966 रोजी, भारताचे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री आणि पाकिस्तानचे अध्यक्ष अयुब खान यांनी ताश्कंद (आता उझबेकिस्तानमध्ये) येथे एका करारावर स्वाक्षरी केली.

**1971-1972**

1971 भारत आणि पाकिस्तान तिसऱ्यांदा एकमेकांच्या विरोधात युद्धात उतरले.पूर्व पाकिस्तान (आता बांगलादेश) भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तिसऱ्या युद्धाचे कारण बनले. झुल्फिकार अली भुट्टो यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम पाकिस्तानमध्ये बसलेल्या केंद्रीय पाकिस्तान सरकारने अवामी लीगचे नेते शेख मुजीबुर रहमान यांच्या पक्षाने 1970 च्या संसदीय निवडणुकीत बहुसंख्य जागा जिंकल्या, त्यांना पंतप्रधानपद स्वीकारण्यास नकार दिल्यावर संघर्ष सुरू झाला.1971 मध्ये ढाक्यात पाकिस्तानी लष्कराने आंदोलकांवर कारवाई केली ज्यामध्ये विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने मारले गेले. डिसेंबरमध्ये

पाकिस्तानी हवाई दलाने भारताच्या वायव्येकडील एअरफील्डवर प्री-एम्प्टिव्ह स्ट्राइक सुरू केल्यानंतर भारत संघर्षात सामील झाला.

भारताने पूर्व पाकिस्तानवर समन्वित जमीन, हवाई आणि सागरी आक्रमण करून प्रत्युत्तर दिले. यामुळे पाकिस्तानी सैन्याला ढाका येथे आत्मसमर्पण करण्यास भाग पाडले आणि 90,000 हून अधिक पाकिस्तानी सैनिकांना युद्धकैदी बनवण्यात आले.6 डिसेंबर 1971 रोजी पूर्व पाकिस्तान बांगलादेश हा स्वतंत्र देश बनला.

**1972**

पाकिस्तानचे पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो आणि भारतीय पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यात सिमला येथे एका करारावर स्वाक्षरी केली, ज्यामध्ये दोन्ही देश "आतापर्यंत त्यांच्या संबंधांमध्ये बिघडलेले संघर्ष संपुष्टात आणण्यास आणि परस्पर सहकार्याने काम करण्यास सहमत आहेत. मैत्रीपूर्ण आणि सौहार्दपूर्ण संबंध आणि उपखंडात शांतता प्रस्थापित करणे करण्यावर या करारात भर देण्यात आला.

**1974**

18 मे रोजी, भारताने पोखरण येथे "स्माइलिंग बुद्धा" नावाच्या ऑपरेशनमध्ये अणुस्फोट घडवून आणले. यावरूनही भारत पाकिस्तान संबंध काही अंशी बिघडलेले होते.

**1989**

काश्मीर खोऱ्यात सशस्त्र बंडखोरी सुरू झाली.

**1992**

रासायनिक शस्त्रांच्या वापरावर बंदी घालणाऱ्या संयुक्त घोषणापत्रावर नवी दिल्लीत स्वाक्षरी झाली.

**1998**

भारताने पोखरण येथे पाच अण्वस्त्रांचा स्फोट केला. पाकिस्तानने प्रत्युत्तर देत चघाई हिल्समध्ये स्वतःचे सहा अण्वस्त्र स्फोट घडवून आणले. या चाचण्यांमुळे दोन्ही देशांवर आंतरराष्ट्रीय निर्बंध लादण्यात आले. दोन्ही देश नवीन अण्वस्त्रधारी राष्ट्रे बनले.

**1999**

भारतीय पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधान नवाझ शरीफ यांना भेटण्यासाठी बसने लाहोरला प्रवास केला व याच काळात दिल्ली लाहोर बस सेवा सुरू झाली.

**1999**

भारत पाकिस्तान मध्ये कारगिल युद्ध झाले.

**2001**

भारत पाकिस्तान नियंत्रण रेषेवर तणाव कायम राहिला, श्रीनगरमधील काश्मिरी विधानसभेवर झालेल्या हल्ल्यात 38 लोक मारले गेले. त्या हल्ल्यानंतर, भारत-प्रशासित

काश्मीरचे मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांनी भारत सरकारला पाकिस्तानमधील कथित प्रशिक्षण शिबिरांवर पूर्ण प्रमाणात लष्करी कारवाई सुरू करण्याचे आवाहन केले.

**2001**

13 डिसेंबर रोजी नवी दिल्लीतील भारतीय संसदेवर सशस्त्र हल्ल्यात 14 लोक ठार झाले. हल्ल्यासाठी एलईटी आणि जेईएमला जबाबदार धरण्यात आले होते.

**2003**

मुशर्रफ यांनी सप्टेंबरमध्ये यूएन जनरल असेंब्लीच्या बैठकीत नियंत्रण रेषेवर युद्धविराम करण्याचे आवाहन केल्यानंतर, दोन्ही देश तणाव कमी करण्यासाठी आणि वास्तविक सीमेपलीकडील शत्रुत्व थांबवण्यासाठी करार करण्याच्या मुद्द्यापर्यंत येऊन थांबले.

**2004**

पंतप्रधान वाजपेयी आणि अध्यक्ष मुशर्रफ यांनी जानेवारीत इस्लामाबाद येथे 12 व्या दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेच्या (सार्क) परिषदेत थेट चर्चा केली.

**2008**

26 नोव्हेंबरला मुंबई दहशतवादी हल्ले झाले. या दहशतवादी हल्ल्यात अतिरेकी अजमल कसाबला जिवंत पकडण्यात आले होते. त्याने हल्लेखोर एलईटीचे सदस्य असल्याची कबुली दिली.या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानशी चर्चा करणे बंद केले होते.

**2009**

पाकिस्तान सरकारने कबूल केले की मुंबई हल्ल्याची योजना पाकिस्तानी भूमीवर होती, परंतु कटकारस्थानांना पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थांनी मंजुरी दिली होती किंवा त्यांना मदत केली होती हे नाकारले.

**2010**

जानेवारीमध्ये, पाकिस्तानी आणि भारतीय सैन्याने काश्मीरमधील नियंत्रण रेषेवर गोळीबार केला, अशा घटनांच्या ताज्या घटनांमुळे या भागात तणाव वाढला होता.

**2011**

जानेवारीमध्ये, भारताचे गृहसचिव जीके पिल्लई म्हणालेकी भारत 2001 च्या समझौता एक्सप्रेस बॉम्बस्फोटासंदर्भात पाकिस्तानशी माहिती सामायिक करेल.

**2012**

**नोव्हेंबरमध्ये, भारताने पाकिस्तानी नागरिक कसाबला फाशी दिली.**

**2013**

सप्टेंबरमध्ये, भारत आणि पाकिस्तानच्या पंतप्रधानांची न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्र महासभेत भेट झाली. जम्मू आणि काश्मीरमधील वादग्रस्त प्रदेशातील दोन्ही बाजूंच्या सैन्यांमधील तणाव संपविण्यास त्यांनी सहमती दर्शविली.

**2014**

25 मे रोजी, पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांच्या शपथविधी समारंभाच्या आधी पाकिस्तानने 151 भारतीय मच्छिमारांना आपल्या तुरुंगातून मुक्त केले.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीत पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्याशी चर्चा केली. दोन्ही बाजूंनी द्विपक्षीय संबंधांचे नवे पर्व सुरू करण्याची इच्छा व्यक्त केली.

**2015**

भारतातील सत्ताधारी भारतीय जनता पक्ष (BJP) पक्षाने मार्चमध्ये स्थानिक पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी (PDP) सोबत युती करून जम्मू आणि काश्मीरमध्ये सरकार स्थापन केले. पीडीपीचे प्रमुख मुफ्ती मोहम्मद सईद यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

**2015**

शरीफ यांचा वाढदिवस आणि त्यांच्या नातवाच्या लग्नाला मोदींनी पाकिस्तानच्या पूर्वेकडील लाहोर शहराला अचानक भेट दिली.

**2016**

सैनिकांच्या वेशात दहशतवाद्यांनी जानेवारीमध्ये भारताच्या वायव्येकडील पंजाब राज्यातील पठाणकोट एअरबेसवर प्राणघातक हल्ला केला.

**2016**

भारताने, उरीमधील हल्ल्याला आपल्या पहिल्या थेट लष्करी प्रत्युत्तरात, पाकिस्तान प्रशासित जम्मू आणि काश्मीरमध्ये एलओसी ओलांडून संशयित दहशतवाद्यांवर 'सर्जिकल स्ट्राइक' केले.

**2017**

भारतीय सैन्याने मे महिन्यात नियंत्रण रेषेजवळ नौशेरा येथे पाकिस्तानी सैन्याच्या चेक पोस्टवर बॉम्बस्फोट केले, जे लष्कराचे प्रवक्ते अशोक नरुला यांच्या मते, भारतीय प्रशासित जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवाद्यांची घुसखोरी रोखण्यासाठी करण्यात आले होते.

**2018**

जानेवारीमध्ये, भारतीय लष्कराने असा दावा केला आहे की, 2017 मध्ये जम्मू आणि काश्मीरमधील नियंत्रण रेषेवर केलेल्या गोळीबारात एकूण 138 पाकिस्तानी लष्कराचे जवान मारले गेले आणि त्याच कालावधीत 28 सैनिक गमावले.

**2019**

14 फेब्रुवारी रोजी, भारत प्रशासित जम्मू आणि काश्मीरमधील पुलवामा येथे झालेल्या आत्मघाती बॉम्बस्फोटात भारतीय केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) चे 40 सदस्य ठार झाले. भारतीय सैन्यावरील हा सर्वात मोठा प्राणघातक हल्ला होता.

जम्मू आणि काश्मीरमध्ये मुस्लिम, हिंदू आणि बौद्ध यांच्यात शतकानुशतके जातीय सलोखा असूनही, काश्मीर खोऱ्यातील जम्मू आणि काश्मीरमधील अल्पसंख्याक हिंदू समुदायाला (काश्मिरी पंडित) अतिरेक्यांनी लक्ष्य केले आणि त्यांना स्थलांतर करण्यास भाग पाडले.लष्कर-ए-तैयबा (LeT), जैश-ए-मुहम्मद (JeM) आणि हिजबुल मुजाहिदीन सारख्या अनेक पॅन-इस्लामिक दहशतवादी गट जम्मू आणि काश्मीरमध्ये सक्रिय आहेत. या गटांचे मुख्यालय पाकिस्तान आणि पाकिस्तान प्रशासित जम्मू आणि काश्मीरमध्ये आहे, असे अनेक पाश्चात्य सरकारांसह आंतरराष्ट्रीय वर्तुळात व्यापकपणे मानले जाते.

काश्मीर प्रश्नावरूनभारताचे म्हणणे आहे की पाकिस्तान काश्मीरमधील हल्ल्यांना “सीमेपलीकडील दहशतवाद” म्हणून शस्त्रे आणि सैनिकांना प्रशिक्षण देऊन प्रतिकाराला पाठिंबा देत आहे. पाकिस्तानने याचा वेळोवेळी इन्कार केला आहे.एकंदरीतच भारत आणि पाकिस्तान यातील संबंध मधील काश्मीर मुद्दा हा कळीचा मुद्दा असून काश्मीर मुद्द्याच्या संदर्भात सीमेपलीकडील दहशतवादावरून दोनही राष्ट्रात तणावपूर्ण संबंध कायमस्वरूपी असतात.

### ३.३.३ भारत बांगलादेश संबंध

भारत आणि बांगलादेश यांच्यात आसाम, त्रिपुरा, मिझोराम, मेघालय आणि पश्चिम बंगालमधून जाणारी 4096.7किमीची सीमा आहे. बांगलादेशला डिसेंबर 1971 मध्ये स्वातंत्र्य मिळाले आणि भारत हा पहिला देश होता ज्याने त्याला स्वतंत्र आणि सार्वभौम राज्य म्हणून मान्यता दिली.

भारताच्या नेबरहुड फर्स्ट धोरणात बांगलादेशची भूमिका महत्त्वाची आहे.बांगलादेशशी भारताचे संबंध सभ्य, सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक आहेत. त्यामध्ये अशा अनेक गोष्टी आहेत ज्या दोन राष्ट्रांना एकत्र आणतात, ज्यात त्यांचा सामायिक इतिहास आणि सांस्कृतिक वारसा आणि संगीत, साहित्य आणि कलाचा समावेश आहे.दोन्ही देशांमध्ये 54 नद्या आहेत. दोन्ही देशांदरम्यान गंगा नदीच्या पाणी वाटपाचा करार आधीच अस्तित्वात आहे. आणि दोन्ही देश सामायिक नद्यांच्या पाणी वाटपासाठी करार पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. याशिवाय, जैवविविधतेचा मौल्यवान स्रोत असलेल्या संपूर्ण सुंदरबन परिसंस्थेचे संरक्षण करण्यासाठी दोन्ही देश एकत्र काम करत आहेत.

BIMSTEC (बंगालचा उपसागर मल्टी-सेक्टरल टेक्निकल अँड इकॉनॉमिक कोऑपरेशन), SAARC (South Asian Association for Regional Cooperation), आणि IORARC (इंडियन ओशन रिम असोसिएशन फॉर प्रादेशिक सहकार्य) या बहुपक्षीय मंचांद्वारे भारत आणि बांगलादेश देखील प्रादेशिक सहकार्यामध्ये गुंतलेले आहेत

### कुशीयारा नदी पाणी करार

कुशियारा नदी जल करार हा १९९६ च्या ऐतिहासिक गंगा जल करारानंतरचा पहिला पाणी वाटप करार आहे.

या अंतर्गत, आसाममधून वाहणाऱ्या कुशियारा नदीचे पाणी वाटप करण्याबाबत दोष देशांदरम्यान सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे.

## भारत आणि बांगलादेश यांच्यात व्यापार

बांगलादेश हा भारताचा अग्रगण्य दक्षिण आशियाई मधला व्यापार भागीदार सहकारी बनला आहे. बांगलादेश 2021-2022 या वर्षांमध्ये भारतीय निर्यातीसाठी जगातील चौथ्या क्रमांकाची बाजारपेठ बनली आहे.

आथिर्क वर्ष 2020-21 आणि आर्थिक वर्ष 2021-22 मध्ये बांगलादेशातील निर्यात $9.69 अब्ज वरून $16.15 अब्ज इतकी वाढली आहे.

## CEPA भारत आणि बांगलादेश

वस्तू, सेवा आणि गुंतवणुकीवरील व्यापारावर लक्ष केंद्रित करून दोन्ही देशांमधील व्यापार असमतोल दूर करणे हे CEPA चे प्रमुख उद्दिष्ट आहे.बांगलादेश एका वर्षात CEPA ला अंतिम रूप देण्यास उत्सुक आहे कारण ते 2026 पर्यंत विकसनशील देशामध्ये संक्रमण करण्याची तयारी करत आहे, त्यानंतर ते यापुढे अल्प-विकसित देश म्हणून सध्या लाभलेल्या व्यापार विशेषाधिकारांसाठी पात्र राहणार नाही.

## भारत आणि बांगलादेश यांच्यातील संघर्षाचे क्षेत्र

### तीस्ता नदी वाद

तीस्ता नदी भारत आणि बांगलादेशातील भात पिकवणाऱ्या प्रदेशासाठी सिंचनाचा प्रमुख स्त्रोत आहे. 1996 च्या गंगा जल कराराच्या धर्तीवर तिस्ताच्या पाण्याचे न्याय्य वाटप हे दोन्ही देशांचे लक्ष्य होते.नदीच्या पाण्याचा प्रवाह कमीत कमी ठेवण्यासाठी 2011 मध्ये एक करार झाला ज्यामध्ये भारताला 42.5%, बांगलादेशला 37.5% आणि उर्वरित 20% नदीच्या पाण्याचा प्रवाह मुक्त  ठेवण्यात आला आहे.  मतभेदांमुळे, हा करार आजपर्यंत अंमलात आणला गेला नाही.

### फरक्का बॅरेज वाद

1996 मध्ये दोन्ही देशांनी गंगा पाण्याच्या वाटणीबाबत यशस्वीपणे करार केला असला तरी, हुगळीच्या पाणीपुरवठ्यात वाढ करण्यासाठी बांधण्यात आलेल्या फराक्का बॅरेजच्या उभारणीबाबत आणि चालविण्याबाबत भारतामध्ये अजूनही दीर्घकालीन मतभेद आहेत.पाणी हा भारतातील राज्याचा विषय आहे, त्यामुळे धरणाच्या प्रासंगिकतेचे पुनरावलोकन करण्यासाठी आणि बांगलादेशला काही सवलती देण्यासाठी बंगाल आणि भारताच्या राज्य सरकारमधील कराराचा अभाव ही अडचण आहे.

### बंडखोरी

दोन्ही देशांमधील मतभेदाचा एक मुख्य मुद्दा म्हणजे बंडखोरी. माध्यमांच्या सूत्रांनुसार, युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम (उलफा), नॅशनल डेमोक्रॅटिक फ्रंट ऑफ बोडोलँड आणि नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरा या सर्वांनी 2001 मध्ये बांगलादेशमध्ये छावण्या चालवल्या होत्या.याव्यतिरिक्त, अशी शंका आहे की ULFA चे बांगलादेशमध्ये अनेक यशस्वी उपक्रम आहेत ज्याचा उपयोग ते भारतात आपल्या बंडखोर कारवायांसाठी व निधी देण्यासाठी करते.

### बेकायदेशीर स्थलांतर

देशाच्या अशांततेचा परिणाम म्हणून बांगलादेशी सीमा ओलांडून स्थलांतरित होण्याच्या प्रवाहामुळे दोन्ही देशांमधील संबंध आणखी ताणले गेले आहेत. त्रिपुरा, मिझोराम, आसाम, मेघालय आणि पश्चिम बंगाल यासह बांगलादेशच्या सीमेवर असलेल्या भारतीय राज्यांतील रहिवाशांना या स्थलांतरितांच्या सीमेपलीकडून लक्षणीय ओघ आल्याने सामाजिक-आर्थिक-राजकीय आव्हानांचा सामना करावा लागला आहे.

### चीनच्या प्रभावाचा प्रतिकार करणे

बांग्लादेशला आण्विक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक शेती पद्धती आणि पूर डेटाची देवाणघेवाण याद्वारे बांगलादेशला त्यामुळे चीनची बांगलादेशची वाढलेली संबंध पाहता बांगलादेश आणि भारताच्या समाजामध्ये चीन आडवा येत आहे.

### सीमा विवाद

बांगलादेश आणि भारत यांच्या सीमेवर तणाव काही नवीन नाही. 4,096 किमी लांबीची जमीन सीमा आणि 180 किमी लांबीची सागरी सीमा भारताला बांगलादेशपासून वेगळे करते. कोमिल्ला-त्रिपुरा भूमी सीमा, जी 6.5 किलोमीटरपर्यंत पसरलेली आहे, सीमांकन केले गेले नाही, ज्यामुळे सीमा विवाद निराकरण आजपर्यंत झालेले नाही.

### नदीचे पाणी सामायिक करणे

दोन्ही देशांमधील मुख्य मुद्द्यांपैकी एक म्हणजे पाण्यावरून असलेले मतभेद. सामायिक नदी प्रणालींचे जास्तीत जास्त फायदे मिळवण्यासाठी, दोन्ही राष्ट्रांमध्ये द्विपक्षीय संयुक्त नद्या आयोग (JRC) आहे, जो जून 1972 मध्ये स्थापन करण्यात आला होता. त्याच्या कर्तव्यांमध्ये पूर नियंत्रण उपाय विकसित करणे, आगाऊ पूर चेतावणीसाठी प्रस्ताव तयार करणे, पुराचा अंदाज घेणे समाविष्ट आहे.

भारत आणि बांगलादेश हे केवळ जवळचे ऐतिहासिक, सभ्यता आणि सांस्कृतिक संबंधच सामायिक करत नाहीत तर 1971 मध्ये बांगलादेशच्या स्वातंत्र्यानंतर अनेक दशकांपासून मजबूत सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संबंध देखील निर्माण केले आहेत. समान वारसा, भाषिक आणि सांस्कृतिक दुवे, कला, संगीत आणि साहित्याची आवड आणि लोक-लोकांमधील मजबूत संबंध, दोन्ही देशांमध्ये एक अद्वितीय सौहार्द आणि मैत्री आहे.

भारताने नेहमीच बांगलादेशसोबतचे आपले घनिष्ठ नातेसंबंध जपले आहेत आणि बांगलादेशच्या विकासाच्या अजेंड्याला हातभार लावताना त्यांच्याशी संबंध मजबूत करण्यासाठी काम केले आहे. भारताच्या प्रमुख 'नेबरहुड फर्स्ट' धोरणांतर्गत बांगलादेश हा एक महत्त्वाचा भागीदार आहे. दोन्ही देशांमधील सहकार्य व्यापार आणि वाणिज्य, ऊर्जा आणि ऊर्जा, वाहतूक आणि कनेक्टिव्हिटी, विज्ञान आणि तंत्रज्ञान, संरक्षण आणि सुरक्षा, सागरी व्यवहार, हवामान बदल आणि शाश्वत विकास यासह सर्व क्षेत्रांमध्ये आहे.

भारत आणि बांगलादेश यांच्यात बहुआयामी आणि विस्तारणारे संबंध आहेत. बांगलादेशच्या विकासात मदत करण्यासाठी, भारत बांगलादेशी नागरिकांना ITEC, TCS ऑफ कोलंबो प्लॅन, ICCR, आयुष, कॉमनवेल्थ, SAARC आणि IOR-ARC शिष्यवृत्ती/फेलोशिप योजना अंतर्गत एकतर्फी शिष्यवृत्ती आणि प्रशिक्षण कार्यक्रम ऑफर करतो. कोविड-19

महामारीच्या काळात भारताने बांगलादेशला लसींचे मोफत डोस आणि पीपीई किट आणि अत्यावश्यक औषधे यांसारख्या वैद्यकीय तरतुदी देऊन मैत्रीचा हात पुढे केला आहे.

## ३.४ सारांश

आपल्या 'नेबरहुड फर्स्ट' धोरणांतर्गत , भारत आपल्या सर्व शेजाऱ्यांसोबत मैत्रीपूर्ण आणि परस्पर फायदेशीर संबंध विकसित करण्यासाठी वचनबद्ध आहे.दळणवळण, सुधारित पायाभूत सुविधा, विविध क्षेत्रातील मजबूत विकास सहकार्य,आर्थिक सहकार्य,लष्करी आणि संरक्षण सहकार्य,सुरक्षा आणि व्यापक लोक संपर्क,तंत्रज्ञान हस्तांतरण,आपत्ती व्यवस्थापन व त्याचे फायदे वितरीत करण्यावर शेजारी राष्ट्रासंबंधी संबंध विकसित करण्यावर भारताने लक्ष केंद्रित आहे.

**आपली प्रगती तपासा**

**भारताचे शेजारी राष्ट्राविषयीचे धोरण सांगा.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**सार्कची उद्दिष्टे सांगा.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**भारत पाकिस्तान संबंध भाष्य करा.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ३.५ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

देवळाणकर शैलेंद्र.2017. भारताचे परराष्ट्र धोरण नवीन प्रवाह, सकाळ पेपर्स प्रायव्हेट लिमिटेड पुणे.

रायपूरकर वसंत, आंतरराष्ट्रीय संबंध, श्री मंगेश प्रकाशन नागपूर

❄❄❄❄❄❄❄

# ४

# भारत आणि आंतरराष्ट्रीय संघटना

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रस्तावना

४.३ भारत आणि आसियान

४.४ भारत आणि भारत आणि संयुक्त राष्ट्र संघटना

४.५ विद्यापीठीय प्रश्न

४.६ संदर्भग्रंथ

## ४.१ उद्दिष्टे

१) भारत आणि आसियान संबंधातील वाटचालीचा आढावा घेणे.

२) संयुक्त राष्ट्र संघटनेतील भारताचे योगदान समजून घेणे.

## ४.२ प्रस्तावना :

भिन्न भिन्न राष्ट्रांतील शासकीय यंत्रणांनी अगर खाजगी व्यक्तींनी एकत्र येऊन काही विशिष्ट हेतू साध्य करण्यासाठी स्थापन केलेली स्थायी स्वरूपाची यंत्रणा म्हणजे आंतरराष्ट्रीय संघटना होय. परस्परांचे हितसंबंध असणाऱ्या राष्ट्रांनी समान बंधने घालून घेणे स्वहिताच्या दृष्टीने आवश्यक असते. या आवश्यकतेतूनच आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण होत असतात. अशा संघटनांपैकी काहींची व्याप्ती जागतिक असते, तर काही प्रादेशिक वा विशिष्ट राष्ट्रांपुरत्याच मर्यादित असतात. संयुक्त राष्ट्रे, जागतिक आरोग्य संघटना या जागतिक संघटना होय. तर अमेरिकन राष्ट्रांची संघटना, अरब लीग, आसियान, सार्क ह्या प्रादेशिक संघटना आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र एका विशिष्ट प्रदेशापुरतेच मर्यादित आहेत. त्यापैकी आजमितीला आसियान आग्नेय आशियातील देशांची एक महत्वाची संघटना आहे. भारताच्या हितसंबंधांच्या दृष्टीने ती महत्वाची असून, ती आणि तिच्या सदस्य देशांशी आर्थिक-व्यापारिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी भारताने सुरुवातीपासून प्रामुख्याने १९९१ पासून धोरणे आखायला सुरुवात केली. प्रस्तुत प्रकरणात आपण भारत आणि आसियान यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणार आहोत.

संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना २४ ऑक्टोबर, १९४५ रोजी झाली. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकवणे, शांतता आणि सुरक्षेच्या प्रमाणेच मानवी हक्कांचे रक्षण करणे ही संयुक्त राष्ट्र संघटनेची प्रमुख उद्दिष्टे असून, त्या अनुषंगाने संयुक्त राष्ट्र संघटना कार्य करीत असते. प्रस्तुत प्रकरणात आपण संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कार्यातील भारताचे योगदानाचा अभ्यास करणार आहोत.

## ४.३ भारत आणि आसियान

भारत आणि आसियान संबंधांचा अभ्यास कण्यापूर्वी आसियान म्हणजे काय? ते अभ्यासणे महत्वाचे आहे. ASEAN - Association of South East Asian Nations म्हणजे दक्षिण-पूर्व आशियाई राष्ट्रांची सहकारी संघटना होय. दक्षिण-पूर्व आशियाई राष्ट्रांच्या आर्थिक विकासात ASEAN संघटनेचे योगदान महत्त्वाचे आहे. आज या राष्ट्रांना 'एशियन टायगर्स' (Asian Taigers) म्हणून ओळखले जाते. अँड्र्यू हेवूड हा विचारवंत ASEAN चा उल्लेख 'East Asian Regime' असा करतो.

- **स्थापना-** ८ ऑगस्ट १९६७ रोजी बँकॉक येथे

- **सदस्य-** स्थापनेच्या वेळी ASEAN ची थायलंड, मलेशिया, सिंगापूर, फिलीपाईन्स आणि इंडोनेशिया ही मूळ सदस्य राष्ट्रे होती. नंतर ब्रुनेई (१९८४), व्हिएतनाम (१९९५), लाओस (१९९७), कंबोडिया (१९९९), म्यानमार इ. राष्ट्रांनी ASEAN चे सदस्यत्व स्वीकारले. सध्या ASENNची सदस्यसंख्या १० असून, म्यानमार हा सदस्यत्व मिळवणारा शेवटचा देश आहे.

- **मुख्यालय -** इंडोनेशिया (जकार्ता)

- **उद्देश -** १) दक्षिण-पूर्व आशियाई राष्ट्रात आर्थिक सहकार्य वृद्धिंगत करणे.

  २) सदस्य राष्ट्रांतील साधनसंपत्तीचा सामूहिक वापर करणे

  ३) आर्थिक सहकार्याबरोबरच तांत्रिक-सामाजिक सांस्कृतिक - प्रशासकीय क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढविणे.

  भौगोलिक दृष्ट्या दक्षिण-पूर्व आशियाई राष्ट्रांशी संलग्न असणाऱ्या राष्ट्रांनाच केवळ ASEAN मध्ये प्रवेश देशात आला आहे.

- **रचना-**

  ASEAN चे चार प्रमुख घटक आहेत ते म्हणजेच

१) **मंत्रिपरिषद :** यामध्ये सदस्य राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्यांचा समावेश होतो. विभागीय हितसंबंधाच्या दृष्टीने महत्वाच्या प्रश्नांवर निर्णय घेण्याचे कार्य मंत्रिपरिषद करते. मंत्रिपरिषदेच्या नियमित बैठका होत असतात.

२) **कार्यकारी समिती :** कार्यकारी समितीची बैठक आवश्यकतेनुसार घेण्यात येते. ASEAN च्या अधिवेशनाची तयारी करणे, चर्चेचे विषय ठरविणे इ. कार्ये ही समिती करते. तसेच या समितीत ज्या राष्ट्रात अधिवेशन होणार आहे त्या राष्ट्राच्या परराष्ट्र मंत्री व इतर सदस्य राष्ट्रांचा समावेश होतो.

३) **सचिवालय :** ASEAN चे प्रशासकीय कार्य सचिवालयामार्फत चालविले जाते. १९७६ मध्ये सचिवालयाची निर्मिती करण्यात आली. ASEAN चे सचिवालय इंडोनेशियातील जकार्ता येथे आहे. ५ वर्षाच्या मुदतीसाठी मुख्य सचिवांची नेमणूक करण्यात येते.

४) **स्थायी- अस्थायी समित्या :** आर्थिक – व्यापारी सहकार्याच्या विविध पैलूंवर चर्चा करण्यासाठी ASEAN अंतर्गत विषयवार स्थायी - अस्थायी समित्या निर्माण करण्यात आल्या आहेत. सध्या ASEAN मध्ये ९ स्थायी तर ८ अस्थायी समित्या आहेत.

दक्षिण पूर्व आशियाई राष्ट्रांमधील व्यापारी, आर्थिक, सामाजिक, संरक्षण क्षेत्रातील सहकार्यात आसियानची भूमिका महत्वाची आहे. आज जगातील सर्वांत शक्तिशाली व्यापारसंघापैकी ASEAN एक असून, ASEAN मध्ये प्रवेशासाठी अनेक राष्ट्रे उत्सुक असून, भारतही त्यापैकी एक आहे. सन् १९९० च्या दशकातील काही दक्षिण- पूर्व आशियाई राष्ट्रांच्या आर्थिक विकासाचा दर हा पाश्चिमात्य विकसित राष्ट्रांपेक्षा अधिक होता.

### **४.३.१ ASEAN राष्ट्रांची प्रादेशिक परिषद:**

ऑगस्ट १९६७ च्या बँकॉक जाहीरनाम्यानुसार ASEAN ची स्थापना झाली. ASEAN राष्ट्रांच्या प्रादेशिक परिषदेची सुरुवात १९९३ च्या मंत्रिपरिषदेनंतर झाली. भारताने जुलै, १९९६ मध्ये प्रथमच ASEAN राष्ट्रांच्या प्रादेशिक परिषदेत सहभाग घेतला. जुलै, २००४ च्या परिषदेत पाकिस्तान सहभागी झाला.

१९९५ च्या बुरुंडी परिषदेत ASEAN प्रादेशिक मंचाची ३ मुख्य उद्दिष्टे सांगितली आहेत.

१) विश्वासबांधणीसाठी प्रयत्न करणे यात आपत्ती निवारण व शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांचा समावेश होतो.

२) प्रतिबंधात्मक राजनीतीचा (Preventive Diplomacy) चा विकास

३) संघर्ष सोडविण्याचे विविध मार्ग तयार करणे.

३० नोव्हेंबर, २००४ रोजी भारत व ASEAN राष्ट्रांनी शांतता, प्रगती व सामाजिक समृद्धीच्या एका ऐतिहासिक करारावर सह्या केल्या त्यात पुढील घटकांचा समावेश होतो

- व्यापारविषयक गुंतवणूकीत वाढ करणे
- पर्यटन
- सांस्कृतिक घटक
- व्यक्ती - व्यक्तीतीत संबंध
- आंतरराष्ट्रीय हदशतवादाच्या मुकाबल्यासाठी प्रयत्न
- मादक द्रव्य व्यापार, शस्त्रास्त्रांची तस्करी, अनैतिक कारणासाठी मानवाचा व्यापार अशा आंतरराष्ट्रीय गुन्हयांचा प्रतिकार करणे

### **४.३.२ भारत - ASEAN संबंध:**

गेल्या अनेक वर्षापासून भारत ASEAN संघटनेशी आर्थिक आणि व्यापारी संबंध सुधारण्याचा, त्या संघटनेत स्थान मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. वास्तविक पाहता

ASEAN च्या स्थापनेच्या काळात ASEAN ने भारताला सदस्यत्व देऊ केले होते; परंतु अमेरिकेचे अंकित असणाऱ्या या संघटनेत सामील होण्यास भारताने नकार दिला.

शीतयुद्धाचे राजकारण, पाकिस्तानचा शीतयुद्धाच्या राजकारणात अमेरिकेच्या बाजूने झालेला प्रवेश, काशीर प्रश्न, पाकिस्तान-चीन मैत्रीचेचे साटेलोटे, यामुळे आशियातील इतर राष्ट्रांना लक्ष द्यायला भारताकडे वेळ नव्हता. पंडित नेहरू आणि इंदिरा गांधींच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाचा मुख्य उद्देश काश्मीर प्रश्नावर भारताची भूमिका कशी योग्य आहे? हे अमेरिकेला आणि पश्चिम युरोपीयन राब्दांना पटवून देणे हाच होता.

या दृष्टीकोनातून भारतीय राजनीतीचा वापर केला गेला. परिणामी आशियाई राष्ट्रांचे विशेषत: दक्षिण - पूर्व आशियाई राष्ट्रांचे भारतासाठीचे आर्थिक महत्व ओखण्यात किंबहुना त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्याची मोठी चूक स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकीय नेतृत्वाकडून झाली. ASEAN संघटना अमेरिकेच्या शीतयुद्धाच्या राजकारणाचा भाग असून, भांडवलवादाला चालना देणारी आहे हीच समजून १९६०-७० च्या दशकात भारताची होती. भारताच्या सोविएत रशियाकडील झुकत्या धोरणामुळे भारताचा हा गैरसमज दृढ होण्यास मदत झाली.

१९७१ चा भारत- सोवियत रशिया मैत्री करार, बांग्लादेश युद्ध, शीतयुद्धाविषयीचे भिन्न भिन्न दृष्टीकोन, इंडो-चीन प्रदेशातील संघर्षातील परस्परविरोधी भूमिका यामुळे भारत - ASEAN देशात मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होऊ शकले नाही. त्याचप्रमाणे १९७१च्या भारत- पाक युद्धानंतर भारताचे जागतिक राजकारण जसजसे अधिकाधिक पाककेंद्री होत गेले तसतसा पूर्वेकडच्या देशांचा विचार भारतीय परराष्ट्र धोरणात अधिकाधिक दुय्यम होत गेला.

१९९१ मध्ये शीतयुद्धाच्या अंतानंतर ही परिस्थिती बदलली. भारत- आसियान संबंध सुधारण्यास सुरवात झाली. भारत- ASEAN संबंध सुधारण्याचे काही कारणे म्हणजेच

१) भारताचे आर्थिक उदारीकरणाचे धोरण

२) आर्थिक हितसंबंधांना परराष्ट्र धोरणात दिले गेलेले प्राधान

३) भारताचे चीन- व्हिएतनाम-जपानबरोबर सुधारलेले संबंध

४) ASEAN ने आर्थिक क्षेत्रात केलेली नेत्रदीपक प्रगती

५) इंडोनेशिया - थायलंड सारख्या ASEAN च्या मोठ्या सदस्यराज्यांच्या भारताकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात झालेला सकारात्मक बदल

६) शीतयुद्धाचा अंत

अशा विविध कारणांमुळे २० व्या शतकाच्या शेवटच्या दशकात भारताचे परराष्ट्र धोरण आमूलाग्र बदलले. याच काळात भारताच्या पूर्वाभिमुख परराष्ट्र धोरणाचा विकास झाला, ज्याचा परिणाम म्हणून आग्नेय आशिया तसेच पूर्व आशियातील देशांशी संबंध वृद्धिंगत करण्याला प्राधान्य देण्यात आले.

### ४.३.३ भारताचे पूर्वेकडे पहा धोरण (Look East Policy)

शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर भारत - ASEAN मधील दुरावलेले संबंध पुर्नप्रस्थापित करण्यासाठी भारताचे तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस शासनाने १९९१ मध्ये दक्षिण - पूर्व आशियाई राष्ट्रांविषयी जे धोरण आखले त्याला भारताचे पूर्वेकडे पहा धोरण (Look East Policy) असे म्हटले जाते. या धोरणात तीन गोष्टींना प्राधान्य देण्यात आले

१) ASEAN च्या सदस्य राष्ट्रांबरोबर राजकीय संबंध सुधारणे

२) विज्ञान-तंत्रज्ञान, व्यापार, गुंतवणूक, पर्यटन, अशा क्षेत्रामध्ये सहकार्य वाढवणे.

३) ASEAN राष्ट्रांबरोबर संरक्षणविषयक संबंध प्रस्थापित करणे

ASEAN नेदेखील आपल्या धोरणात बदल करून भौगोलिकदृष्ट्या दक्षिण-पूर्व आशियाशी संलग्न असणाऱ्या राष्ट्रांना संघटनेत प्रवेश देण्याचे ठरवले. भारताच्या Look East Policy च्या धोरणाचे दोन टप्प्यात विभाजन करता येईल.

१) व्यापार गुंतवणूक क्षेत्रातील संबंध

२) मुक्त व्यापार क्षेत्राची स्थापना व संस्थात्मक आर्थिक संबंध

दुसऱ्या टप्प्याच्या वैशिष्ट्याबद्दल अनेक बाबींचा उल्लेख करता येईल. त्यापैकी एक म्हणजे व्यापक भौगोलिक दृष्टीकोन. यात पूर्व (East) या शब्दाच्या कक्षेत ASEAN देश केंद्रबिंदू ठेवून ऑस्ट्रेलिया, चीन, जपान, द कोरिया या देशांचाही समावेश केला आहे. दुसरे म्हणजे पहिल्या टप्प्यात फक्त आर्थिक बाबींवर असलेला भर बदलुन दुसऱ्या टप्प्यात सुरक्षा क्षेत्रातील सहकार्याचा समावेश करण्यात आला आहे. भारत-ASEAN देशात दळणवळणाचे मार्ग उभारण्यात आले असून, त्यात हवाई, रस्ते, रेल्वे, समुही मार्ग बांधण्याचे प्रयत्न होत आहे. त्यात भारत-म्यानमार - थायलंड हा महामार्ग व दिल्ली - हनोई हवाई मार्गाचा समावेश आहे.

LEP मुळे भारत - ASEAN मधील राजकीय अडथळे दूर करण्यासही मदत झाली आहे. १९९५ मध्ये स्थापन झालेला BIMSTEC - Bay of Bangal Initiative for multi-sectoral Technical & Economic Co-operation हा गट भारत- ASEAN दरम्यानच्या संबंधातील पूल ठरला आहे, कारण BIMSTEC चे दोन सदस्य म्यानमार व थायलंड ASEAN चे सदस्य आहेत. त्याशिवाय CMLV देश म्हणजे कंबोडिया, म्यानमार, लाओस, व्हिएतनाम, थायलंड आणि भारत यांनी मिळून नोव्हेंबर, २००० पासून पर्यटन, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील मेकांग - गंगा योजना कार्यान्वित केली आहे. या उपक्षेत्रीय सहकार्याचा उद्देश म्हणजे चीन व पाकला शह देणे.

पी. व्ही. नरसिंहराव शासनाच्या ASEAN संघटनेकडे बघण्याच्या सकारात्मक दृष्टीकोन इंद्रकुमार गुजराल, अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील शासनाने अधिक मजबूत केले. २०१४ मध्ये पंतप्रधान मोदींच्या नेतृत्त्वाखाली सत्तेवर आलेल्या भाजप सरकारने या धोरणाचे नाव बदलून Act East policy (प्रत्यक्ष कृती करा) असे करून आसियान देशांशी

संबंध सुधारण्यास मदत झाली. २०१५ मध्ये, ASEAN ने तीन समुदायांची निर्मिती केली ज्या अंतर्गत त्याने त्याचा विकास आणि त्याच्या भागीदारांसोबत संबंध आयोजित केले. हे राजकीय-सुरक्षा समुदाय, आर्थिक समुदाय आणि सामाजिक-सांस्कृतिक समुदाय होते.

### ४.३.४ भारत - ASEAN व्यापारी संबंध व FTA (Free Trade Area) :

भारताचा ASEAN शी व्यापार दिवसेदिवस वाढत असून, अमेरिका व युरोपियन युनियननंतर ASEAN शी भारताचा व्यापार तिसऱ्या क्रमांकावर येतो. स्कूटर्स, सायकली, औषधे, रसायने, कापड, अन्नप्रक्रिया, दागिने, पर्यटन इ क्षेत्रात भारत - ASEAN मध्ये संयुक्त प्रकल्प उभारले जात आहे. त्याचबरोबर ASEAN देशांशीही भारताचा व्यापार वेगाने वाढत असून, भारताच्या व्यापाराचा जवळपास ९०% हिसा सिंगापूर, मलेशिया, इंडोनेशिया, थायलंडचा आहे. सिंगापूर – थायलंड बरोबर भारताने व्यापारासंबंधी अनेक द्विपक्षीय करार केले आहेत. थायलंड हे राष्ट्र भारताच्या पूर्व-दक्षिण पूर्व कडील देशांबरोबरच्या संबंधातील महत्वाचा दुवा ठरु शकतो. याचाच एक भाग म्हणून भारत - ASEAN यांच्यामधील Free Trade Area ( मुक्त व्यापार क्षेत्राची) स्थापना करण्यात आली आहे. अनेक वर्षे भारत - ASEAN मुक्त व्यापारातील करारावरील (Free Trade Aagreement - FTA) वाटाघाटी सुरु होत्या, ज्या अखेर २००८ साली पूर्ण झाल्या. याचाच परिणाम म्हणजे आग्नेय आशियाई राष्ट्रांची आर्थिक प्रगती मुख्यत: औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीमुळे साध्य झाली आहे. तर भारताची प्रगती हे सेवा क्षेत्रातील माहिती- तंत्रज्ञानातील प्रगतीचे फलित आहे. यामुळे मुक्त व्यापारातून दोघांनाही फायदा होणार आहे. या अंतर्गत ASEAN मधील कमी विकसित देशांसाठी Tarriff करारात भारताने सवलत जाहीर केली आहे.

### ४.३.५ विभागीय संरक्षण आणि ARF - ASEAN Regional Fourm:

संरक्षण क्षेत्रातदेखील भारत - ASEAN संबंध मजबूत होत आहे. १९९१ नंतर विभागीय संरक्षणाविषयी ASEAN राष्ट्रे अधिक संवेदनशील असून, विभागीय संरक्षणावर चर्चा करण्यासाठी ASEAN अंतर्गत ASEAN Regional Fourm ची स्थापना करण्यात आली आहे (१९९४). ARF हे प्रामुख्याने विश्वासवर्धक कृती व प्रतिबंधात्मक राजनयाला चालना देणारे व्यासपीठ आहे.

या फोरमची सदस्यसंख्या १८ असून, १० ASEAN सदस्य राष्ट्रे व इतर सदस्य देशांचा त्यात समावेश होतो. भारतदेखील या फोरमचा सदस्य आहे. १९९२ मध्ये भारताला आसियानमध्ये विभागीय सहकाऱ्याचा तर, १९९५ मध्ये पूर्ण सहकाऱ्याचा दर्जा देण्यात आला. चीनच्या वाढत्या संरक्षण प्रभावावर नियंत्रण ठेवण्यासाठी ASEAN सदस्य राष्ट्रांना भारताच्या संरक्षण सहकार्याची गरज आहे. ASEAN संघटनेतील बहुतांश राष्ट्रांचा चीनबरोबर सीमावाद सुरु आहेना. चीनच्या अरेरावीच्या धोरणाचा त्यांना त्रास सहन करावा लागत असून, चीनच्या वाढत्या सामर्थ्यावर नियंत्रण ठेवणे हा ARF च्या निर्मितीमागचा एक प्रमुख उद्देश आहे. भारताला या फोरममध्ये सामावून घेण्यामागे चीनला नियंत्रित करण्याचा हेतू महत्वाचा आहे. १९९६ पासून भारत ASEAN प्रादेशिक मंचचा सदस्य आहे आणि हा मंच या प्रदेशातील सुरक्षा विषयक धोरणे ठरवितो.

विभागीय संरक्षणाबरोबरच भारताने ASEAN राष्ट्रांशी मिळून आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरुद्ध लढा उभा उभारला आहे. दुसरे भारत- ASEAN अधिवेशन २००३ मध्ये इंडोनेशियातील बाली शहरात पार पडले. या अधिवेशनात दहशतवादाविरुध लढण्यासाठी एक जाहीरनामा संमत करण्यात आला यामुळे भारताच्या दहशतवादाविरुदच्या भूमिकेला ASEAN राष्ट्रांचा पाठिंबा मिळला. या अधिवेशनात ASEAN सुरक्षा परिषद (ASEAN Security Community) स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीनेही आग्नेय आशिया महत्वाचा आहे. म्यानमार आणि व्हिएतनाममध्ये नैसर्गिक वायूचे साठे आहेत, तर इंडोनेशियाकडे तेल आणि कोळसा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. हे भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाचे आहे. म्यानमारमधील राखाईन या किनारी क्षेत्रात दक्षिण कोरियन आणि भारतीय कंपन्या संयुक्तपणे नैसर्गिक वायूचे उत्सर्जन करीत आहे. हा वायु भारतात वाहून आणण्यासाठी जानेवारी २00५ मध्ये भारत - म्यानमार - बांगलादेश यांच्यात एक करार झाला. जगातील इतर भागांप्रमाणेच आग्नेय आशियातही भारताला चीनशी मोठी स्पर्धा करावी लागत आहे. ASEAN देश व चीन यांच्या संबंधांना धक्का न लावता, चीनशी उघडउघड शत्रूत्व न पत्करता ऊर्जास्त्रोतांसंबधीचे करार करणे हे आव्हान भारतासमोर आहे.

## **४.३.६ ASEAN +३ :**

ASEAN मध्ये जपान, चीन, दक्षिण कोरिया ही राष्ट्रे महत्वाची भागीदार आहेत. या देशांच्या एकत्रित गटाला 'ASEAN+३ ' असे म्हणतात त्यात भारताचा समावेश करून 'ASEAN +४ "' व्हावे अशी भारताची

अपेक्षा आहे. या प्रदेशातील आर्थिक क्षमता आणि भविष्यात तिच्यात होणारी संभाव्य वाढ पाहता आसियानचे सदस्य देश याला लवकरच मान्यता देतील, अशी अपेक्षा आहे. चीनवर या देशांच्या अर्थव्यवस्था पूर्णपणे अवलंबून असणे या देशांना आवडणार नाही आणि परवडणारही नाही.

## **४.३.७भारत - ASEAN संबंध नव्या दिशेने:**

डिसेंबर, २००६ मध्ये भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग लाओसची राजधानी व्हिएनशिनी येथे

भारत- ASEAN तिसऱ्या वार्षिक परिषदेला उपस्थित होते. या भेटीत भारत - ASEAN ने जागतिक दहशतवादाविरुद्ध लढा देण्यासाठी परस्पर सहकार्य करण्याचे ठरवले. शांतता विकास आणि प्रगतीचा भागीदार करारही या परिषदेदरम्यान करण्यात आला. तसेच एकमेकांच्या अर्थव्यवस्थेत भांडवली गुंतवणूक वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. या व्यतिरिक्त व्यापार, गुंतवणूक, पर्यटन, सांस्कृतिक देवाणघेवाण इत्यादी बाबत परस्पर सहकार्य आणि पावले उचलण्याचे ठरविण्यात आले. त्याचप्रमाणे सीमापार गुन्हे, अमली पदार्थाची तस्करी, शस्त्रास्त्र तस्करी, महिला आणि बालकांचा व्यापार इ. विषयावर सहकार्य करण्याचे ठरविण्यात आले.

२०१८ मध्ये भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ASEAN राष्ट्रांचे राष्ट्राध्यक्ष प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित केले गेले. ईशान्य भारत ASEAN चे प्रवेशद्वार आहे. त्या दृष्टीने म्यानमारशी संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहे.

### ४.३.८ भारत अभियान भारत स्मृती परिषद, २०१८ :

ही परिषद जानेवारी, 2018 मध्ये दिल्ली येथे पार पडली. 'भागीदारी मूल्य समान ध्येय' हे या परिषदेचे घोषवाक्य होते. या परिषदेला ASEAN चे दहा देशांचे प्रतिनिधी हजर होते. या परिषदेला ASEAN आणि भारतादरम्यान दिल्ली जाहिरनामा (Delhi Declaration) हा सामंजस्य करार पार पाडला. या व्यतिरिक्त

भारत - ASEAN दरम्यान व्यवसाय- गुंतवणूक एक्स्पो देखील पार पडले.

दिल्ली जाहीरनामा २०१८

भारत - ASEAN दरम्यान खालील विषयावर एकवाक्यता झाली.

- संबंधाचे मजबुतीकरण
- दहशतवाद निर्मूलनासाठी सहकार्य
- सायबर सुरक्षा सहकार्य धोरणाअंतर्गत क्षमतावृद्धी व धोरण समन्वय
- बहुराष्ट्रीय गुन्हयांविरोधात सहकार्याची प्रस्थापना
- राजकीय- सुरक्षा सहकार्य
- आर्थिक सहकार्य माहिती तंत्रज्ञानात्मक सहाय्य
- सागरी संसाधनांचे संवर्धन आणि शाश्वत वापर
- सागरी सहकार्य
- सूक्ष्म, लहान, मध्यम उद्योगातील सहकार्यात वाढ
- बाह्य अवकाशाचा शांतीपूर्ण वापर

### ४.३.९ मूल्यमापन:-

ज्याप्रमाणे भारताला पूर्वाभिमुख होण्याची गरज आहे, त्याचप्रमाणे आग्नेय आशियालाही पश्चिमाभिमुख होण्याची, भारताशी संबंध जोपासण्याची गरज आहे. यात अनेक अडचणी आहेत उदा. भारत आणि आग्नेय आशियातील काही देश यांचा दहशतवादा विरुद्धचा विचार भिन्न आहे. असे असले तरी भारत - ASEAN राष्ट्रांत विविध प्रश्नांवर सहकार्याचे संबंध प्रस्थापित झाले आहे. १९७० च्या दशकात दक्षिण-दक्षिण सहकार्याला कोणतेच भवितव्य नव्हते. नवउदारमतवादाच्या माध्यमातून विकास साध्य करून स्वत:च्या अटीवर जागतिकीकरणाचा स्वीकार करण्यासाठी धडपड करणाया भारत व ASEAN देश यांच्यातील सहकार्य मात्र यशस्वी ठरू शकेल. त्याचप्रमाणे पूर्व आशियातील एक मोठी महासत्ता म्हणून अधिकार ग्रहण करण्यासाठी भारताने पूर्व आशियातील अमेरिकेच्या

राजकीय-सुरक्षाविषयक आर्थिक आणि राजनयविषयक हितसंबंधाशी शक्य तितके जुळवून घेण्याचा प्रयत्न केला आहे. परिणामी आज भारत शीतयुद्धोत्तर पूर्व आशियातील एक महत्वाची सत्ता म्हणून नावारूपास आला आहे.

भारत- ASEAN व्यापारी संबंध दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर समकाळात भारत-ASEAN संबंध अत्यंत महत्वपूर्ण ठरतात.

## ४. ४. भारत आणि संयुक्त राष्ट्र संघटना

### ४.४.१ भारत : संयुक्त राष्ट्राचा संस्थापक सदस्य :-

भारत आणि संयुक्त राष्ट्रातील संबंध हे भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रस्थापित झाले आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेच्या समयी (१९४५) भारत पारतंत्र्यात होता. पारतंत्र्यात असूनही भारताला संयुक्त राष्ट्र संघटनेचे संस्थात्मक सभासद होण्याची संधी मिळाली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या निर्मितीवर शिक्कामोर्तब करणाऱ्या सॅनफ्रान्सिस्को परिषदेत भारताला आमंत्रित करण्यात आले होते. सन १९४५ पासून ते आजगायत भारत आणि संयुक्त राष्ट्रातील संबंध हे सहकार्य, विश्वासाचे आणि आदराचे राहिले आहेत. त्यामागचे प्रमुख कारण म्हणजे संयुक्त राष्ट्राची उद्दिष्टे, तत्वे आणि मूल्यांविषयी भारताची असलेली बांधिलकी होय. ही बांधिलकी भारताने आपल्या कृतीतून व्यक्त केली आहे. संयुक्त राष्ट्राला अर्थसहाय्य देण्यापासून तर संयुक्त राष्ट्र अंतर्गत कार्य करणाऱ्या विविध संस्था, आस्थापना, संघटना आणि समित्यांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन भारताने आपले योगदान दिले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्पष्ट केलेल्या भूमिकेशी आजही भारत बांधिल आहे. भारत आणि संयुक्त राष्ट्राच्या परस्पर सहकार्यात्मक संबंधामागचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे भारताची असलेली शांतताप्रिय विचारसरणी, 'वसुंधैव कुटुंबकम' तत्त्वज्ञान, अहिंसेचा आणि सहिष्णुतेचा मार्ग, गौतम बुद्धांपासून ते महात्मा गांधींपर्यंतची वैचारिक परंपरा होय. हे सर्व विचारवंत याच शांतताप्रिय अहिंसात्मक विचारसरणी आणि तत्त्वज्ञानाचे प्रतिनिधित्व करतात. या ऐतिहासिक वारसाने भारतीय परराष्ट्र धोरणाला ही प्रभावी केले आहे. याविषयीचे स्पष्ट मूल्य भारतीय राज्यघटनेतही सापडतात.

भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये भारताच्या परराष्ट्र व्यवहारात मार्गदर्शन करणारी काही तत्वे संविधान निर्मात्यांनी नमूद केली आहेत त्यानुसार,

१) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेच्या प्रसारासाठी भारत बांधील असेल.

२) राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये न्यायपूर्ण आणि सन्मानपूर्ण संबंध प्रस्थापित करण्यासाठी भारत बांधील असेल.

३) आंतरराष्ट्रीय कायदा आणि करारांचा भारत आदर करेल.

४) आंतरराष्ट्रीय संघर्ष, शांतता आणि चर्चेच्या माध्यमातून सोडवण्यासाठी भारताचा पाठिंबा आणि प्रोत्साहन असेल.

भारतीय संविधानात नमूद करण्यात आलेली ही तत्वे संयुक्त राष्ट्राचीदेखील पायाभूत तत्वे आहेत. ही संयुक्त राष्ट्राची प्रमुख उद्दिष्ट असून, त्यांचा उल्लेख संयुक्त राष्ट्राच्या घटनेत करण्यात आला आहे. संयुक्त राष्ट्र संघटना आणि भारताच्या घटनेतील या मूल्यांची समानता याच्यातील कनिष्ठ संबंधांचा पाया आहे. या मूल्यांचे प्रतिनिधित्व करणारी संघटना आणि त्यांना प्रत्यक्षात आणणारे व्यासपीठ संयुक्त राष्ट्राच्या स्वरूपाने अस्तित्वात आल्यामुळे भारताची भूमिका ही सातत्याने सहकार्याचीच राहिली आहे. शांततेच्या माध्यमातून शांतता हे तत्त्वज्ञान म्हणजे भारत आणि संयुक्त राष्ट्राला जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे.

## **४.४.२ भारताचे पंचशील धोरण-**

**२०** जून, १९४५ रोजी भारताचे तत्कालीन पंतप्रधान पं. नेहरू व चीनचे पंतप्रधान चाऊ – एन- लाय यांनी संयुक्तपणे पंचशील धोरणाची घोषणा केली. हे पंचशील धोरण भारत - चीन संबंधांना भविष्यात मार्गदर्शन करण्यासाठी स्वीकारण्यात आले होते. भारताचे शांततामय सहजीवनाचे तत्व हे या पंचशील धोरणाचा मुख्य आधार आहे. पुढे चालून हे पंचशील धोरण अनेक राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणाचा आधार बनले. १९५५ मध्ये झालेल्या आफ्रो-आशियाई राष्ट्रांच्या बांडुंग परिषदेत २९ सहभागी राष्ट्रांनी पंचशील धोरणाचा स्वीकार केला. १९५९ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या आमसभेत भारताच्या पुढाकाराने पंचशील धोरणाचा ठराव मांडला गेला. त्या ठरावालाच सुमारे ८२ राष्ट्रांनी समर्थन दिले.

भारताच्या या जगप्रसिद्ध पंचशील धोरणात खालील तत्त्वांचा अंतर्भाव होता.

१) परस्परांच्या भौगोलिक एकात्मता आणि सार्वभौमत्वाचा आदर करणे

२) आक्रमणाला विरोध

३) परस्परांच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप न करणे

४) परस्पर कायदा आणि सहकार्याच्या माध्यमातून आणि समानतेचे तत्व

५) शांततामय सहजीवन.

भारताची ही पंचशील तत्त्वे UNO च्या तत्व आणि उद्दिष्टांशी मिळतीजुळती आहेत.

## **४.४.३ समान तत्वे-**

संयुक्त राष्ट्राला आणि परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणाऱ्या विचारसरणी देखील समान आहेत

१) वसाहतवादाला विरोध

२) स्वयं-निर्णयाच्या अधिकाराला पाठिंबा

३) परस्परांच्या अंतर्गत कारभारातील हस्तक्षेपाला विरोध

४) शांततामय सहजीवन

५) शांततेच्या माध्यमातून शांततेची निर्मिती

६) संघर्षापेक्षा सहकार्यावर भर

७) आंतरराष्ट्रीय वादांचे शांततापूर्वक निराकरण

याच तत्वांना अनुसरून भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाची आखणी आणि कृती केली आहे व आंतरराष्ट्रीय राजकारणात भारत आणि इतर राष्ट्रांतील संबंध यास तत्त्वांना अनुसरून राहिलेले आहेत. थोडक्यात, भारतीय परराष्ट्र धोरणाची मूलतत्वे UNO च्या तत्त्वांची निगडित आहेत.

### ४.४.५ भारत आणि शांती सैनिक मोहिमा :

संयुक्त राष्ट्राच्या शांती सैनिक मोहिमांमध्ये मनुष्यबळाच्या स्वरूपाने सर्वाधिक योगदान देणाऱ्या राष्ट्रांपैकी भारत हे एक राष्ट्र आहे. आतापर्यंत ५५ हजार भारतीय सैनिकांनी शांतीमोहिमांमध्ये सहभाग घेतला आहे. युनोच्या ३५ शांती सैनिकमोहिमांमध्ये भारताने आपले प्रत्यक्ष योगदान दिले आहे, शीतयुद्धाच्या काळात संयुक्त राष्ट्राच्या कोरिया, इजिप्त, इस्त्राईल, व्हिएतनाम, काँगो मधील शांतीमोहिमांमध्ये भारताची विविध पातळ्यांवर महत्त्वाची भूमिका राहिली आहे. शीतयुद्धोत्तर काळात इराक-कुवेत प्रश्न, रवांडामधील वांशिक संघर्ष, कंबोडिया आणि इतर शांती सैनिक मोहिमांमध्ये भारताचे योगदान राहिले आहे. १०० पेक्षा अधिक भारतीय सैनिकांना शांती मोहिमांदरम्यान हुतात्म प्राप्त झाले आहे.

### ४.४.६ संयुक्त राष्ट्रांतर्गत निर्वसाहतीकरणाची प्रक्रिया आणि भारताचे योगदान :

संयुक्त राष्ट्राचा स्थापनेपासूनच सुरू झालेल्या निर्वसाहतीकरणाच्या चळवळीत भारताने महत्वपूर्ण योगदान दिले आहे. वसाहतवादाच्या निर्मूलनाची मागणी भारत स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच करत आला आहे. प्रत्येक राष्ट्राच्या विकासासाठी स्वयंनिर्णयाचा अधिकार ही पूर्वअट असल्याचा नेहरूंचा विश्वास होता. वसाहतवादाच्या जोखडातून जोपर्यंत लोक मुक्त होत नाहीत, तोपर्यंत खऱ्या अर्थाने शांतता प्रस्थापित होऊ शकणार नाही, अशी महात्मा गांधींचीही धारणा होती. भारतीय परराष्ट्र धोरणाची ही तत्वे स्वातंत्र्यपूर्व काळात निश्चित झाली. त्यापैकी वसाहतवादाला विरोध हे तत्व केंद्रस्थानी होते. त्यातून भारताची वसाहत वादाविरुद्धची भूमिका स्पष्ट होते.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यांनी वसाहतवादाविरुद्धची आपली भूमिका वेळोवेळी काँग्रेसच्या अधिवेशनातून मांडली होती. त्यांनी हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला की, भारत केवळ आपल्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करत नाही, तर संपूर्ण आशिया - आफ्रिका खंडाला वसाहतवादाच्या जोखडातून मुक्त करण्याचा भारताचा प्रयत्न आहे.

आमसभेच्या व्यासपीठावरून भारताने सातत्याने स्वयंनिर्णयाच्या अधिकाराचा आणि वसाहतवादाच्या निर्मूलनाचा आग्रह धरला आहे. भारताच्या या प्रयत्नांचा परिणाम म्हणून १९६० च्या नागरिक आणि राजकीय अधिकाराविषयीच्या करारात आणि त्याच वर्षात करण्यात आलेल्या आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक विषयाच्या करारात स्वयं निर्णयाच्या अधिकाराचा मूलभूत मानव अधिकार म्हणून समावेश करण्यात आहे. भारताने या दोन्ही करारावर स्वाक्षरी केलेली आहे.

#### १) भारत आणि नि:शस्त्रीकरण-

नि:शस्त्रीकरण हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे महत्त्वपूर्ण तत्व व उद्दिष्ट आहे. या क्षेत्रात संयुक्त राष्ट्रांतर्गत भारताची भूमिका अतिशय महत्त्वाची राहिली आहे. संयुक्त राष्ट्राच्या

व्यासपीठावरून भारताने संपूर्ण नि:शस्त्रीकरणाचा आग्रह सातत्याने धरला आहे. १९४८ मध्ये भारताने पहिल्यांदा अण्वस्त्रे नष्ट करण्याची, अणुशक्तीचा वापर शांतता कार्यासाठी करण्याची मागणी केली. १९५४ मध्ये भारताने सर्व प्रकारच्या अणुचाचण्यांवर बंदी घालण्याची मागणी केली. १९७८ मध्ये भारताने अण्वस्त्रांचा वापर किंवा वापराची धमकी देण्यावर बंदी घालण्यासाठी वाटाघाटी सुरू व्हाव्यात म्हणून पुढाकार घेतला. १९८८ मध्ये भारताने तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली विध्वंसक शस्त्रास्त्रांच्या निर्मूलनासाठी एक सर्वसमावेशक योजना आखली जावी, अशी मागणी केली. १९९६ च्या नि:शस्त्रीकरण परिषदेत भारताने अण्वस्त्रांचा निर्मितीसाठी वेळापत्रक मांडले. त्यामध्ये १९९६ ते २०२० या कालावधीत अण्वस्त्रांचा टप्प्याटप्प्याने कसे निर्मूलन करता येईल, अशी आखणी होती.

सर्व समावेशक अण्वस्त्र बंदी कराराविषयी जिनेव्हा आंतरराष्ट्रीय परिषदेत भारताने अण्वस्त्रांचा निर्मूलनासाठी अनेक प्रस्ताव मांडले. तथापि या प्रस्तावाचा समावेश करारात करण्यात आला नाही. म्हणून भारताने या करारापासून दूर राहणे पसंत केले.

**२) वंशवादाला विरोध-**

वंशवादाला विरोध हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट राहिले आहे हे उद्दिष्ट साधण्यासाठी भारताने युनोच्या व्यासपीठाचा उपयोग केला. संयुक्त राष्ट्रांच्या सदस्यांपैकी भारत हा पहिला देश होता, की ज्याने दक्षिण आफ्रिकेतील वंशवादी धोरणाचा पुरस्कार करणाऱ्या शासनाचा निषेध केला. दक्षिण आफ्रिकेतील वंशवादी धोरणाला बळी पडलेल्या भारतीयांच्या अन्यायाला पहिल्यांदा युनोच्या व्यासपीठावरून भारताने वाचा फोडली. वंशवादाविरुद्ध जागतिक जनमत गतिशील बनविण्यात भारताचे योगदान महत्त्वाचे आहे.

आमसभेने वंशवादाचा निषेध करणारे अनेक ठराव १९५० आणि १९६० च्या दशकात मंजूर केले. वंशवादाकडे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला धोका पोहोचविणारी व मानवतेला काळीमा फासणारी समस्या म्हणून पाहण्याची आंतरराष्ट्रीय समुदायाची मानसिकता घडविण्यात भारताचे प्रयत्न महत्त्वाचे आहेत. वंशवादाचा विरोध हे स्वातंत्र्योत्तर भारतीय परराष्ट्रीय धोरणाचे प्रमुख वैशिष्ट्य होते. या वैशिष्ट्याला व तत्वाला अनुसरून भारताने आंतरराष्ट्रीय राजकारणात वंशवादाला विरोध केला आहे. पॅलेस्टाईन प्रश्न, सायप्रस प्रश्न इत्यादी वांशिक संघर्ष शांततेच्या माध्यमातून सोडवण्यासाठी भारत नेहमीच प्रयत्नशील राहिला आहे.

थोडक्यात, भारताचे युनोमधील योगदान हे अत्यंत मोलाचे आणि बहुमोल स्वरूपाचे आहे. संयुक्त राष्ट्राच्या व्यासपीठावरून भारताने सातत्याने युनोच्या मुख्य उद्दिष्ट, तत्वे इ. शी बांधील राहून त्यासंबंधी धोरणांचा पाठपुरावा केला आहे.

## ४.५ विद्यापीठीय प्रश्न

१) भारत आणि आसियान संबंध विशद करा.

२) भारताच्या संयुक्त राष्ट्र संघटनेतील योगदानाची चर्चा करा.

## ४.६ संदर्भग्रंथ


१) आंतरराष्ट्रीय संबंध : शीतयुधोत्तर ऑ जागतिकीकरणाचे राजकारण – अरुणा पेंडसे, उत्तरा सहस्त्रबुद्धे

२) आंतरराष्ट्रीय संबंध – डॉ. शैलेन्द्र देवळाणकर

३) भारतीय परराष्ट्र धोरण : सातत्य आणि स्थित्यंतर - डॉ. शैलेन्द्र देवळाणकर

४) भारत आणि भारताचे शेजारी : संपादक मनीषा टिकेकर

५) भारत आणि भू – आंतरराष्ट्रीय राजकारण – समाज प्रबोधनपत्रिका खंड -२ लोकवाङ्मय गृह


❈❈❈❈❈❈❈